साहामाही " ३ " ८
साल अखेर " ७ " १०१८
किरकोळ अंकास ०४

Per annum in arrears 7 " 1R. 8 as.
Six monthly ..... 3 " 8 as
Single copy ..... 4 as.

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु.१
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस.....०१

वऱ्हाडसमाचार.

Advertisements.
Below 10 lines...
Per line over 10...4a
Repetition per line 3a

THE BERAR SAMACHAR.

VOL. XXII AKOLA MONDAY 2 JANUARY 1888. NO I.

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख २ माहे जानेवारी सन १८८८ इ० अंक १.

पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असेंसमजूं नये.

मुक्काम वाशीम तारीख २४।१२।८७

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांसः—

साष्टांग नमस्कार विनंती विशेष कृपा करून स्थळ द्याल अशी आशा धरून चार ओळी पाठवित आहे— वऱ्हाड शाळाखातें अद्याप बाल्यावस्थेंतच आहे, असें ह्मणण्यास प्रत्यवाय फारसा दिसत नाहीं. अगदीं पहिल्या प्रथम जेव्हां ह्या प्रांतीं विद्याखातें सुरू झालें तेव्हां विद्या शिकण्याच्या ज्या लोकांना सोई होत्या त्या आतां नाहींत. त्या वेळीं जितके लोक ऐपतवान होते तितके आता नाहींत. जितकी विद्यावृद्धी अधीक तितकें दरिद्र जास्त. आतां विद्या व दरिद्र यांचा परस्पर संबंध कसा जुळतो तो पहा. ज्या मनुष्याला कांहीं विद्येचा संस्कार होतो त्याला विद्ये विरहित इतर कामांचा कंटाळा येतो. व विद्येपासून पैसे फारसे मिळत नाहींत असें होत चालले आहे. तेव्हां विद्येपासून पैसे मिळत नाहींत. व कांहीं विद्या शिकलेल्या मनुष्याकडून काम होत नाहीं तेव्हां दरिद्र हा परिणाम होत चालला आहे. बरें ह्या प्रांतांत आधीं लोकांना गोडी फारशी नाहीं तशांत ज्या शिकण्याच्या सोई होत्या त्याही नाहींशा होत चालल्या आहेत. उपन्न भक्षी असे लोक होत चालले आहेत. अशी लोकांची स्थिति. याचा सरकारानें विचार न करितां लोकांवर एकदम फी वाढवून दुप्पट बोजा बहुधा वाढविला आहे. काम करण्याच्या पूर्वीच्या सवई गेल्या. विद्या पुढें शिकवावी तर फीच्या रूपानें विघ्न आडवें आलें. तेव्हां आतां करावें काय असा विचार येऊन पडला आहे.

सर्व वऱ्हाड प्रांतांत हा जिल्हा फार गरीब. विद्या व्यापार वगैरे सर्व गोष्टींत याची पाठ मागें. लोकांना विद्येची असावी तशी अद्याप अभिरुची नाहीं. इतक्यांत त्यांचेवर फीच्या रूपानें गदा येऊन त्यांना हतवीर्य करून टाकणें बरोबर नव्हते. पूर्वीं ह्या जिल्ह्यांत इंग्रजी शिकण्याच्या शाळा रिसोड, शिरपूर, पुसद, उमरखेड वगैरे ठिकाणीं होत्या त्या सर्व निजधामास जाऊन फक्त काय तो येथील इंग्रजी शाळा राहिली आहे, इतकेंच कायतें आमचें भूषण होय. परंतु ह्या नवीन वाढलेल्या फीच्या गदेंतून जर टिकाव धरून राहील तर हें आह्मां वाशीमस्थ लोकांचें सुदैवच समजलें पाहिजे. आमचें वाशीम केवळ गरीब स्थितींत आहे. येथें भिक्षुक ब्राह्मणांची वस्ती फार. ब्राह्मणाव्यतिरिक्त जातींना फार विद्येची गोडी नाहीं व त्यांस जरूर नाहीं. विद्या हें सर्व सुधारणांचें आदिस्थान होय. सर्वांपेक्षां विद्या खात्यास अधिकमुभा पाहिजे. जितके लोक विद्या शिकून तयार होतील तितके ते शहाणपणानें वागतील. आंना खरें खोटें चांगलें समजून त्यांच्यांतील नीता वाढेल. व त्यापासून राजा व प्रजा यांना चांगलें सौख्य प्राप्त होईल. असे विद्येचे अनेक प्रकारचे सुपरिणाम आहेत. परंतु फी वाढविते वेळीं ह्या गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजे होत्या. ह्या खात्यांतील फी वाढवून उत्पन्न जास्त करण्यापेक्षां इतर खात्यांत खर्च कमी केला असतां ह्मणजे कांहींच अडचण नव्हती. आज जगतांत जितकीं राष्ट्रे आहेत तितक्यांत प्रथमतः तेथें तेथें चालत असलेल्या विद्यां अगोदर लोकांना शिकविण्याकडे राजांचें मुख्य लक्ष्य असतें. सर्व शस्त्रांमध्यें मनुष्याला हतवीर्य करण्यास विद्येसारखें दुसरें बळवतर शस्त्र नाहीं. आतां इंग्रजांनीं नुकतांच ब्रह्म देश खालसा केला आहे. तेथील लोक अगदीं दांडगे आहेत याचें कारण काय? तर त्यांच्यांत विद्येचा अभाव या शिवाय कांहीं नाहीं. आतां तिकडे शाळाखातें सुरू केल्यास लोकांत एकदम बदल होऊन जाऊन जी हल्लीं जिवाची हानी व पैशाचा खर्च तिकडे होत असेल तो होणार नाहीं. विद्येनें लोक प्रबळ झाले तर त्यांचा सर्व जोर कायतो कागदपत्रांत. विद्येच्या जोरावर ते फक्त आपल्या हक्काविषयीं कदाचित् मागणी करितील, यापरते त्यांच्यानें कांहीं होणार नाहीं. विद्या रूपी शस्त्र पत्करेल. परंतु खऱ्या शस्त्राचा प्रभाव कठीण. असें आहे ह्मणून सर्व जगतात व हल्लीं जीं नांवाजलेलीं राष्ट्रे आहेत त्यांत ही प्रमुख मानितात. व जितकी देववेल तितकी विद्येच्या कामीं मदत देतात. असें असतां आमच्या ह्या बाल्यावस्थेंतील विद्येवर फिच्या रूपानें इतक्यांत गदा कां यावी हें समजत नाहीं. कदाचित् आमच्या सरकारच्या मनांत असें वागत असेल कीं लोकांनीं आपलें शिक्षण आपल्या हातांत घ्यावें ह्मणजे सरकारावरचा भार कमी होईल. परंतु असें जोखमीचें काम हातीं घेण्यास विद्या व द्रव्य यांची मदत पाहिजे ती लोकांपाशीं आज नाहीं. व कालांतरानेंही ती त्याना मिळण्यासारखी नाहीं. ह्या प्रांतांत इंग्रजांचा अमल होऊन फक्त $\frac{1}{3}$ शतक झालें आहे. जिकडे $\frac{3}{4}$ शतक व जिकडे पुरें शतक झालें आहे तिकडेही लोक अद्याप स्वतंत्र रीतीनें विद्यालयें चालविण्यास मागें पुढें पहातात. जर इकडे सर्व गोष्टींचा अगोदरच अभाव आहे, विद्वान लोक नाहींत, पैसा नाहीं, गोडी नाहीं, अंगांत करतबगारी नाहीं, तेव्हां लोक आपल्या हातांत शिक्षण घेतील ह्मणणें ही केवळ ज्यांना असें वाटत असेल त्यांच्या मनाची भ्रांती आहे. असो, फी वाढल्यामुळें खाजगी शाळा उपन्न तर होणें कठीणच परंतु सरकारी शाळांतून जो सव्यां गरीबां गुरीबांना विद्या मिळत आहे ती मात्र बंद होईल- तर या गोष्टींच्या चालकांनीं ही गोष्ट मनांत आणावी हें बरें आहे. पत्रकर्ते राव कृपा करून स्थळ द्याल अशी आशा आहे. कळावें हें विनंती.

आपला प्रेमेच्छु
"क्ष"

मुक्काम वाशीम तारीख २४।१२।८७

रा. रा. वऱ्हाड समाचार पत्रकर्ते यांसः—

वि. वि. येथील पोष्टांत कांहीं पार्सल संबंधानें गडबड झाली. त्याची चौकशी करण्याकरितां मे. इन्स्पेक्टर व मे. सुपरींटेंडेंट साहेब, पोस्ट खातें, यांच्या स्वाऱ्या येथें येऊन गेल्या. या बाबदींत चौकशी करण्याकरितां आल्या होत्या असा बोलवा आहे. ही हकिकत अशी असल्याचें कळतें कीं, कांहीं दिवसांपूर्वीं एकाचे नांवचे बाहेरून व्हाल्युपेबल या सील आलें होतें. त्याची डिलिव्हरी ज्याची त्यास झाली मात्र त्याचेकडून घेतलेले पैसे पार्सल पाठविणाराकडे मनी ऑर्डर करून जावयाचें तें मात्र गेलें नाहींत असें ह्मणतात पार्सल आल्याचा दाखला हाफिसांत कोठें सापडत नाहीं. अशा ह्या गडबडीमुळें सदरहु स्वाऱ्या येऊन गेल्याचें समजतें. हें वर लिहिल्याप्रमाणें खरेंच घडलें असेल तर आतां कोणाचें नशीब फुटलें तें लवकरच बाहेर पडेल. हें विनंती.

आपला प्रेमेच्छु
"क्ष"

समाज सुधारणा,

(लिहून आलेला मजकूर)

इंग्लंड व फ्रान्स या देशांचा इतिहास वाचीत असतां त्यांत राजप्रकरणीं व धर्म प्रकरणीं गोष्टींत मोठमोठाल्या उलाढाली झालेल्या आपल्या वाचनांत येतात व त्याबद्दल आपणांस एक प्रकारचें नवल वाटतें. परंतु आपल्या स्वतःच्या देशांतही या उलाढाली कांहीं कमी झाल्या नाहींत. श्रुति, स्मृति, पुराणें इत्यादिकांपासून दृष्टोत्पत्तीस येणारा अगदीं पुरातन काळाचा आपल्या देशाचा इतिहास अविश्वासनीय ह्मणून एकाकडे जरी ठेविला तरी अर्वाचीन पंडितांना विश्वासनीय असा अलीकडला ख्रिस्त शक सुरू झाल्या नंतरचा आपल्या देशाचा इतिहासही या उलाढालींनीं ओतप्रोत भरलेला आहे. फार प्राचीन काळापासून सुवर्ण भूमि या नांवानें गाजत असल्या कारणानें परकीय देशांतील लांबलांबचे लोक यावर एकसारखे झडपा घालीत होते. आज कोण सेमिरामीस आली, उद्यां डरायस आला, परवां शिकंदर आला या फार प्राचीन कालच्या गोष्टी झाल्या. सबक्तगीन, अलबक्तगीन, महमद गझनवी, महमद गोरी, बाबर ही तर अगदीं अलीकडची मंडळी. या परकीय लोकांच्या स्वाऱ्यांची आपल्या देशांत एकसारखी झुंबड लागली होती. आपल्यास माहितच आहे कीं कोणत्याही देशांत कोणत्याही काळीं पहा राज्यप्रकरणांत परकीय लोक येऊन त्यांनीं राज्यक्रांति केली कीं ती बरोबर तद्देशीय लोकांचे सामाजिक आचार विचार बदलावयाचेच. आपल्या देशांत निरनिराळ्या जातींच्या परकीयांनां येऊन आपापलीं राज्यें कांहीं नियमित काळपर्यंत स्थापन केलीं त्यां बरोबर त्यांचे आचार विचारही कांहीं अंशीं आपल्या लोकांत शिरले. फार प्राचीन काळची आपल्यास माहिती नाहीं परंतु मुसलमानी राजांचा परिणाम आपल्या लोकांवर कसा झाला आहे हें आपण आज प्रत्यक्ष पहात आहों. त्यांच्या दरबारी रीती आपण घेतल्या, त्यांचे पेहराव आपण घेतले, त्यांची भाषा घेतली, व कांहीं अंशीं त्यांचें सामाजिक आचारही घेतले. या गोष्टी आपण परकीयांपासून घेतल्या असूनही त्या आपल्याला इतक्या चिकटून बसल्या आहेत कीं बराच काळ पर्यंत स्वराज्याखालीं असूनही त्या आपल्याला सोडतां आल्या नाहींत. देशाच्या सामाजिक स्थितीवर परकीय अमलाचा कसा परिणाम होतो याचा अनुभव या गोष्टींवरून आपल्यास पक्का आलेला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. सध्यां आपल्यावर महाप्रतापी आंग्लभौमांची सत्ता आहे. हे लोकही आपल्याला परकीयच आहेत अर्वाचीन पंडितांच्या मताप्रमाणें त्यांचें आपलें मूळ एकच असें जरी मानिलें तरी त्यांच्या जन्म भूमींत सहस्रावधि कोसांचें अंतर असल्या कारणानें त्यांचे आपले आचार विचार परस्परांपासून फारच भिन्न आहेत. या लोकांच्या सत्तेचा परिणाम आपल्या सामाजिक स्थितीवर जसा होत आहे तसा पूर्वी कोणत्याही काळीं झाला नसेल. आजपर्यंत आपल्यावर ज्या ज्या परकीय लोकांनीं अंमल केला त्यांपैकीं एतद्देशीय लोकांची अवस्था सुधारून त्याना सुधारणा, विद्या यांचा संसर्ग करून देण्याचें फारच थोड्या राज्यकर्त्यांनीं मनांत आणिलें असेल. आपल्या हल्लींच्या प्रभूनीं आपल्याला जिंकून सर्वस्व मिळविलें खरें; तथापि आपली मानसीक स्थिति सुधारण्याकरितां त्यांनीं पुष्कळ परिश्रम केले आहेत व अद्याप ते करीत आहेत. आपल्या लोकांना या प्रभूच्या अमलाखालीं विद्येची गोडी पुष्कळ लागत चालली आहे. पाश्चिमात्य लोक सुधारलेल्या लोकांत गणले जात आहेत तेव्हां त्यांच्या समाज स्थितीचें अवलोकन करून तिचें अनुकरण करण्याकडे आपल्या लोकांची प्रवृत्ति बरीच होत आहे. सारांश सुधारणा व ज्ञान यांचा प्रसार आपल्या देशांत झाल्या कारणानें आपल्या लोकांत नवीनच जीव उत्पन्न होऊन आपल्या समाज स्थितीचें स्वरूप बदलत चाललीं आहेत. कांहीं वर्षांनीं तर आपल्यांत पूर्ण स्थित्यंतर होईल असाही कित्येक दूरदर्शी विद्वानांचा तर्क चालत आहे.

वऱ्हाडसमाचार.

मिती पौष वद्य ३ शके १८०९

आमचें बाविसावें वर्ष.

वऱ्हाड समाचाराचा आज बावीसावा वाढ दिवस आहे. तेव्हां ज्या जगन्नियत्याच्या कृपेनें आम्हास आजचा हा सुदिन दृष्टीस पडला त्याचे अगोदर आह्मी आभार मानितो. त्या प्रमाणेंच आमच्या ज्या प्रिय आश्रयदात्यांनीं आजपर्यंत आह्मांवर मेहेर नजर ठेवून आह्मांस आपला उदार आश्रय दिला त्यांचे ही आम्ही येथें आभार मानिलें पाहिजेत. आज बरोबर २१ वर्षें झाली. वऱ्हाडसमाचार आपल्या देश बांधवांची यथाशक्ति वेडीवाकडी सेवा करीत आहे. गतवर्षांत जिकडे तिकडे चळवळ उत्पन्न करणाऱ्या राजकीय व सामाजिक गोष्टी बऱ्याच घडून आल्या. त्यांच्या बऱ्या वाईट परिणामाबद्दल आह्माला जे जे विचार सुचले ते ते वेळोंवेळीं आह्मी आपल्या प्रिय वाचकांपुढें सादर केलेच आहेत. आतां आमच्या आश्रयदात्यांस इतकीच विनंति आहे कीं त्यांनीं या प्रमाणेंच आमच्याकडून वेडीवाकडी सेवा घेत जावी व आपला उदार आश्रय असाच आह्मांस देत जावा. शेवटीं आह्मांस व आमच्या आश्रयदात्यांस सुरक्षित ठेवून येतें वर्ष असेंच आनंदानें घालविण्यास आह्मांस समर्थ करावें अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करून आम्ही हा लेख पुरा करितों.

वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभेचा यंदाचा समारंभ.

यंदांच्या भाषण समारंभास शुक्रवार ता० २३ डिसेंबर सन १८८७ इ० रोजी प्रारंभ झाला. उमेदवारांची संख्या दरसालच्या पेक्षां यंदा कमी होती. त्याचें कारण असें आहे कीं यंदां उमेदवारांच्या लायकीचें मान जरा जास्ती कडक होतें. इतक्या दिवसपर्यंत पाहिजे त्या उमेदवाराला पाहिजे तितक्या विषयावर बोलण्याची परवानगी असे असें म्हटलें तरी चालेल. परंतु असा प्रकार असणें हें बरोबर नाहीं अशा अर्थाच्या कांहीं सूचना ह्या सभेला आमच्या पत्रांतून आणि अन्य द्वारानें झाल्या असल्यामुळें ज्या योगानें जास्ती योग्यतेचे वक्ते येतील असे नियम सभेनें केले आहेत. उमेदवारांच्या वयाची इयत्ता इतके दिवस पर्यंत १६ वर्षांची होती ती यंदा वाढवून १८ वर्षांची केली. मनुष्याच्या अंगांत प्रौढपणा येऊन त्याचे विचार स्थीर व्हावयाचे ते ह्या वयांत सुद्धां होत नाहींत. ह्या पत्रांतून पत्रव्यवहार द्वारें एका गृहस्थानें सूचना केली होती कीं उमेदवारांचें वय पंचवीस वर्षांचे असावें इतक्या वयाचे उमेदवार मिळणें कठीण आहे, कारण कीं अशा वयाचे लोक बहुतकरून आपआपल्या उद्योगाला लागलेले असतात. तेव्हां सभेकडे परीक्षा देण्याला येण्याचा संभव कमी आहे. सभेनें ठरविलेली वयाची इयत्ता साधारणपणें बरी आहे. तसेंच ह्या सभेकडून तीन बक्षिसें ज्याला मिळालीं आहेत अशा उमेदवाराला पुनः बक्षिस मिळणार नाहीं असा ही एक नियम आहे. ह्या नियमाचे योगानें इतक्या दिवसपर्यंत कांहीं वक्ते तेच ते पुनःपुन्हाः येऊन बक्षीस घेऊन जात असत ते बंद झालें. आणि त्यामळें होतकरू वक्त्यांस ज्यास्ती उत्तेजन मिळालें. आमच्या असें पहाण्यांत आलें आहे कीं कांहीं नांवाजलेले खरे वक्ते यांचें प्रत्येक ठिकाणच्या वक्तृत्वोत्तेजक सभेमध्यें जाऊन बक्षिसें उपटण्याचें एक वर्षासनच होऊन गेलेलें आहे. चांगलें नांवाजले वक्ते जे असतील त्यांना कोणत्याही प्रकारचें उत्तेजन मिळूंनये असें नाहीं. परंतु जो मनुष्य बक्षिसाच्या लायक आहे असें एकदां दोनदां नव्हे तीनदां ठरलें आहे त्यांणेंच पुनः पुनः येऊन बक्षीसा करितां उमेदवारी केल्यास दुसऱ्या उमेदवारास बक्षीसें मिळविण्याचा मुळींच संभव नाहीं.

विषय निवडण्यांत ही यंदांच्या सालीं जरा विशेष प्रकार नजरेस आला. यंदाच्या सालीं परीक्षेकरितां कोणकोणते विषय ठरविले जावे या विषयीं सभेकडून वऱ्हाड वासी सर्व गृहस्थांस वर्तमानपत्र द्वारें विनंतिकेली होती. सभेपुढें फार झालें तर तीनच्यार विषयांत परीक्षा होणार असें असतां वऱ्हाड वासी सर्व ग्रहस्थांस विषय सुचविण्या विषयीं विनंति करणें हे जरासें चमत्कारिक दिसतें. तथापि लोकांची आवड कोणत्या प्रकारची आहे हे समजून घेऊन त्याप्रमाणें निवड करणें हें वावगें नव्हे.

यंदांचे तिन्ही विषय या प्रमाणें निवडलेले होते. (आमच्या ऐकिवांत असें आहेकीं पहिला आणि तिसरा विषय हे येथील लोकांनीं पाठविलेल्यां पैकीं होते.) तिन्ही विषय सामाजिक स्थितींत सुधारणा करण्याचे होते व लग्नांतील अव्यवस्थित खर्चा संबंधाचा तिसरा विषय शिवाय करून बाकीचे दोन्ही विषय प्रतिपादन करण्याला बरेच कठीण होते. उमेदवारांची संख्या यंदाच्या सालीं कमी असण्याला आणखी हें ही एक कारण असावें असें वाटतें.

परीक्षा समारंभ उमरावती येथील नाटक गृहांत झाला. पहिल्या विषयांत तीन उमेदवारांचीं भाषणें झालीं. हा विषय असा होता कीं, कोणतीहा गोष्ट चांगली आणि ग्राह्य आहे असें ठरविणें झाल्यास ती जुनी आहे किंवा नवी आहे या करितां चांगली अथवा उपयुक्त व न्याय्य आहे या करितां चांगली, हें ठरविण्याचा होता. व हें ठरवितांना ऐतिहासिक प्रसिद्ध दृष्टांत घेऊन भाषण करावें असा होता. यांतील उमेदवारांची भाषणें जितकीं चांगलीं व्हावीं तितकीं चांगलीं झालीं नाहींत. फक्त रा. रा. श्रीधर वामन शिन्नरकर यांचें भाषण मात्र बरें झालें. व त्यानाच त्या विषयांतील बक्षिस रुपये तीसचें मिळालें.

याच विषयांत आणखी एका उमेदवाराचें (रा. रा. लक्ष्मण मोरेश्वर यांचें) भाषण झालें व तो परीक्षेंत पास झाला. याकरितां त्यांनाही एक १० रुपयांचें बक्षीस देण्यांत आलें.

दुसरा विषय जातिभेदा संबंधाचा होता. ह्यांतही तीन उमेदवारांचीं भाषणें झालीं. हा विषयही प्रतिपादन करण्याला पहिल्याप्रमाणेंच कठीण होता. त्यांत रा० रा० महादेव कृष्ण पाध्ये ह्यांचें भाषण चांगलें झालें. नागपूर येथील मारिस कालेजांत हे शिकत असतात. जातिभेदाचें मूळरूप वर्णभेद आहे आणि तो वर्णभेदही "गुण कर्म विभागशः" होता असें ह्यानीं आपल्या भाषणांत उपपत्तीसह व्यक्त करून दाखविलें. पाध्ये यांची विषयरचना चांगली होती परंतु सर्व भाषण अव्वा तासांतच आटपावें लागल्यामुळें त्यांना ती सर्व माहिती संक्षिप्त रीतीनेंच कळवावी लागली. तसेंच त्यांच्या भाषणाचा संहार करितांनाही यांना सर्व भाषण संपुष्टांतच आणावें लागलें. सभेनें यांना आणखी कांहीं वेळपर्यंत बोलण्याची परवानगी दिली असती तर बरें झालें असतें. ह्या विषयाकरितां फक्त पंचवीस रुपयांचें बक्षीस होतें. परंतु ह्यांचें भाषण परीक्षकांस फार चांगलें वाटल्यामुळें त्यांस तीस रुपयांचें बक्षीस देण्यांत आलें. याशिवाय आणखी एक बक्षीस रुपये १० चें रा. रा. माधव रघुनाथ बऱ्हाणपूरकर यांस ते या विषयांत पास झाले असल्या कारणानें देण्यांत आलें.

तिसरा विषय हिंदु लोकांतील लग्न संबंधीं फाजील खर्चाच्या आणि इतर अव्यवस्थित चालींविषयीं होता. ह्यांतहा तीनच उमेदवार बोलले. ह्यांत रा. रा. केशव राजाराम देशपांडे यांचें भाषण शिवायकरून बाकींचीं भाषणें चांगलीं झालीं नाहींत असें ह्मटलें पाहिजे. प्रतिपाद्य विषय सोपा असल्या कारणानें उमेदवारांची संख्या बरीच होईल असा सभेचा अदमास असावा असें वाटतें. व ह्या कारणाकरितांच ह्या विषयाला बक्षिसेंही दोन ठेविलीं होतीं. परंतु सदर्हू देशपांडे शिवायकरून इतर उमेदवार फक्त पासही झाले नाहींत. देशपांडे यांचें भाषण मात्र पहिल्यापासून फारच शिस्तवार होतें. भाषणही चांगलें व अस्खलित झालें. ह्यांस सभेचें वीस रुपयांचें बक्षीस मिळालें.

प्रत्येक विषयांत तीन तीन उमेदवारांचीं भाषणें झालीं. त्याप्रमाणेंच हानररी (सन्मानार्थ) हीं तीनच भाषणें. पहिलें रा. रा. अब्दुलबीब यांचें मराठी भाषेंत. हे परीक्षे करितां नेमलेल्या दुसऱ्या विषयांवरच बोलले. हे जातीचे मुसलमान असल्यामुळें यांचें मराठींत भाषण ह्मणजे चांगलेंसें होणार नाहीं त्यांत व्याकरणाच्या बाबतींत पुष्कळ चुका होतील असें त्यानीं आपलें भाषणाचेपूर्वीं बोलून दाखविलें व तसें होण्याचा संभवही आहे असें कित्येकांस वाटलें परंतु भाषणांत तसा कांहीं एक प्रकार नजरेस आला नाहीं. भाषणांतील वाक्य रचना चांगली नामी असून बोलण्याची शैलीही स्वाभाविकपणें बोलण्यारखी दिसत होती. एकंदरींत हें भाषण चांगलें झालें व श्रोतृजनांसही चांगलें आवडलें असें त्यांचें वरून वाटलें.

सन्मानार्थ दुसरें भाषण झालें तें रा. रा. रामचंद्र आबाजी पन्हाळकर यांचें झालें. प्रतिपाद्य विषय 'आयुष्याचा विमा उतरण्याची अवश्यकता' हा होता. विषय फार महत्वाचा असून मि० पन्हाळकर हे मुंबईतील एका विमा उतरण्याचे कंपनीचे अकोल्याचे एजंट असल्या कारणानें त्याचें विवेचनही चांगलें होईल असें सर्वांस वाटलें होतें. व त्यांचें जें कांहीं वेळ पर्यंत भाषण झालें त्या वरून तें भाषण चांगलेंच झालें असतें असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. हें भाषण चाललें असतां सभास्थानांत बाकांवर बसलेल्या मंडळीपैकीं कित्येक असामीनीं गडबड केल्यामुळें हें भाषण तडीस गेलें नाहीं.

तिसरें भाषण रा. रा. त्र्यंबक अव्याकाणू यांचें झालें. हे गृहस्थ नुकतेच इंग्लंड देशांतून परत आले आहेत. त्यांनीं इंग्लडांतील नाटक गृहांविषयीं चांगली माहिती दिली त्याशिवायही तिकडे चमत्कारिक काय काय पहाण्यांत येतें हें त्यांनीं सांगितलें. ह्यांचें भाषणहा श्रोतृ मंडळीस फार चांगलें वाटलें असें त्यांचें तटस्थ आणि एकाग्र वृत्तीवरून वाटत होतें.

शुक्रवार, शनिवार आणि रविवार या तीन रात्रीं यानमाणें उमेदवारांचीं आणि सन्मानार्थ भाषणें झाल्यावर सोमवारीं रात्रीं प्रत्येक विषयांतील एकेक परीक्षकांचीं भाषणें व्हावयाचीं होतीं. परंतु सोमवारीं रात्री त्या भाषणांत प्रारंभ होणार इतक्यांत बाकांवरील मंडळीपैकीं कित्येकांचें असें ह्मणणें पडलें कीं मि० पन्हाळकर यांचें भाषणच पुन्हा ऐकावें. मि० पन्हाळकर यांस बोलण्याला त्या रात्रीं सवड देतां येत नसल्या कारणानें त्यांचें भाषण झालें नाहीं. व बाकावरील मंडळीन दुसऱ्या कोणाचें भाषण ऐकावयाचें नाहीं, असा निश्चय केल्यावरून त्या रात्रीं परीक्षकांचीं भाषणें झालीं नाहींत. बांकावरील मंडळीनें आपला दुराग्रह सोडावा अशा उद्देशानें रा० रा० रघुनाथ रावजी तळवळकर यांनीं एक भाषण केलें. तें इतकें उत्तम झालें कीं त्याच्या तोडीचें दुसरें भाषण गेल्या बऱ्याच वर्षांत आमच्या ऐकण्यांत आलें नाहीं. असें ह्मटलें तरी चालेल, त्यांचा त्या वेळचा सर्व श्रोतृजनांस केलेला उपदेश फारच मनोवेधक होता असतु. त्यांचें भाषण संपल्यानंतरही बांकावरील मंडळीनें आपला आग्रह न सोडल्यामुळें परीक्षेंत पास कोणकोण झाले आहेत इतकें सांगण्यांत येऊन सभेचें विसर्जन झालें.

बक्षिसें वाटण्याचा समारंभ मंगळवारी उमरावती सिटीलायब्ररींत झाला. तर लिहिलेल्या उमेदवारांस बक्षिसें वांटलीं आणि त्या शिवाय "वक्तृत्वकला विवेचन" या नांवाच्यां पुस्तकाची एकएक प्रत ही प्रत्येक उमेदवाराला सभेकडून देण्यांत आली.

यंदांच्या सालीं कुलीन स्त्रियांनां बसण्या करितां पडदपोशीची जागा सभास्थानांत व्यवस्थापक मंडळीनें तयार केली होती व त्या जाग्याचा पूर्णपणें सदुपयोगही झाला. पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या रात्रीं भाषणें ऐकण्या करितां कुलीन स्त्रियांचा बराच समाज जमत असे. एकंदरींत स्त्रियांनांही अशा समाजांत जाण्याची अभिरुचि होत आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. याच प्रकारची सोय पुढेंही प्रत्येक सालीं करण्यांत येईल. असें आह्मी इच्छितों. स्त्रियांस शिक्षण देण्याचा हा ही एक चांगला मार्ग आहे.

शेवटीं एक गोष्ट सांगून ह्या विषयाची रजा घेतो. यंदांच्या सालीं सभा स्थानांतील बाकांवरील मंडळीपैकीं कित्येकांच्या गैरवर्त-

साहामाही " ३ ८
साल अखेर " ७ " १०१८
किरकोळ अंकास ०४

Per annum in arrears 7 „ 1R. 8 as.
Six monthly ..... 3 „ 8 as
Single copy ..... 4 as.

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु.१
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस.....०१

वऱ्हाडसमाचार.

Advertisements.
Below 10 lines...
Per line over 10...4a
Repetition per line 3a

THE BERAR SAMACHAR.

VOL. XXII AKOLA MONDAY 2 JANUARY 1888. NOI.

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख २ माहे जानेवारी सन १८८८ इ० अंक १.

पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असेंसमजूं नये.

मुक्काम वाशीम तारीख २४।१२।८७

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांसः—

साष्टांग नमस्कार विनंती विशेष कृपा करून स्थळ द्याल अशी आशा धरून चार ओळी पाठवित आहे--- वऱ्हाड शाळाखातें अद्याप बाल्यावस्थेंतच आहे, असें ह्मणण्यास प्रत्यवाय फारसा दिसत नाहीं. अगदीं पहिल्या प्रथम जेव्हां ह्या प्रांतीं विद्याखातें सुरू झालें तेव्हां विद्या शिकण्याच्या ज्या लोकांना सोई होत्या त्या आतां नाहींत. त्या वेळीं जितके लोक ऐपतवान होते तितके आता नाहींत. जितकी विद्यावृद्धी अधीक तितकें दरिद्र जास्त. आतां विद्या व दरिद्र यांचा परस्पर संबंध कसा जुळतो तो पहा. ज्या मनुष्याला कांहीं विद्येचा संस्कार होतो त्याला विद्ये विरहित इतर कामांचा कंटाळा येतो. व विद्येपासून पैसे फारसे मिळत नाहींत असें होत चाललें आहे. तेव्हां विद्येपासून पैसे मिळत नाहींत. व कांहीं विद्या शिकलेल्या मनुष्याकडून काम होत नाहीं तेव्हां दरिद्र हा परिणाम होत चालला आहे. बरें ह्या प्रांतांत आधीं लोकांना गोडी फारशी नाहीं तशांत ज्या शिकण्याच्या सोई होत्या त्याही नाहींशा होत चालल्या आहेत. उत्पन्न भक्षी असे लोक होत चालले आहेत. अशी लोकांची स्थिति. याचा सरकारानें विचार न करितां लोकांवर एकदम फी वाढवून दुप्पट बोजा बहुधा वाढविला आहे. काम करण्याच्या पूर्वींच्या सवई गेल्या. विद्या पुढें शिकवावी तर फीच्या रूपानें विघ्न आडवें आलें. तेव्हां आतां करावें काय असा विचार येऊन पडला आहे.

सर्व वऱ्हाड प्रांतांत हा जिल्हा फार गरीब. विद्या व्यापार वगैरे सर्व गोष्टींत याची पाठ मागें. लोकांना विद्येची असावी तशी अद्याप अभिरुची नाहीं. इतक्यांत त्यांचेवर फीच्या रूपानें गदा येऊन त्यांना हतवीर्य करून टाकणें बरोबर नव्हते. पूर्वीं ह्या जिल्ह्यांत इंग्रजी शिकण्याच्या शाळा रिसोड, शिरपूर, पुसद, उमरखेड वगैरे ठिकाणीं होत्या त्या सर्व निजधामास जाऊन फक्त काय ती येथील इंग्रजी शाळा राहिली आहे, इतकेंच कायतें आमचें भूषण होय. परंतु ह्या नवीन वाढलेल्या फिच्या गदेंतून जर टिकाव धरून राहील तर हें आह्मां वाशीमस्थ लोकांचें सुदैवच समजलें पाहिजे. आमचें वाशीम केवळ गरीब स्थितींत आहे. येथें भिक्षुक ब्राह्मणांची वस्ती फार. ब्राह्मणाव्यतिरिक्त जातींना फार विद्येची गोडी नाहीं व त्यांस जरूर नाहीं. विद्या हें सर्व सुधारणांचें आदिस्थान होय. सर्वांपेक्षां विद्या खात्यास अधिकमुभा पाहिजे. जितके लोक विद्या शिकून तयार होतील तितके ते शहाणपणानें वागतील. त्यांना खरें खोटें चांगलें समजून त्यांच्यांतील नीता वाढेल. व त्यापासून राजा व प्रजा यांना चांगलें सौख्य प्राप्त होईल. असे विद्येचे अनेक प्रकारचे सुपरिणाम आहेत. परंतु फी वाढविते वेळीं ह्या गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजे होत्या. ह्या खात्यांतील फी वाढवून उत्पन्न जास्त करण्यापेक्षां इतर खात्यांत खर्च कमी केला असतां ह्मणजे कांहींच अडचण नव्हती. आज जगतांत जितकीं राष्ट्रें आहेत तितक्यात प्रथमतः तेथें तेथें चालत असलेल्या विद्यां अगोदर लोकांना शिकविण्याकडे राजाचें मुख्य लक्ष्य असतें. सर्व शस्त्रांमध्यें मनुष्याला हतवीर्य करण्यास विद्येसारखें दुसरें बळवत्तर शस्त्र नाहीं. आतां इंग्रजांनीं नुकतांच ब्रह्म देश खालसा केला आहे. तेथील लोक अगदीं दांडगे आहेत याचें कारण काय? तर त्यांच्यांत विद्येचा अभाव या शिवाय कांहीं नाहीं. आतां तिकडे शाळाखातें सुरू केल्यास लोकांत एकदम बदल होऊन जाऊन जी हल्लीं जिवाची हानी व पैशाचा खर्च तिकडे होत असेल तो होणार नाहीं. विद्येनें लोक प्रबळ झाले तर त्यांचा सर्व जोर कायतो कागदपत्रांत. विद्येच्या जोरावर ते फक्त आपल्या हक्काविषयीं कदाचित् मागणी करितील, यापरते त्यांच्यानें कांहीं होणार नाहीं. विद्या रूपी शस्त्र पत्करेल. परंतु खऱ्या शस्त्राचा प्रभाव कठीण. असें आहे ह्मणून सर्व जगतात व हल्लीं जीं नांवाजलेलीं राष्ट्रें आहेत त्यांत ही प्रमुख मानितात. व जितकी देववेल तितकी विद्येच्या कामीं मदत देतात. असें असतां आमच्या ह्या बाल्यावस्थेंतील विद्येवर फिच्या रूपानें इतक्यांत गदा कां यावी हें प्रमजत नाहीं. कदाचित् आमच्या सरकारच्या मनांत असें वागत असेल कीं लोकांनीं आपलें शिक्षण आपल्या हातांत घ्यावें ह्मणजे सरकारावरचा भार कमी होईल. परंतु असें जोखमीचें काम हातीं घेण्यास विद्या व द्रव्य यांची मदत पाहिजे ती लोकांपाशीं आज नाहीं. व कालांतरानेंही ती त्याना मिळण्यासारखी नाहीं. ह्या प्रांतांत इंग्रजांचा अमल होऊन फक्त $\frac{1}{3}$ शतक झालें आहे. जिकडे $\frac{3}{4}$ शतक व जिकडे पुरें शतक झालें आहे तिकडेही लोक अद्याप स्वतंत्र रीतीनें विद्यालयें चालविण्यास मागें पुढें पहातात. जर इकडे सर्व गोष्टींचा अगोदरच अभाव आहे, विद्वान लोक नाहींत, पैसा नाहीं, गोडी नाहीं, अंगांत करतबगारी नाहीं, तेव्हां लोक आपल्या हातांत शिक्षण घेतील ह्मणणें ही केवळ ज्यांना असें वाटत असेल त्यांच्या मनाची भ्रांती आहे. असो, फी वाढल्यामुळें खाजगी शाळा उत्पन्न तर होणें कठीणच परंतु सरकारी शाळांतून जो सध्यां गरीबां गुरीबांना विद्या मिळत आहे ती मात्र बंद होईल- तर या गोष्टींच्या चालकांनीं ही गोष्ट मनांत आणावी हें बरें आहे. पत्रकर्ते राव कृपा करून स्थळ द्याल अशी आशा आहे. कळावें हें विनंती.

आपला प्रेमेच्छु
"क्ष"

मुक्काम वाशीम तारीख २४।१२।८७

रा. रा. वऱ्हाड समाचार पत्रकर्ते यांसः--

वि. वि. येथील पोष्टांत कांहीं पार्सल संबंधानें गडबड झाली. त्याची चौकशी करण्याकरितां मे. इन्स्पेक्टर व मे. सुपरीटेंडेंट साहेब, पोस्ट खातें, यांच्या स्वाऱ्या येथें येऊन गेल्या. या बाबदींत चौकशी करण्याकरितां आल्या होत्या असा बोलवा आहे. ही हकिकत अशी असल्याचें कळतें कीं, कांहीं दिवसांपूर्वीं एकाचे नांवचे बाहेरून व्ह्याल्युपेबल पार्सल आलें होतें. त्याची डिलिव्हरी ज्याची त्यास झाली मात्र त्याचेकडून घेतलेले पैसे पार्सल पाठविणाराकडे मनी ऑर्डर करून जावयाचें तें मात्र गेलें नाहींत असें ह्मणतात पार्सल आल्याचा दाखला हाफिसांत कोठें सापडत नाहीं. अशा ह्या गडबडीमुळें सदरहु स्वाऱ्या येऊन गेल्याचें समजतें. हें वर लिहिल्याप्रमाणें खरेंच घडलें असेल तर आतां कोणाचें नशीब फुटलें तें लवकरच बाहेर पडेल. हें विनंती.

आपला प्रेमेच्छु
"क्ष"

समाज सुधारणा,

(लिहून आलेला मजकूर)

इंग्लंड व फ्रांन्स या देशांचा इतिहास वाचीत असतां त्यांत राजप्रकरणीं व धर्म प्रकरणीं गोष्टींत मोठमोठाल्या उलाढाली झालेल्या आपल्या वाचनांत येतात व त्याबद्दल आपणांस एक प्रकारचें नवल वाटतें. परंतु आपल्या स्वतःच्या देशांतही या उलाढाली कांहीं कमी झाल्या नाहींत. श्रुति, स्मृति, पुराणें इत्यादिकांपासून दृष्टोत्पत्तीस येणारा अगदीं पुरातन काळाचा आपल्या देशाचा इतिहास अविश्वासनीय ह्मणून एकाकडे जरी ठेविला तरी अर्वाचीन पंडितांना विश्वासनीय असा अलीकडला ख्रिस्त शक सुरूं झाल्या नंतरचा आपल्या देशाचा इतिहासही या उलाढालींनीं ओतप्रोत भरलेला आहे. फार प्राचीन काळापासून सुवर्ण भूमि या नांवानें गाजत असल्या कारणानें परकीय देशांतील लांबलांबचे लोक यावर एकसारखे झडपा घालीत होते. आज कोण सेमिरामीस आली, उद्यां डरायस आला, परवां शिकंदर आला या फार प्राचीन कालच्या गोष्टी झाल्या. सबक्तगीन, अलबक्तगीन, महमद गझनवी, महमद गोरी, बाबर ही तर अगदीं अलीकडची मंडळी. या परकीय लोकांच्या स्वाऱ्यांची आपल्या देशांत एकसारखी झुंबड लागली होती. आपल्यास माहितच आहे कीं कोणत्याही देशांत कोणत्याही काळीं पहा राज्यप्रकरणांत परकीय लोक येऊन त्यांनीं राज्यक्रांति केली कीं ती बरोबर तद्देशीय लोकांचे सामाजिक आचार विचार बदलावयाचेच. आपल्या देशांत निरनिराळ्या जातींच्या परकीयांनीं येऊन आपापलीं राज्यें कांहीं नियमित काळपर्यंत स्थापन केलीं त्यां बरोबर त्यांचे आचार विचारही कांहीं अंशीं आपल्या लोकांत शिरले. फार प्राचीन काळची आपल्यास माहिती नाहीं परंतु मुसलमानी राजांचा परिणाम आपल्या लोकांवर कसा झाला आहे हें आपण आज प्रत्यक्ष पहात आहों. त्यांच्या दरबारी रीती आपण घेतल्या, त्यांचे पेहराव आपण घेतले; त्यांची भाषा घेतली, व कांहीं अंशीं त्यांचें सामाजिक आचारही घेतले. या गोष्टी आपण परकीयांपासून घेतल्या असूनही त्या आपल्याला इतक्या चिकटून बसल्या आहेत कीं बराच काळ पर्यंत स्वराज्याखालीं असूनही त्या आपल्याला सोडतां आल्या नाहींत. देशाच्या सामाजिक स्थितीवर परकीय अमलाचा कसा परिणाम होतो याचा अनुभव या गोष्टींवरून आपल्यास पक्का आलेला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. सध्यां आपल्यावर महाप्रतापी आंग्लभौमांची सत्ता आहे. हे लोकही आपल्याला परकीयच आहेत अर्वाचीन पंडितांच्या मताप्रमाणें त्यांचें आपलें मूळ एकच असें जरी मानिलें तरी त्यांच्या जन्म भूमींत सहस्रावधि कोसाचें अंतर असल्या कारणानें त्यांचे आपले आचार विचार परस्परांपासून फारच भिन्न आहेत. या लोकांच्या सत्तेचा परिणाम आपल्या सामाजिक स्थितावर जसा होत आहे तसा पूर्वीं कोणत्याही काळीं झाला नसेल. आजपर्यंत आपल्यावर ज्या ज्या परकीय लोकांनीं अंमल केला त्यापैकीं एतद्देशीय लोकांची अवस्था सुधारून त्याना सुधारणा, विद्या यांचा संसर्ग करून देण्याचें फारच थोड्या राज्यकर्त्यांनीं मनांत आणिलें असेल. आपल्या हल्लींच्या प्रभूनीं आपल्याला जिंकून सर्वस्व मिळविलें खरें; तथापि आपली मानसीक स्थिति सुधारण्याकरितां त्यांनीं पुष्कळ परिश्रम केले आहेत व अद्याप ते करीत आहेत. आपल्या लोकांना या प्रभूच्या अमलाखालीं विद्येची गोडी पुष्कळ लागत चालली आहे. पाश्चिमात्य लोक सुधारलेल्या लोकांत गणले जात आहेत तेव्हां त्यांच्या समाज स्थितीचें अवलोकन करून तिचें अनुकरण करण्याकडे आपल्या लोकांची प्रवृत्ति बरीच होत आहे. सारांश सुधारणा व ज्ञान यांचा प्रसार आपल्या देशांत झाल्या कारणानें आपल्या लोकांत नवीनच जीव उत्पन्न होऊन आपल्या समाज स्थितीची स्वरूपें बदलत चाललीं आहेत. कांहीं वर्षांनीं तर आपल्यांत पूर्ण स्थित्यंतर होईल असाही कित्येक दूरदर्शी विद्वानांचा तर्क चालत आहे.

सहामाही ११
साल अखेर ११
किरकोळ ....

भाषणें इ
खेंडकार
वा ह्या
ऊन
त्री
ठे
ओ.

नोटिशीब _ड.
१० ओळीचे आंत रु.१
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस.........०१

...ें ना-
...क गोष्ट
...गजे झालें.
ह्या सभेचा
...त आहे हें
...पिंकरून उ-
...णावह आहे.

VLO. XXII
वर्ष २२

...machar

...JARY

ANI
...88

SUCCESS! SUCC...

We announ... ...eelings of deep satisfaction th... third National Congress which ...nced its sittings at Madras on ...lay last; is a decided success. ...appearance of a large number ...gates coming from the different p... ...f India and representing various... ...ions of Native Community is a tota... singular phenomeno in the political ...als of India. Even the Anglo-Indian who have been looking upon this ...tional gathering as a mere sham have now began to perceive the real significance of this political movement. But there is one thing which ought to be particularly borne in mind by the leaders of this political gathering that inspite of the opposition of the Anglo-Indian community they should persevere in their efforts until they derive substantial benefits from this political agitation. Even in England which is the seat of political independence and constitutional freedom, men like Sir Robert Reel, Coleden, and others were required to spend years of dogged perseverence and persistent effort before they could succeed in introducing the principles of freetrade in England. The political agitation in favour of the abolition of slave trade, tells the same tale.

The cordial reception which was accorded to the delegates reflects credit on the Madras Reception Committee of which Raja Sir T. Madhavarao is the president. Raja Madhava, in an eloquent speech delivered at the commencement of the congress; made a graceful allusion to the princely character of the reception which was accorded by the Bombay and Calcutta friends to the members of the congress in the two succeeding years.

'After speaking in high terms, of the wisdom, justice and generosity of the British rule, he pointed out that the action of various political forces has created the necessity of having such a gathering to develop and complete the work of political regeneration of India. Then on the motion Babu Surendra nath Banarji of Calcutta, and seconded by Subramanya Jyer the Hon Badroon Tayabje was called to the chair which he assumed amidst loud applause and cheers.

He in the course of his address said he had no hesitation in declaring that the two previous Congresses displayed an amount of talent, ability and eloquence, with which they had every reason to be satisfied There were 650 to 700 delegates, representing all the different parts and all the different communites, of this great Empire. He thought they were fairly entitled to say that this was truly a representative national gathering. If a representative institution, such as was so often asked for from Government, were granted, he had no doubt that many gentlemen now present would be elected members. It had been urged in derogation of their character as a representative national gathering that one great and important community, the Mussulmans, had kept aloof from previous Congresses. This was only partially true and was applicable to only one particular part of India, and was rather due to certain special local temporary causes which could not be urged against the present Congress. There was nothing which should induce the leaders of any particular community to aloof from others in the common efforts to obtain those general reforms and rights which were for the benefit of us all. So far as general political questions affecting the whole of India were concerned, he could not understand why Mussulmans should not work shoulder to shoulder with their fellow-countrymen of other races and creeds for the common benefit of all. This principle had been acted upon in Bombay.

It was frequently asserted, in certain quarters, that the supporters of the Congress were merely a few educated men. If by that it was intended to convey that they were merely a crowd of people with nothing but education to recommend them if it was intended to be convey ed that the gentry, nobility, and aristocracy of India had kept aloof from them, he could only meet that assertion by the most direct and absolute denial, and invite people who thought otherwise, to look around that hall. Educated persons were better qualified to appreciate blessings of good government than iguorant peasants. If there were ever to arise a great struggle, which God forbid, between Russia and England, the Mahomedans would be found shoulder to shoulder with the other communities in supporting England. Educated natives were best able to judge of the relative merits of the two Empires. The educated natives were best qualified because they knew and appreciated the blessing of the right of public meeting and the right of liberty of action and speech now enjoyed under Great Britain, whereas probably in Russia they would have nothing but a despotic and oppressive military nation. Educated natives by mere force of their education must be the best appreciators of the blessings of a civilized and intelligent Government, and therefore in their own interests the best and staunchest supporters of the British Government in India.

At the close of the first sitting, a sub committee was appointed to frame a constitution of the Congress.

We have always said that for the welfare of the people and the revival of native arts establishment of indus trial schools in India is necessary. We have also thought with disappointment that it would be long before we would see such schools established in Berar. But hope has sprung out of the depths of despair. The Government of India has, we hear, sanctioned the establishment of two Industrial schools in this Province— one at Akola and the other at Amraoti as an experiment to be tried for three years, and held out a hope that if the experiment proves a success the institutions will be put on a firm and permanent basis. Proposals regarding the subjects to be taught in the schools, supervision to be exercised over institutions, and other details, have been made by the local authorities. Carpentry, smithery, tailoring and shoe making are the subjects proposed to be taught. The schools will have paid teachers from America, or elsewhere, if possible. They will be independent institutions or will be attached to High Schools as classes for industrial education. The independent institution at Akola will be placed under the supervision of Rvd. Mr. Fuller of the American mission. Such or nearly such are the proposals. They are sent to some native gentlemen for opinion.

The subjects, except shoe-making are well chosen. Shoemaking will be strongly objected to by all the classes of Hindus except shoemakers; nay, the people will conceive wrong ideas about the motives of Government in establishing these schools, and the efforts to give and popularize the industrial education among all the classes of people will be frustrated if shoe making is one of the subjects. Similarly, the supervision of Rvd. Mr. Fuller over the institutions will render them unpopular.

As both the Director of Public Instruction and the Resident are men of education and experiene and have full knowledge of Berar we hope they will not ignore the public opinion and the schme. they will derive will meet with approval of the people.

CORRESPONDENCE.

To,
The Editor of Berar Samachar,
Akola.

Sir,

They say Jalgaon was a right merry and prosperous place some years ago. But alas! the rough hand of Time has, with its usual relentlessness, changed every aspect of the place. Where the road was formerly lined by shops of rich bankers busily engaged in various kinds of commercial transactions, there is nothing to be seen now but a row of miserably delapidated houses with awful gaps between, working ominously at the passers by. The site of the weekly Bazar has been deserted and is now overgrown with weeds and other kinds of rank vegitation. An awful waste of swamps has taken the place of the rich plantations and the thriving corn-fields which had once surrounded the town and given it a comely appearance. A change in the aspect of the surrounding country has naturally brought about a corresponding change in its climate and what was once loudly spoken of as a healthy and comfortable place is now condemned by all as unhealthy and malarious. Every season carries its inclemency to the highest pitch here; the blazing summer opens all his furnaces and works them with full force; the angry Jupitor Pluvius rolls about with thunder and lightning, and pours down the contents of his cellars in mighty streams; and last, not the least, the Hoary winter comes in frowning upon the already weather-beaten population, threatening to chill down the very marrow in their bones. To make the matters worse, worthy Editor, there is no leaving here; no feeling like sympathy, no institution like society. In short the living here is a mere humdrum of wretched and monotonous existence.

There was indeed great bustle and existence in the town as long as the Extra Assistant Commissioner's Court was here. But evers its since removal to Telhara the place has become like one deserted. The present biggest functionary of the place is the Tehsildar. The gentleman who held this responsible post here so long was a Mahomedan gentleman who, although a good man in himself, scarcely ever mixed with society. He was a quiet man and was almost never seen in public except when on his way from and to the cutchery.

The present helmsman of the office is a promissing and energetic young man and promises to be very popular and useful to the public. Ever since his comig here he has been engaged in the herculian task of cleaning the augean stables left disordered and unclean by his predecessor.

A movement was set on foot some days ago, by the civic fathers of the town, to arrange for the continuation of standard VIII in the Local A. V. School. They have, I hear, succeeded in raising the necessary amount of fees, Mr. Dinanath Gopal, the wellknown Sahukar of the place, contributing handsomely with his usual generosity. I hope the Educational authorities will accord a favouradle consideration to their prayer and grant it as requested.

By the bye the account of the picture-album given by your Marathi correspondent of this place and published by you in you last is a true one. I have seen the pictures myself and can say they are really worth looking and worth pubishing too. Hoping to be excused for prolixity.

Jalgaon, 28th December, 1887.

I remain
faithfully yours
Rover

वऱ्हाड.

हवामान:—दानीं आकाश आच्छादित असतें. हवा बगदीं बिघडली आहे. मधून मधून पावसाच्या लहान लहान सरी येतात. रब्बीचे पिकांस फार भीति आहे.

मे० कमिशनर साहेबांची स्वारी आणखी थोडे दिवस येथें राहणार.

क्याप्टन् मॉरिस् असि० कमिशनर खामगांव येथें गेले आठवड्यांत आले होते. ते लवकरच रजेवर जाणार म्हणून समजतें.

रा. रा. दामोदर नानाजी यानीं गे... आठवड्यांत येथील स्मालकाज कोर्टांतील क्लार्क आफ कोर्टाचे जागेचा चार्ज घेतला, व रा.रा. हरिहर काशिनाथ हे आपले जुडिशि० कमि० आफिसांतील हे० क्लार्कचे जागी परत गेले.

रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे येथील हे० क० चे क्लार्क आफ कोर्ट यांची येवतमाळास बदली झाली व ते एकदोन दिवसात तिकडे जाणार त्याचे जागीं मि. महमद इस्मायल येवतमाळ डे० क० चे क्लार्क आफ कोर्ट येथें बदलून येणार.

जळगांवचे तहशिलदार काजी बद्रुद्दीन यानीं पेनशन घेतल्यामुळें त्याचे जागी रा. रा. एकनाथ मोरेश्वर यांस १७५रु० वर नेमले व यांचे १२५ रु० चे जागेवर रा. रा. यशवंतराव महादेव यांस कायम केलें.

रा. रा. दामोदर गणेश पाध्ये हे एम्. ए. च्या परिक्षेत सेकंड क्लासांत पसार झाले, या वरून त्यांस एलफिन्स्टन कालेजांत १२० रु. वर सिनियर फेलो नेमलें. हें कळविण्यास आम्हास फार आनंद वाटतो.

मे. कर्नल बुलक साहेब ड. क. उमरावती, यांनीं, आपल्या जिल्ह्यांत जे सरदार लोक दौऱ्यावर फिरतात त्यांनकडून लोकांस सरबराईचे पैसे योग्यरीतीनें मिळावे म्हणून एक सरक्युलर केले आहे. त्यांत त्यांनीं सर्व जिनसांचे दर ठरवून दिले आहेत व ह्या दराप्रमाणें सरदार लोकांनीं पैसे द्यावे व त्यांचे बरोबरचे लोकांनीं ही दिले आहेत किंवा नाही हे पाहावे असे म्हटलें आहे. ठरविलेले दर माफक आहेत. ह्या कृत्या बद्दल मे० बुलक साहेबांची स्तुती करावी तितकी थोडीच.

वर्तमानसार.

ब्रह्मदेशच्या लढाईमुळें कमी झालेली डाक्तरांची संख्या भरून काढण्याकरितां विलायतेहून नवीन १६० सर्जन्स रवाना करण्यांत आले आहेत.

गेल्या वर्षी वऱ्हाडाच्या उत्पन्नांतून नीशिल्लक राहिली ती २॥। लक्ष रुपये होती. ती निजाम सरकारास परत देण्यांत आली.

ब्रह्मचाऱ्यांवर कर—असें म्हणतात कीं, व्हियेना येथील अविवाहित परंतु, कुटुंब पोषणाची शक्ति ज्यांच्या मध्यें आहे अशा लोकांवर कर बसविणार असेत.

कराचे मान इंडस्ट्रीज नामक पत्रावरून कराचें पुढील मान येत असे: फ्रान्स. माणसीकर ७८.९६; इंग्लंड ६२. ७७; जर्मनी, ५०.८७; स्पेन, ४८. ४२; ऑस्ट्रिया हंगारी ४८. २२; इतालि, ४७.४४; आणि रशिया २९. ४७; फ्रांदिगा.

धुलिपतिंगानें नानकपंथ प्रकाशसभा उभारली असून त्यास हिंदुस्थानांतून साह्य मागण्याची खटपट गुप्त रीतीनें चालली आहे. ही बातमी गोपाळचंद्र छतरजी फरीदकोट संस्थानचे प्रधान यांनीं सिविल मिलटरी गा० कचेरीस तार पाठविली यावरून स्पष्ट होत आहे. क०

आनरेबल रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक जे पी. सी. एस. आय यांनीं स्वदेशहितासाठीं आजपर्यंत जी अव्याहत मेहनत केली व करीत आहेत, त्याकडे लक्ष देऊन आमच्या मुंबईकरांची सर दिनशा माणकजी पिटिट यांच्या बंगल्यांत एक सभा भरली होती. या प्रसंगीं रावसाहेब मंडलीकासारख्या सार्वजनिक हितचिंतकाच्या स्तुत्य कृत्याबद्दल कांहीं तरी योग्य स्मारक व्हावें असें ठरलें. परंतु, कित्येक कुटिलांस ते सहन न होऊन बॉबेग्याझेट, इंदुप्रकाश, जामे जमशेट वगैरे पत्रांत त्यांच्या विरुद्ध बरीच चर्चा चालूं झाली आहे. जग त्रिविध आहे म्हणा तोंड्यात ठेवणे फार कठीण आहे. धर्म संबंधानें रावसाहेबांचे विचार जुन्या मताचे असले, तथापि सामाजिक व राजकीय कामांत त्यांनी जे आपले खरें कर्तव्य बजाविलें आहे त्याबद्दल आमचीं योग्य संभावना झालीच पाहिजे असें आम्हीं प्रांजळपणे कबूल करितों रावसाहेबांसारखी, निस्पृही, दूरदर्शी, राजकार्यकुशल, व सामुदायिक हिताकडे पूर्ण लक्ष देऊन स्पष्ट रीतीनें भांडणारी एतद्देशीय मंडळी फारच थोडी निघेल. अशी रत्नें आमच्या देशांत उत्तरोत्तर अधिक निपजोत व आमचे राष्ट्रीय हित आमच्या हातून होवो व आमची आमच्या लोकांकडून अशीच संभावना घडो.

हिंदुस्थानचे व्हाइसराय (गव्हरनरजनरल) आपल्या मंडळीसह लाहोर येथील बादशाही मशीद पाहाण्यास गेले होते. या वेळीं तेथें एतद्देशीय लोकांचा पुष्कळ जमाव झाला होता. व्हाइसराय साहेबांनीं तेथील खान बहादुर महमद बरकत अलीखान यांस ' आपणास फारशी समजतें काय ' म्हणून प्रश्न केला. आज कडून ' होय ' असा जबाब मिळाल्यावर व्हाइसराय यांनीं आंजबरोबर फारशी भाषेंत मोठ्या उत्तम रीतीनें भाषण केलें, आणि मोठ्या खुषीनें तेथील मुलांची फारशी, उर्दू वगैरे भाषांत परीक्षा घेतली. मुलांनी या प्रसंगीं कुराणांतील ११ वा भाग वाचला. मुलांचा अभ्यास पाहून व्हाइसराय बहुत खुष झाले.

'सखारीन' नामक एक अति मिष्ठ पदार्थ अलीकडे कूपर मादन कंपनीत आला आहे. तो साखरेचे काम करितो. हा पदार्थ जिभेवर ठेवला म्हणजे अमळ कडू आहे असें वाटते. पण मागाहून तोंड फार गोड होउन जातें! ह्या पदार्थाचे पांच ग्रेन टाकले म्हणजे एक पेलाभर चहा पिण्यासारखा गोड होतो.

जबलपुराजवळ श्री. नर्मदेच्या तटाकीं कांहीं ढोंगी साधु अनुष्ठानास बसले होते. तेव्हां एक स्त्री तांग्यांत बसून जबलपुराकडे येत होती. तिनें बुवाजींस पाहून नमस्कार केला. तेव्हां ढोंगी बुवा म्हणाले 'मया' हमारे मठका दर्शन लेनेकु चलो. हें एकून तिनें तांगेवाल्यास तसेच तेथें उभें राहण्यास सांगून आपण बुवाजींच्या मागें बरीच दूरवर गेली, तेथें गेल्यावर बुवाजींच्या एका साथीदारानें तरवार उपसून तिला ठार मारून टाकले हें पापकृत्य एका फिरस्त्यानें पाहून तो धावून आला, व त्यानें आपल्या सोट्यानें त्या ढोंगी बुवास बेदम मारून, त्याची तरवार हिसकून घेऊन, त्यास पोलिसाच्या ताब्यांत दिलें. आतां सदर मुकद्दमा सेशनात चालूं आहे.

अमेरिकेत चिकागो नजीक ब्रिजपोर्ट येथें कपड्यास लावण्याच्या गुंड्यांचा कारखाना आहे. या कारखान्यांत रक्ताच्या गुंड्या करितात. ते सुद्धां शुद्ध गाईचें रक्त. या कारखान्यांत निम्म पन्नास साठ खंडी रक्ताचाखप आहे! केवळ कपड्यास लावण्याच्या गुंड्याच तयार करतात असें नाहीं, तर कानांत घालण्याचे लोलक, कंगवे, फण्याही करितात. हा माल इकडे आला तर खपेल का !!

इंग्लंडांतील एका काचेच्या कारखानदारास एतद्देशीय कोणा शौकीन राजाबिंड्यानें काचेचा छपर पलंग तयार करण्यास सांगितला आहे. हा पलंग निवळ स्वच्छ काचेचा असून, त्यांत धातूचा किंवा लांकडाचा लवलेश ही नसावा अशी व्यवस्था आहे. शिवाय हिऱ्याची जडणी वरती होणार आहे. असेंही करणारे हे राजश्री कोण असावे बरे ? ते०

भयंकर मनुष्य हानि—एक चिनी आगबोट ५००उतारू घेऊन जात असतां वाटेतच जळून खाक झाली. तिच्यावरील ३०० पेक्षां जास्त उतारू जळून किंवा बुडून मेले. काय अनर्थ !!

अप घात-- अमेरिकेत एका पशुस ग्रहालयास नुक्तीच आग लागली. अजमासें पंचवीस लाख रुपयांचें नुकसान झालें. याठिकाणीं नानाप्रकारचे वनपशु व इतर पाळीव जनावरें होतीं त्यांपैकीं कांहीं. राहिले नाहीं. इतके प्राणी राहण्यासारखी टोलेजंग इमारत, पण १५ मिनिटांत जमीनदोस्त झाला! त्या भयंकर आगीच्या कोपाच्यांत सिंह, व्याघ्र हत्ती इत्यादि जनावरांचा होम चाललेला पाहून लोक थरारून गेले. एक दोन सिंह तर सुटून गांवांत सैरावैरां धाऊं लागले; तेव्हां लोकांची जी तारांबळ उडाली ती अवर्णनीय होती. असो; पण मनुष्य घात झाला नाहीं. कोणहा विध्वंस !

नवीन शोध--भोजन समारंभाचे वेळीं मोठ मोठ्या पंक्तीत वाढण्याचे काम विजेच्या योगानें चालणाऱ्या लहान आगगाड्यां कडून करविण्याची युक्ति फ्रेंच लोकांनीं काढिली आहे.

बर्लिन येथें एकानें विजेचा एक दिवा तयार केला आहे. त्याचा उजेड ५० मेणबत्यांच्या उजेडा इतका असतो. तो डोकीवर बसवून पानबुड्यास पाण्याच्या तळीं जातां येतें व त्याचे प्रकाशामुळें तळचे पदार्थ त्यास पाहण्यास फार सुलभ होतें.

दगडाच्या खाणी--टांकीन येथें संगमरवरी दगडाच्या खाणी सांपडल्या आहेत व एका फ्रेंच कंपनीनें तेथें आपला कारखाना सुरु केला आहे.

भयंकर स्त्रिया--सिंगिंप येथें गेल्या वर्षांत तरुण शेतकरी फार मरण पावले. त्यांत असें आढळून आलें कीं, लग्न झाल्या बरोबर मरण पावणारांची संख्या अधिक आहे. पुढें शोध करितां असें कळतें कीं, जमीन जुमल्याच्या लोभानें बायकांनीं नवऱ्यास विषप्रयोग केला आहे. यासंबंधानें बऱ्याच बायका पकडल्या आहेत.

सौभाग्यवती काशीबाई कानीटकर रा. सा. गोविंद वासुदेव कानीठकर यांची पत्नी ह्यांच्या कडून कै. आनंदीबाईचें चरित्र लिहिण्याचें काम होत आहे हें एकून सर्वास आनंद होईल कारण आनंदीबाई सारख्या स्त्रीचें चरित्र स्त्री कडून लिहिलें जात आहे ही गोष्ट विशेष आनंदाची आहे.

हुशार डाक्टर--डाक्टर डाक्टर! लौकर चल, आईची तब्यत फार बिघडली ! तिनें डोळे पाढरे केले ! डाक्टर-- "चल तर पुढें हो, आणि तिच्या डोळ्यांत काजळ घाल तों मी हा आलोच तुझ्या मागोमाग ! "

जाहिरात.

टपाल खर्च ८४ आणें

वनौषधी खासा प्रमाणें.

किमत एक बाटलीस १॥ रुपया

औषधा सोबत कागद व चमचा.

फक्त एकाच औषधापासून खालीं लिहिलेले सर्व प्रकारचे रोग दूर होतात, व त्या संबंधानें झालेला पत्रव्यवहार व सर्टिफिकिटें स्थल संकोचास्तव न देतां रोगांचीं नांवें मात्र दिलीं आहेत. उपदंशजन्य गरमीचे अनेक प्रकारचे रोग, धातू, खर, स्त्रियांस धुपणी लागते ती रक्त दूषीत झाल्यापासून हाता पायांवर डाग पडणें, सर्व त्वचेचे रोग, कच्चा पारा सेवन केल्यानें सूज येणें, कळा लागणें व सर्व प्रकारचा संधी वायू, गंडमाळा, पिनस, जळवात, कडकी, अम्ल पित्त, पोटशूळ पोट फुगी, नळ वायू, मस्तक शूळ व मुखरोग, जिभेवरील चट्टे, दातांतून पू येणें, रक्त येणें व तोंडाची दुर्गंधी आदिकरून सर्व रोग वरील औषधानें बरे होतात.

☞ पत्ता—मुंबई फणस वाडींत बाळकृष्ण भिवाजी नाखवा याचे चाळींत डॉ. धाकजी भानजी सांवत.

Dr. D. B. sawant.
30-12-1887

विक्रीस तयार.

सटीक सिव्हिल प्रोसिजर कोड.

म्हणजे दिवाणी काम चालविण्याचे रीतीविषयींचा.

सन १८८९ चा.

(परिशिष्ट
किं. रु.

चार.

सटीक
म्हणजे फौजदा

सन १८८
हा सन १८८४८८ इ०
चा आक्ट १०

किं. ५ रु. ट. हं. पुनः मे. एबल. पा. हे दोन्हीं व पु- कुळा तऱ्हाळूपे मुंबई, मद्रास, अलाहाबाद, व कलकत्ता झा- येथील हायकोर्टांचे निवाड्यांसह सटीक वें ला- केले आहेत.

—ऽ वि-

रेश्वर

न्याय

ते

ची

म्हणा

न्यायाचीं मूळतत्वें आणि न्यायकसे करावे

याविषयीं.

किं० अडीच रु० टपाल हशील दोन आणे.

☞ सदर पुस्तकांच्या एकदम १० प्रती घेतल्यास १ प्रत कमिशनाबद्दल फुकट देण्यांत येईल, कळावें. ता. १ डिसेंबर १८८७.

भाऊ गोविंद सापकर,
ज्ञानचक्षूचे मालक, पुणें.

विक्रीस तयार.

SAPKAR'S DIARY
FOR 1888
WITH CALENDAR FOR 1888.

सापकरांची रोजनिशी

सन १८८८ सालांकरिता.

यांत मराठी तिथी, वार, महिनें, सूर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहण, सण, सरकारी आफिसांत व दिवाणी कोर्टांस असणाऱ्या सुट्या, मौन्जी विवाहाचें मुहूर्त, इंग्रजी व मुसलमानी महिनें, तारखा, रेलवे, तारायंत्र, स्टांप, मनिआर्डर्स, पोस्ट, मुंबई ब्यांकेच्या रुळी, सिव्हील प्रोसिजर, मुदतीचा, विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टांप, कोर्ट फी, पोलीस गाईड, दिस्त्रीक्ट आणि गांवचें पोलिस, क्रिमिनल प्रोसिजर इत्यादि नेहमीं जरूर लागणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे. व रोजमुरा चुकता करण्याचें माहितीचें कोष्टक दिलें आहे, अखेरीस जमा खर्चाच्या सदरांचीं व कांहीं कोरीं पृष्ठें जोडलीं आहेत.

रोजनिशीची किंमत.	ट.	हां.
प्रत नंबर १.....	०१२	०२
प्रत नंबर २.....	०८	०१॥
प्रत नंबर ३.....	०७	०१॥

किंमतीबद्दल रोख पैसे आह्मांकडे पाठविले असतां रोजनिशी रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर,
ज्ञान चक्षूचे मालक.

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही " ०८
साल अखेर " १०१८
किरकोळ ०४

नोटिशीब ल.
१० ओळीचे आंत रु.१
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस.....०१

Per annum in advance 9 Postage
Per annum in arrears 7 „ 1R.
Six monthly ..... 3 „
Single copy .....

Advertisements
Below 10 lines.
Per line over 10...
Repetition per line

वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VLO. XXII AKOLA MONDAY 9 JANUARY 1888. NO2

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख ९ माहे जानेवारी सन १८८८ इ० अंक २

SUCCESS! SUCCESS!! SUCCESS!!!

Competition Challenged! Competition Challenged!!

"Comparison alone is the true test of quality."

A boon to the suffering humanity.

THE ELECTRO GALVANIC RINGS & LOCKETS.

Approved and Recommended by the Modern.

Improved Science of the Day.

TEST, COMPARE AND THEN BUY.

TESTIMONIALS TOO NUMEROUS TO MENTION.

Since the last 12 years we have been manufacturing the Electro Galvanic Rings, and Lockets &c. We can boldly and emphatically assert that our manufactory has already earned a World-wide reputation for genuine production of accomplished workmanship and finest cut. It is needless to mention that the power of electricity has been unanimously pronounced as the most infallible remedial agent in curing the most obstinate and protracted maladies which the human flesh is heir to. It is used next to skin. It acts as a safe guard against the attack of cholera and all sorts of epidemics when used on a healthy and robust constitution. Where doctors and all the existing healing arts have failed to effect any remedy-our Electro-Galvanic Rings-have been found to effect a miraculous cure. In chronic and painful cases given up by doctors as hopeless it has acted as a charm.

It is a pity that some unlettered folks have been deluding the public with heir unusual grandiloquent and trumpetting advertisements by styling them selves as sole manufacturers of Electric Rings &c. whereas they are selling brass stuff in disguise of electricity. We have, the assistance and co-operation of some practical scientific men introduced this Electric Galvanic Rings on the recognised basis of modern Science. We can boldly challenge all the existing vendors or manufacturers of the supposed Electro Galvanic Rings and Lockets&c. To prove our assertion and to experiment the igenuineness of the existance of elecricity in our production, we request ardently every buyer to place the ring on the ongue, when an immediate and unspeakable sensation would be created-should it prove otherwise, we would refund the value. It serves both the purpose of medicine and ornament as medicine it cures all diseases and prolongs the life, as ornament it enhances the affected beauty and adds lustre to the frame. Considering combination of all advantages, we wish no human life should be without it.

Honesty is our Policy-Benevolence is our aims- Dissemminaton of scientific truth is our ends.

Silver Ring Rs.3. Silver Locket Rs.2
Gold Ring Rs.18. Gold Locket Rs. 20.

N. B. Beware of worthless. imitation. Seeing our large and increasing sale in the market and mofasil some wicked people have been surreptitiously imitating our articles.

24, Mirzapur Street, Calcutta. } K. C. Dass. & Co. Watch-Makers, Jewellers and Order Suppliers,

जाहिरात.

टपाल खर्च ०४ आणें

वनौषधी सार्सा प्रमाणें.

किमत एक बाटलीस १॥ रुपया
औषधी सोबत कागद व चमचा.

फक्त एकाच औषधापासून खालीं लिहिलेले सर्व प्रकारचे रोग दूर होतात, व त्या संबंधानें झालेला पत्रव्यवहार व सार्टिफिकिटें स्थल संकोचास्तव न देतां रोगांचीं नांवें मात्र दिलीं आहेत. उपदंशजन्य गरमीचे अनेक प्रकारचे रोग, धातू, खर, स्त्रियांस धुपणी लागते ती रक्त दूषीत झाल्यापासून हाता पायांवर डाग पडणें, सर्व त्वचेचे रोग, कच्चा पारा सेवन केल्यानें सूज येणें, कळा लागणें व सर्व प्रकारचा संधी वायू, गंडमाळा, पिनस, जळवात, कडकी, अम्ल पित्त, पोटशूळ पोट फुगी, नळ वायू, मस्तक शूळ व मुखरोग, जिभेवरील चट्टे, दातांतून पू येणें, रक्त येणें व तोंडाची दुर्गंधी आदिकरून सर्व रोग वरील औषधानें बरे होतात.

☞ पत्ता—मुंबई फणसवाडींत बाळकृष्ण भिवाजी नाखवा याचे चाळींत डा. धाकजी भानजी सांवत.

Dr. D. B. sawant.
30-12-1887

पत्रव्यवहार.

ह्यासदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते.

कृतानेक सा. नमस्कार विनंती विशेष सालमजकुरच्या मॅट्रीक्युलेशनच्या परिक्षेंत उमरावती हायस्कुलानें बाहार करून सोडली. आकोला हायस्कुलाला खालीं पाहाण्यास लाविलें. उमरावती हायस्कुल पहिल्या प्रथम मे. एट्कीन साहेब यांच्या ताळ्यांत होतें. त्या वेळीं त्या स्कुलचा निकाल चांगला होत नसे परंतु त्या वेळीं शिक्षक मंडळ त्यांच्या हाताखालीं चांगलें नव्हतें त्यामुळें कदाचित् तसा प्रकार होत असावा असें तेव्हां कित्येक म्हणत असत. पुढें त्याच हायस्कुलावर मे मॅकींटॉश सा० यांची नेमणुक झाली. मध्यें त्यांच्या कारकिर्दींत तें स्कुल गटकळ्या खाऊं लागले व सा० रजेवर गेलें तेव्हां त्या स्कुलावर रावसाहेब श्रीराम भिकाजी जठार बी. ए. यांची कांहीं दिवस नेमणुक झाली. त्यांच्या थोड्याच दिवसांच्या कारकीर्दींत कोंड्याचा मांडा करून सोडला व स्कुलाची उत्कृष्ट स्थिती करून दाखविली. त्या पूर्वी नेटीव हेडमास्तर हायस्कुलांवर वऱ्हाडांत नव्हते. व तेव्हांपासून हळु हळु नेटीव हेडमास्तरांची पैरवी होत चालली. पुनः मे. मॅकींटॉश साहेब रजेवरून परत आले व पुनःस्कुलाची खराबी होण्याची सुरूवात झाली. इतक्यांत साहेब बाहादुरांनाच जावें लागलें. पुढें त्या स्कुलावर वऱ्हाडांतील विद्वान् मुकुटमणी रा. रा. विष्णु मोरेश्वर माहाजनी एम्. ए. यांची योजना झाली तेव्हां त्यांच्या अमलाखालीं त्या विद्यालयाची चांगली स्थिती सुधारून पुष्कळ मुलें पास झालीं. त्यांची बरी सरकारा पर्यंत किर्ती होऊन व्यक्ती विशिष्ट म्हणुन त्यांना अधीक पगार ही मिळूं लागला. नंतर त्यांची बदली आकोल्यास झाल्यावर त्या जागीं रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर यांची नेमणुक झाली. त्यावेळीं पुष्कळांना शंका कांहीं वाटली कीं मिस्तर माहाजनीनीं बांधलेली ईमारत खाली पडेल. परंतु मिस्तर तळवळकर यांनी ती कायम राखली ईतकेच नाहीं तर त्यांत अधीक करामत करून दाखविली व त्यांच्याविषयीं आकोल्याहुन उमरावतीस हेडमास्तरचे जागीं जातांना जी लोकांना शंका वाटत होती ती शंका नाहींशी झाली इतकेंच नाहीं तर तेच लोक आतां मिस्तर तळवळकर यांची स्तुती करूं लागले आहेत. व याहून त्या हायस्कुलाची अधीक भरभराट होईल असें मनापासून म्हणतात. मिस्तर तळवळकर यांना जे शिक्षकमंडळ मिळालें आहे. तें फार विद्वान् एकोप्यानें वागणारें असें आहे. तेव्हां तिकडील हायस्कुलानें अकोल्यावर तान केली यांत नवल तें काय. मिस्तर एटकीन हे आतां एकटेच या खात्यांत युरोपियन राहिलें आहेत तेव्हां कदाचित त्यांचें मन लागत नसेल. अथवा त्यांना मिळालेलें शिक्षकमंडळ त्यांच्या मनोदया प्रमाणें नसेल. इकडे दोनच बी. ए. परंतु उमरावतीस चार बि. ए. इतका दोनही स्कुलांमध्यें फरक कां असावा व फ. अ. हा हेडमास्तरांचा उजवा हात असतो. तेव्हां त्यांचें व मुख्याचें निरंतर ऐक्य असले पाहिजे आतां त्यांच्या मध्यें ऐक्य नाहीं असें जरी म्हणतां येत नाहीं तरी आकोले हायस्कुलचे फ. अ. हे मिस्तर एटकीन यांचे शिष्य होत. तेव्हां कदाचित् फ. अ. यांचे जितकें चाललें पाहिजे तितकें चालत नसेल अगर मुख्यांना त्याचेकडून तसें चालणें आवडत नसेल. खरें कांहीं असो परंतु दोन्ही हायस्कुलें एकाच खात्याचीं आहेत तेव्हां एकामध्यें जितके विद्वान् लोक असतील तितकेच दुसऱ्यामध्यें पाहिजेत. व तसें झालें ह्मणजे मि. एटकीन आपले शिक्षक मंडळाचे ऐकणार नाहींत असें कधींही होणार नाहीं. गेल्या सालीं अकोल्याचा निकाल चांगला झाला तो मि. महाजनी यांच्या श्रमामुळें झाला. सालमजकुरीं असा प्रकार तो मि. एटकीन साहेब यांच्यामुळें झाला असें जे लोकांना वाटत आहे तें मात्र आंतील गोष्टींचा विचार केला तर चुकीचे आहे असें दिसून येईल. मि एटकीन मागतील ते शिक्षक त्यांस द्यावेत मग जर त्यांच्याकडून चांगला निकाल दाखविला गेला नाहीं तर मग लोकांना शंका आल्यासही सकारण ह्मणतां येईल. मि. एटकीन यांस इंग्रजी चांगलें येतें तसाच इतिहास वगैरे विषय चांगले येतात. इतर विषय शिकविणार व त्यांच्या इच्छेनुरूप वागणार इसम मिळाल्यास ते खचित चांगलाच निकाल दाखवितील जे लोक त्यांच्या विरुद्ध असतील ते उगीच त्यांच्या विरुद्ध गोष्टी उठवितील व लोकांच्या व मुलांच्या मनांत भलतच ग्रह भरून देतील तर इतक्यावरून त्यांची योग्यता कमी होईल असें कोणीही समजणार नाहीं. रा. रा. लक्ष्मणराव चिपळूणकर सारखे जेथें फ. अ. तेथें निकाल चांगला यांत नवल तें कोणतें? मि. रोहणखेडकर हे वऱ्हाडचे रहाणारे स्वतः अभ्यास करणारे स्वतः मेहनती आहेत. परंतु वर उल्लेख ल्या कारणामुळें कदाचित् त्यांस आपली विद्वत्ता दाखविण्यास संधी सांपडत नसेल. कांहीं दिवस मुलकीखात्यांत नोकरी करीत ते. हायर स्टॅंडरडची परीक्षा मोठ्या शाबकीनें पास झाले आहेत. परंतु त्यांच्या नशबानें मागें माग घेतल्यामुळें त्यांस पुनः मास्तर होऊन अकोल्यासच फ. अ. व्हावें लागलें हल्लीं बी.ए. पुष्कळ मिळूं लागले आहे तेव्हां हायस्कुलांतील आठव्या इयत्तेपासून हेड मास्तरच्या जागेपर्यंत सर्व बी. ए. करटाकावें. व मिडल स्कुलें त्यांच्यापेक्षां खालीं शिकलेल्या मनुष्यांसाठीं ठेवावींत. बी. ए. मिडल स्कुलांत लाविले तरी त्यांचा इतर लोकांपेक्षां चांगला निकाल होईल असें कधींही होणार नाहीं. करितां अकोलें हायस्कूलांत बी. ए. घालून त्या हायस्कुलची स्थिती चांगली होईल असें करणें वरिष्ठांचें काम होय. अ च्या सरकारच्या कारकिर्दींत जाईल तिकडे ची जाईल. नाहीं तर मुंगीचाही रिघाव होत हीं. पहा, अकोला हायस्कुलच्या हेड मास्तरचा पगार दरमाहा चारशें आहे. वर्षा ४८०० रुपये झाले. मुलें पाहिली तर मॅट्रीक्युलेशनमध्यें सहा पास झालीं. दर मु वर्षाचा ८०० रुपये खर्च आला. हीं त्यांनीं एकट्यानींच शिकविलीं हेंहीं नाहीं स आणखी मदतही देण्यास दोन उपपत्री लागले. काय पैशाची उधळपट्टी ही. ल वाईट झाला व पैसा फार खर्च ला तरी त्यांस कोणी तरी कांहीं ह्मणणार काय; एकादा मास्तर पहिली इयत्ता द हा सहा रुपये पगारावर शिकवीत अ त्याच्या वर्गांतील मुलें कमी पास झ कीं आली त्याजवर गदा!! असा प्रकार व्हावा व बडे लोकांना तो मुभा कां अ पत्र वाटल्यास अगत्य छापावें. कळ विनंती.

एक आ

सत्यवक्ता "क्ष

मुकाम वाशिम ४।१।८७.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विषेश साहेब लोकांचा वर्षाचा सण सिद्धीस गेला. सुटिची समाप्ती होऊन सरकारी आफिसें सुरू झालीं. अलिकडे सुमारें १०।१२ दिवसांपासून आकाश आभ्राछादित असतें. हवा अगदीं खराब झाली आहे. काल पासून थोडा थोडा पाऊस ही पडतो. भलत्याच ऋतु मध्यें वर्षाऋतु आपले घोडें पुढें ढकलूं पाहातो या मुळें रोगराई थोडे थोडें डोकेंवर उचलूं पाहत आहे. गांवात सफाई चांगली ठेविली आहे. म्युनसिपालीटीचे लोक या कामीं चांगलें लक्ष्य देत असल्या मुळें ईश्वरी क्षोभाशिवाय इतर कारणांपासून रोग उत्पन्न होण्याची भिती नाहीं. पिकें खराब होत आहेत. महागाई होंत चालली आहेच.

येथें एक कोणी फकीर आला आहे. त्यानें आपलें आसन येथील कंपनीचे दुकाना नजीक पिंपळाच्या पारावर घातलें आहे. त्यानें अश्वत्थाच्या एका फांदीस दोर टांगिला आहे. त्या दोरावर टेकून तो रात्रं दिवस आज वीस पंचवीस दिवस उभा राहातो. तो कधीं खालीं बसतां दिसत नाहीं उभें राहिल्यानें त्याच्या पायांत रक्त उतरून त्यांचे पाय ही सुजले आहेत. खातां पितां अगर बाहिर्दिशेस जातां दिसत नाहीं. असें लोक बोलतात. अशा कडक तपश्चर्येनें बिच्यारा कायम्हणून शरिरास त्रास करून घेत आहे कोणजाणें. पूर्व जन्मी बिचाऱ्यानें तपश्चर्या केली असेल त्याचे फळ अशा प्रकारें शरीरास कष्ट. आतां ह्या जन्मी असा प्रकार करित आहे तेव्हां पुढें त्याजवर कोणता प्रसंग येणार कोणजाणें असा त्रागा करण्याचें, कारण असें म्हणतातकीं तो ग्रामस्थांपासून कांहीं इसमांस जिलबींचे भोजन द्यावें असें म्हणत आहे. असें न कराल तर मोठें विघ्न उत्पन्न करीन असें ही म्हणतो असें लोक बोलतात. त्याच्या सभोवार बऱ्याच लोकांचा समुदाय दृष्टीस पडतो. रात्रीस तार बाजत असे. अग्नीकुंड त्याचे जवळ प्रज्वलीत असतें. त्याची दया अजून लोकांना येत नाहीं असें दिसतें. अजून फकिर बावा किती दिवस लोंबत राहातात तें पाहावें. सध्यां विशेष मजकुर नाहीं. आपली भेट कधीं कधीं घेत जाईन कळावें.

ताजाकलम मे. कमिशनर सा० बाहादूर अमानी मुलुख हैद्राबाद यांची स्वारी दोन चार दिवसांत येथें येणार अशी वार्ता असून तत्प्रीत्यर्थ तयारी चालूं असल्याचे ऐकतों व तो मागाहून कळवीन हें विनंति.

आपला प्रेमेच्छु

"क्ष"

वऱ्हाडसमाचार.

मिती पौष वद्य ११ शके १८०९

राष्ट्रीय सभेचा तिसरा समारंभ.

पूर्वीं महाशूर केल्या प्रमाणें सभेच्या समारंभाला गेल्या महिन्याच्या २७ व्या तारखेस सुरवात होऊन तो मोठ्या थाटानें शेवटास गेला. थोड्या दिवसां पूर्वीं सुधारक व त्यांचे प्रतिस्पर्धी यांच्या संबंधानें जी बजबज झाली होती व सभेंत कोणकोणत्या विषयांचा विचार व्हावा या संबंधानें, जो वाद चालला होता त्यावरून मध्यें विघ्नें येण्याचीं चिन्हें दिसत होतीं; परंतु यंदाच्या सभेची जी माहिती बाहेर आली आहे ती वरून असें दिसून येतें कीं, हा समारंभ गेल्या दोन समारंभापेक्षांही उत्तम उतरला. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतून ६०० वर प्रतिनिधी आले होते व या शिवाय इतर मंडळीही पुष्कळच जमली होती. प्रतिस्पर्धि लोक आपापल्या उद्योगाला ढोंग, तमाशा वगैरे नांवें देऊन त्याची अवलेहना करीत असतां व बंगाल्यांतील मुसलमान लोकही कृतघ्नासारखें वर्तन करून यांशीं विरोध करीत असतां हा स्तुत्य उद्योग प्रतीवर्षीं अधिकाअधिक यशस्वी होत चालला आहे हें पाहून कोणाला बरें आनंद होणार नाहीं?

या वर्षीं आमच्या एतद्देशीय बंधूंनीं मुंबई बंगाल यांवरही ताण केली आहे. अशिक्षित लोकांच्या मनांत सभेचे उद्देश तीपासून फायदे इत्यादि गोष्टी भरून देण्याकरितां आमच्या बंधूंनीं कित्येक महिन्यापासूनच आरंभ केला होता. त्याप्रमाणेंच तेथील स्वदेशाभिमानी लोक या कामीं मदत करण्याकरितां कसे जिवाभावानें झटत होते हेंही श्रुत झालेलेंच आहे. आपले देशबंधु आपल्याकडे पाहुणे येणार तेव्हां त्यांना कोणत्याही प्रकारें अडचण पडूं नये, ह्मणून कित्येक दिवसांपासून सर्व तयारी करण्याच्या कामास आरंभ झाला होता. जे जे प्रतिनिधी आले त्यांच्या जाती, धर्म इत्यादीकांप्रमाणें निरनिराळ्या ठिकाणीं त्यांची जेवणा खाणाची निजण्या बसण्याची उत्तम प्रकारें तजवीज करून ठेविली होती. सारांष या प्रसंगीं आमच्या मद्रासवासा बंधूंनीं जी मेहेनत घेतली व आपल्या पाहुण्यांची जी बरदास्त ठेविली त्याबद्दल त्यांची तारीफ करावी ती थोडीच आहे.

तारीख २७ रोजीं दुपारीं मॅकशार्डनमध्यें मोठा एक मंडप उभारिला होता त्या ठिकाणीं मुकत्यारांची पहिली सभा भरली. अध्यक्ष स्थानीं राजे सरटी माधवराव, बडोद्याचे माजी दिवाण हे होते. माधवरावांची तब्बेत नादुरुस्त होती परंतु त्यांनीं उभेराहून प्रथमतः सर्वांच्या भेटी झाल्याबद्दल आनंद प्रदर्शित केला नंतर त्यांना फार बोलण्याची शक्ति नव्हती ह्मणून त्यांनीं लिहून आणिलेलें भाषण त्यांच्या एका मित्रानें वांचिलें. हें भाषण मोठें प्रौढ. पोक्त व उपदेशपर होतें. त्यांत प्रथमतः इंग्रजी राज्यापासून काय काय फायदे झाले आहेत हें सांगून हल्लीं आपल्यांत परस्परांमध्यें दळणवळण सतत रहाण्यास काय सोई झाल्या आहेत, त्यांचा आपण कसा उपयोग केला पाहिजे, आपल्या लोकांत राजप्रकरणीं विषयाची अभिरुचि कशी वाढत चालली आहे इत्यादि गोष्टींचा चांगला विचार केला होता. यासभेसारख्या सभांची आपल्या सांप्रतच्या स्थितीला किती जरूर आहे व त्यांच्या योगानें आपलें काय हीत होणार आहे हेंही सांगितलें त्या नंतर कलकत्याचे प्रसिद्ध सुरेंद्रनाथ बनारनी यांनीं सूचना केल्यावरून व तिला मद्रासचे सुबारामायाआसर यांनीं अनुमोदन दिल्यावरून मुंबईचे प्रसिद्ध बारिस्टर ऑ. बद्रद्दीन तयबजी यांना या वर्षाकरितां सभेचे अध्यक्ष नेमिलें. अध्यक्ष आपल्या स्थानीं विराजमान झाल्यावर त्यांनींही उत्तम भाषण केलें. हें भाषण त्यांच्या नेहमींच्या भाषणा प्रमाणें सर्व प्रकारें उत्तम होतें. आपल्या लेकात सार्वजनिक मत प्रदर्शित करणाऱ्या मंडळ्या नाहींत व त्या स्थापन करितांही येणार नाहींत असा जो आरोप आपले प्रतिस्पर्धी आपल्यावर आणत असतात त्याला त्यांनीं चांगलें उत्तर दिलें. ते म्हणाले आपली आजची सभाच यागोष्टीची चांगली साक्ष देत आहे. हिंस्दुथानचा असा कोणताही भाग नाहीं की ज्यांतून आज ह्या सभेला मुकत्यार आले नाहींत. आपल्या सरकारनें कृपाळू होऊन कायदे करणाऱ्या मंडळ्यांत किंवा पार्लमेंट सभेंत लोकमत प्रदर्शक प्रतिनिधी पाठविण्याची मोकळीक दिली तर आज जे गृहस्थ येथें जमलें आहेत त्यांपैकींच पुष्कळ लोक या कामीं निवडले जातील. त्याचप्रमाणें आपल्या प्रतिस्पर्ध्याचा दुसरा असा आरोप आहे कीं या सभेला मुसलमान लोकांचें मुळींच आंग नाहीं, कारण त्यांना हें ढोंग आवडत नाहीं. परंतु हा आरोप खरा म्हटलाच तर १०० मध्यें २–४ ही शानें खरा असला तर असेल. मुसलमान लोकांचें आंग या सभेला नाहीं असा फक्त एक बंगाल प्रांत आहे व तो ही कांहीं विशेष स्थानिक कारणांच्या योगानें या कामीं मागें पडला आहे. या सभेला हल्लींच २०० च्या जवळ जवळ मुसलमान गृहस्थ आलेले आहेत. शिवाय मी स्वतः हीं मुसलमानच आहे व मुंबइतील अजुंमन इस्लामन नामक मुसलमानी सभेच्या वतीनें येथें आलों आहे. या वरून मुसलमान लोकांची या कामीं नाखुशी आहे असें म्हणतां येणार नाहीं. जी गोष्ठ सर्वांना सारखीच लागू आहे, जिच्या पासून सर्व जातींच्या व सर्व धर्मांच्या लोकांचे सारखेंच हिताहित होणार त्या गोष्टीचा विचार मुसलमान व हिंदु या दोहोंही जातीनें परस्परांच्या राल्ल्यानें कां करूं नये हे मलां समजत नाहीं. निदान मुंबई शहरांत तर हें मत ग्राह्य झालेलें आहे. कित्येक लोक असें म्हणतात कीं ही सभा फक्त कांहीं सुशिक्षित लोकांची आहे गरीब गुरीब अविद्वान् लोक यांना हीचें नावें ही माहित नाहीं. परंतु ही मोठी चुक आहे. अशा गोष्टींत सुशिक्षीत लोकांचेंच मन प्रथम गढलें पाहिजे. कारण हाल्लींच्या राजापासून जी सुखें प्राप्त होत आहेत त्यांचा अनुभव त्यांना जसा येतो आहे तसा अशिक्षीत लोकांना येणार नाहीं राजनिष्ठेनें वागणें, सत्य, निती, स्वदेशप्रीति इत्यादी गोष्टींकडें लक्ष्य देऊन व्यवहार करणें यागोष्टी सुशिक्षीत लोकना जजशा कळतात तशा अज्ञानांस कळत नाहींत; यामुळ याच लोकांमध्यें अशा गोष्टींचा प्रथम उहापोह झाला पाहिजे. शेवटीं अध्यक्षांनीं जें कारणें ते विचारानें एकमतानें, व नीरानें करा अशी विनंती करून आपलें भाषण आटोपलें.

दुसरे दिवशीं सभेची व्यवस्था कशी करावी, तीचे नियम कसें करावे यांचा विचार करण्या करितां येक कमिटी नेमिली. नंतर गेल्या सभेमध्यें [illegible]दे काउन्सीलांत सुधारण करण्याबद्दल ज्या ज्या सूचना झाल्या होत्या त्या पुनः कायम केल्या. तिसऱ्या दिवशीं कांहीं महत्वाच्या सुचना झाल्या त्यातील कांहीं येणें प्रमाणें.—

१ कायदे कौन्सीलांत सुधारणा.
२ लष्करी खात्याचा खर्च कमीं करणें.
३ हत्याराच्या कायद्यांत फेरफार.
४ ब्रम्ह देश राणीसरकरच्या हिंदुस्थानच्या राज्यापासून निराळा करणें.
५ कांग्रेसनें केलेल्या सुचना इंग्लंडांत तेथील लोक व पार्लमेंट यांच्या लक्षांत भरऊन देण्याकारतां इकडून डेप्युटशन पाठविणें.
६ देशाचें दारिद्र्य व तद्रक्षणार्थ उपाय.
७ मुलकी व दिवाणी हीं खातीं अगदीं निराळीं करणें.
८ जमाखर्चात तूट कां येतें याचा विचार
९ धंदेशिक्षण लोकांना देण्याचा प्रयत्न करणें.
१० एतद्देशीय लोकांस लष्करी खात्याचें शिक्षण देऊन त्या खात्यांत जागा देणें. इत्यादी.
११ सरहद्दीवर गडबड झाल्यास लोकांवर कर आम्हीच बसऊ व वसुलही आम्हींच करूं अशाबद्दल सभेची इच्छा.

या प्रमाणें यंदाचा समारंभ उत्तम रीतीनें शेवटास गेला. यंदा विशेष आनंद मानण्या जोगी गोष्ट ही कीं बंगालचे मुसलमान आपलें आंग काढून घेऊ लागले आहेत त्यावरून परदेशस्थ लोकांच्या मनांत सभेसंबंधानें जें व्यंग्य दीसून येणार ते यंदाच्या सभेचे अध्यक्ष मुसलमानगृहस्थच असल्या कारणानें कांहीं अंशीं दूर होईल. शिवाय यंदा आंग्लो इंडीयन व युरेशीयन मंडळी ही बरीच साह्य होती. मि. ह्यूम साहेब "स्टार इन्धी ईस्ट" चे कर्ते हे तर १०–१५ दिवस अगोदर मद्रासेस जाऊन तेथील खटपटीला लागले होते. त्याच प्रमाणें मद्रासचे प्रख्यात बारिस्टर मि. नार्टन यांनींही सभेला आपला पूर्ण संमति दिली या गृहस्थानें जें भाषण केलें त्यावरून आंग्लो इंडीयन लोकांमध्यें देखील आपला कळवळा बाळगणारे पुष्कळ मित्र आहेत असें दिसून येतें. यंदा एतद्देशीय राजानीं ही द्रव्यद्वारें सभेला मनापासून मदत दिली. व्यंकटागिरी विजय नगरम् येथील राजे आणी बॉबाली हेतर सभेला आले होतें.

सारांष प्रतिवर्षीं या सभेचा उत्कर्ष होत चालला आहे. हिच्या योगानें आपल्य लोकांत जुशनें काम करण्याचें सामर्थ्य आहे हें सिद्ध होत आहे. परमेश्वर करो वही सभा चीरायु होऊन तिच्या संबंधानें आम्हाल ज्या आशा उत्पन्न झाल्या आहेत त्य शेवटाला जावोत.

The Berar Samachar

MONDAY JANUARY
,9 1888

PRESENT IDEAS OE HINDU SCCICTY A CHANGE

Among the most important advanta-

ges, which the people of India have derived form the influence of the British rule, those of primary and higher education stand foremost. On account of the wide spread of education in this country people are being roused from their habitual lethargy and indifference and are thinking about their nationality. Education has set all persons, who have received it a thinking. It has infused a spirtit of a clivity and enquiry in all of us. We feel the necessity of organising ourselves better and of moving with the times. We see the change which is silently and slowly but surely being effected in our modes of thinking and our social customs. In like manner we are forced to think over the religious systems that are now in vogue, and ascertain whether reforms in them are needed. No where at present religious dogmas and principles are admitted silently. They are freely and openly discussed. The indifference and apathy towards them, which prevailed so long, are now gradually disappearing. The old opinions of arthodox Hindoos are making way for new ones adapted to the requirements of the present age. At this critical time, when religion and all social customs, established for a long time, are in danger of being shaken, let us see how far the general opinion about the uselessness of religion is justified and how far religions doctrines are to be modified. We hear some advance a proposition that religion is a mockery and a mere form of words, that it does no substantial good to the society at large, but on the contrary works mischief. They maintain that society can exist without any religious institutions, which merely impedes the progress of civilization. They attach importance to their sense of honor, and chirfly depend on public spirit probity and truth. Hence they altogether scout the idea of having any religious institution. But in opposition to these men there are others who say that religion in some form or other is necessary for all forms of society, barbarous as well as civilized. An eminent historian has remarked that religion, while it is sound, creates a basis of conviction on which legislation can act; and where the legislator drops the problem, the spiritual teacher takes it up. The most famous writers like Burke and Macauly have highly applauded such institution, and maintained that no society, no government, no law, can rest on a firm foundation; and work well if it is deprived of the whole and powerful support of religion. The history of our own country affords examples to carroborate this statement. Consider for a moment the case of Shivaji, the founder of the Mahratta dominions—how he gathered his followers and the absurdity of the first opinion becomes evident. The very fact that though countries like England and Germany, have considerably advanced in civilization they are not yet able to dispense with this institution, is an almost conclusive proof of the second opinion. If matters stand thus with civilized nations, much less then ought India, which is far backwards in civilization, claim to abolish this institution altogether. But when we support this institution, we are not to be understood as favouring it wholly as it now stands. We do maintain that reforms in it are needed, but we are not for demolishing the old institutions for erecting new ones in their stead. We would wish the very same retained but modified so as to suit the changing circumstances and requirements of the present age. We are aware that religious zeal and fanaticism, have committed great mischief in impeding the progress of civilization and the development of trade and industries, and have sown disunion and jealousy among all classes of people. Unlike the case in Europe, where the laws of religion and society are considered to be inferior to the laws of nations, here in India we find that laws of religion have become part and parcel of those of caste, and custom, and have become stronger than any other law. We admit that such evils have crept in to our society from the predominance of religion in all matters. But the measures adopted to remedy these evils by the reactionists are not the proper ones. It is a fond hope that religious associations, such as Brahma Samaja and Prathana Samaja, can tend to diminish the influence of superstition in the minds of people. The founders of these Samajas have attempted to establish new forms of worship and new religious customs, in imitation of the English yeople. Here they have been mistaken and hence they are gradually declining. The proper course for them was not to bid farewell to what is old, but to retain and give it a mould suited to the requirements of the present time. They forgot that this institution was deeply rooted in the affections of the people and hence they failed in winning from it the affections of the people. Perhaps they would urge that they apprehended that their attempts were sure to meet with a failure in that direction, as the case, it appeared to them, would have been still more difficult. Had they borne in mind what rapid progress education is making in this country, and what beneficial influence it is exercising over the minds of the people, how it is making them restless, raising controversies and forwarding the cause of social progress, the danger apprehended by them would not have greatly overawed them. Had they remembered that we are now living at a time when men are being accustomed to think over and discuss problems, political, social and intellectual openly, and are getting over their prejudices, they would have thought the task easier in this direction. We find now that even the most orthodox and uneducated people, have begun to move with the times and take a part in the discussions that are going on around them. Their prejudices are day by day being got over and they are slowly availing themselves of the benefits of the influence of modern education. We are not required to go very far to prove that such a change is being effected. If we examine our homes we see what great alternations hav taken place in the views of our grandfathers. Some ten years ago they thought they were polluted if the shadow of a low caste man accidently fell on them. But now, when out, they do not hesitate to shake hands with any person. The same was the case with female education and remarriage. Now we see hundreds of girls in the morning going to school. What is all this change due to? Evidently to the influence of the British rule and education. If instances like these are before us, why take recourse to starting new religious associations and making matters more complex! The change is imperceptibly taking place before us. Let us wait till the time is ripe and men's minds are prepared for the charge. In the meantime let there be free thought and discussion abroad. Let time and education do their work and let us divert our energies in the mean while to other directions. Let us turn our attention to technical education and industrial arts. Let our educated poople think that it is not beneath their dignity to engage in commercial pursuits and manly labour. Let them bear in mind that it is the development of technical education only that would add greatly to tha material welbeing of our country.

पोंचः— "जुबिली थंडरर" या पुस्तकाची एक प्रत आम्हाकडे आली. तिचा आम्हीं आभारपूर्वक स्वीकार करतों.

वऱ्हाड.

हवामानः—हवा वाईट. आकाश आभ्राच्छदित. पाऊस बरात्र आला व त्याचे योगानें पिकांची बरीच नासाडी झाली. एक दोन दिवसांपासून आकाश निरभ्र असते.

मे. कमिशनर साहेबाची स्वारी येथून कापशी कडे गेले.आठवड्यांत गेली.

कर्नल ग्रांट साहेब येथील डे० क० थोडे दिवसांत रजेवर जाणार म्हणून म्हणतात.

येथील डे. क. आफिसचे हेड क्लार्क मि. ई. गाडफ्री यांस सेंट्रल प्राव्हिन्सेस मध्यें जुडिशियल कमिशनर आफिसचे सुपरिंटेंडेंट चीं-२५० रु० ची जागा मिळाली व ते गेल्या गेल्या आठवड्यांत आपल्या कामीं रुजु होण्या करितां नागपुरास गेले. त्यांचे जागीं येथें मि. सी. गाडफ्री बुलढाणें डे० क० आफिसचे हेड क्लार्क यांस नेमले व ते एकदोन दिवसांत येथें येणार म्हणून ऐकतो.

क्यपटन आर. व्ही. ग्यारट अ. क. उमरावती. यांस दुसरे वर्गाचे माजिस्ट्रटचे अधिकार मिळाले.

मि. माणिकशा रतनजी ए. अ. क. एलिचपूर यांस दुसरे वर्गाचे माजिस्ट्रटचे आधिकार व अ. क. चे सर्व रेव्हिन्यु आधिकार मिळाले.

मि. लीजी मरवानजी वाडीया, बी. ए., ब्यारिस्टर अॅट्लॉ, यांस रेसिडेंट साहेबांचे कोर्टांत त्यांचे हाता खालील सर्व कोर्टांत अॅडव्होकेटचे काम करण्याची परवानगी मिळाली.

ले. आर. सी. डेव्हीस, अ. क. एलिचपूर यास दुसरे वर्गाचे माजिस्ट्रेटचा आधिकार व पांचशे रु० पर्यंत दावे घेण्याचा दिवाणी अधिकार मिळाला,

---

रा. रा. सदाशिव भास्कर तहशिलदार, केळापूर यास दोन वर्षांची फर्लो रजा मिळाली.

रावसाहेब फकीरचंद, अ० एंजिनियर सेंकंड ग्रेड यांची मेळघाट रोड सबडिविजन हून पूर्व वऱ्हाड भागाला बदली झाली.

"जे.जे." आपलें पत्र पावलें. तें उशिरां आलें स्थलसंकोचा मुळें घेतां आलें नाहीं.

उमरावतीजवळ एके खेडे गावीं धनगराची दोन मुलें मेंढ्या राखीत असतां कोणीं दुष्टांनीं त्यांना कुऱ्हाडीनें ठार मारिलें व त्यांच्या बऱ्याच मेंढ्या घेऊन जाऊन विकल्या. ह्या भयंकर खून करणारांचा पोलीस शोध करीत आहेत, व एकजण सांपडला असें ही ऐकतों.

उमरावतीस हवेचा उपद्रव अगदीं सपाट्यानें चालू होता त्या वेळीं उमरावती शहर व छावणी यांच्या स्वच्छतेच्या व व्यवस्थेच्या संबंधानें मे. कमिशनर साहेब यांनीं डे० क० उमरावती यांस बऱ्याच सुचना केल्या होत्या. त्या सर्वच जरी अद्याप अमलांत आल्या नाहींत तरी त्यामुळें छावणींत अलीकडे बरीच स्वच्छता नजरेस येऊं लागली आहे.

वडाळी येथील "वाटर वर्कस लवकरच पुरी होणार.

अलिशान रेसिडेंट साहेबांची स्वारी लवकरच वऱ्हाडांत येणार व त्यांचे बरोबर पब्लिक वर्कस सेक्रेटरी मि० व्हाईट, सुपरिंटेंडिंग इंजिनिर हे येतील व पाण्याच्या पुरवठ्याकरितां ज्या कांहीं तजविजी करण्याचा विचार चालला आहे त्या सर्व त्यांस ते स्वतः समजून सांगतील, असें ह्मणतात.

येथील नायब तहशिलदार मि. समशेर अली यांस कांहीं कारणामुळें सस्पेंड केलें आहे.

क्यपटन आर. व्ही. ग्यारेट अ. क. उउमरावती यांस मोर्शी कोर्टावर नेमलें ह्मणून समजतें.

गेलें आठवड्यांत कर्नल लेन साहेब इन्स्पेक्टर जनरल यांची स्वारी येथें आफिसें तपासण्याकरितां आली होती ती येथून मूर्तिजापुरास गेली.

गेल्या २१ तारखेस अकोट येथें सार्वजनिक सभेकरितां सभासद निवडण्यासाठीं जाहीर सभा भरली होती. रा. रा. गबुसिंग स्पे. माजिस्ट्रेट हे अध्यक्ष होते. सभेस तालुक्यांतीलही बरेच लोक आले होते. १९ गृहस्थ सभासद निवडले.

नबाब बुशिर उदवला बहादुर, निजामसरकारचे मिनिस्टर,व नबाब रायफूल उमरा बहादुर यांस नाईट कमांडर हा किताब राणी सरकारांनी दिला.

टी. राजाराम राव डेपुटी कलेक्टर, यांस 'रावबहादूर" किताब मिळाला.

वर्तमानसार.

औदकुळांपैकीं नबाब सर इगबल उवदला हे तारीख २१ मिनहु रोजीं मरण पावले. यांस १८८२ सालीं नैट कमांडर आफ दिस्टार आफ इंडिया असा किताब देण्यांआला होता. हे बरेच दिवस आजारी होते.

देशी भाषांत प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांचें स्वातंत्र्य हरण करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें तयार केलेल्या एका कायद्याचा विचार इंडिया कौन्सिलांत चालला आहे.

देशी भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांस मात्र तो कायदा लागूं करण्याचा विचार आहे ही एक मोठीच मौज आहे. बंगाल्याकडे व एकंदर हिंदुस्थानां इंग्रजी भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या नेटिव पत्रांस तो कायदा लागूं होणार नाहीं. कारण त्यांच्या स्वतंत्रतेस हात घालण्याचे मनांत आणिलें कीं त्यांच्या बरोबर गोऱ्यांनीं चालविलेल्या इंग्रजी पत्रांस धक्का बसलाच पाहिजे. निवळ इंग्रजींत जीं नेटीव पत्रें निघतात त्यांत अधिकाऱ्यांचीं दुर्वर्तनें, अन्याय व जुलूम यांचें अविष्करण झालें तरी हरकत नाहीं, पण तीच हकिकत देशी भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांत मात्र येणे बरोबर नाहीं असा का सरकारचा समज आहे?

देशी भाषेंत प्रसिद्ध होणारीं पत्रें अधिकाऱ्यांचीं दुर्वर्तनें जग जाहीर करून सरकारास सावध करितात व दाद मागण्याचें उपाय दाखवून देतात ही सरकारची केवढी कामगारी होत आहे. आंतल्या आंत जळफळ रहाण्यापेक्षां प्रजेच्या दुःखाचा स्फोट होणें सरकारच्या अतिशय फायद्याचें होय. प्रजा अधिकाऱ्यांच्या वर्तनानें आंतल्या आंत तळमळत राहिल्यानें कोणत्या वेळेस काय होईल याचा नेम नाहीं, यासाठीं प्रसिद्धीच्या रूपानें रयतेचीं दुःखें व अधिकाऱ्यांचीं दुर्वर्तनें व अन्याय बाहेर येणेंही सरकारच्या मोठ्याच फायद्याची गोष्ट आणि तीच सरकार जर नाहींशा करील तर आपल्या हातानें आपल्या पायावर दगड मारून घेण्याप्रमाणेंच सरकारचें तें कृत्य आहे असें कोण ह्मणणार नाहीं! सगळेच ह्मणतील. असा कायदा करण्यानें सरकाराकडे वेडेपणा तर येईलच, पण पंक्ति प्रपंचाचा मोठा डाग सरकारच्या स्वच्छ कीर्तीस लागेल असें आह्मांस वाटतें.

सरकारी गोऱ्या कामगारांचीं दुर्वर्तनें, अन्याय, व जुलूम इंग्रजी पत्रांतून येणार, त्यांचीं चर्चा देशी भाषेंत होण्याचें सरकारनें बंद केलें, तरी ती चर्चा सर्व साधारण लोकांत झाल्या शिवाय रहाणार नाहीं. आतां इंग्रजी जाणणारे पुष्कळ लोक झाले आहेत व दिवसें दिवस जास्त होणार. गोऱ्या कामगारांच्या अन्यायांची व जुलमाची हकीकत वाचून त्याची आपापसांत चर्चा होईल व ती सर्व लोकांस सहजच समजेल. लोकांच्या तोंडास व मनास गवसण्या घालण्यासारखा कायदा तर तरकरीत नाहींना; तेव्हां देशी भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य हरण करून सरकारास कांहींच फायदा नाहीं.

सरकारी गोऱ्या लोकांचे अन्याय, दुर्वर्तनें, व जुलूम देशी भाषेंतल्या पत्रांत प्रसिद्ध झाल्यानें त्या कामगारांची फजीती होते, व दुर्वर्तनें बंद होण्यास फजीती हा एक चांगला दाब आहे. तो सरकारनें नाहींसा केल्यावर ते जास्त स्वेच्छाचारी व जुलमी होतील व त्यांच्या जुलमानें प्रजा फार त्रस्त व असंतुष्ट होईल हा एक फार मोठा तोटा आहे. जुमलीकामगारांस तडातड योग्य शासनें झालीं ह्मणजे ते बेतानें वागतील व त्यांचा डंका होणार नाहीं. ह्मणून देशी भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांच्या स्वातंत्र्याचा अपहार करणें सरकार व प्रजा या उभयतांस अत्यंत अनिष्ट आहे आहे यासाठीं ही बताडीं राष्ट्रीयचूक सरकारानें करूं नये अशी आमची प्रार्थना आहे.

सलामीच्या तोफा—राजा सर गणपतराव ग्वाल्हेररीजन्सीचे प्रेसिडेंट यांस ब्रिटिश हद्दींत ९ तोफांची सलामी द्यावी असा ठराव झाला आहे.

बंगलोरचा किल्ला—हा किल्ला म्हैसूरच्या महाराजांच्या ताब्यांत द्यावा अशाबद्दल म्हैसूर व ब्रिटिश सरकार यांच्यामध्यें बोलणें चालूं आहे.

राक्षसी झाडें.—मोंबीचे ठाकूर अमेरिकेस गेले होते, तेथें जीं प्रचंड झाडें त्यांच्या दृष्टीस पडलीं त्यांस त्यांनीं हें नांव दिलें आहे. हीं झाडें ३००।३४०।३६५ फूट उंच आहेत, व बुंध्यापाशीं त्याचा घेर १०० पासून ११२ फूट आहे.

हल्लीं ओरियंटल ट्रयान्सलेटरच्या जागीं अर्किटग काम करीत असलेले रा. ब. केळकर यांस त्या जागीं कायम केले रा. ब. पंडित यांस अहमदनगरास हुजूर डे. क. नेमिले असून तूर्त चार महिने अथर्वण वेदाचें भाषांतर करण्याच्या स्पेशल डयूटीवर नेमिल्यामुळें ते मुंबईसच रहाणार आहेत.

दगलबाज—पंजाबांतल्या झिंड संस्थानांत रहाणाऱ्या एका सोनारापाशीं महाराज धुलिपशिंगाशीं केलेल्या बंडखोर पत्रव्यवहाराचे कागदपत्र सांपडले. या सोनाराचा बाप रणजितशिंगाचा विश्वासू सल्ला मसलतगार होता असें ह्मणतात.

शु० मू०

बंदुका, दारूगोळा वगैरे लढाईचें सामान खरेदिकरण्याकरितां रोमेनियाच्या पार्लमेंटनें एक कोटी साठ लक्ष फ्रांक खर्चण्याची परवानगी दिली असें बुचारेस्टच्या ता. २३ च्या तारेवरून समजतें.

जर्मनीचे लंडन येथील वकील लार्ड सालीसबरी यांस भेटून बोलणें वगैरे होऊन तावडतोब जर्मनीस निघून गेले. यूरोपची स्थिति अगदी अस्वस्थतेची व घोटाळ्याची होऊन गेली आहे व नानातऱ्हेच्या बदंता उठत आहेत रशियन वकील ऑस्ट्रियास किंवा जर्मनीस कांहींच खात्रीनें सांगत नाहींत असें लं. च्या ता. २५ च्या तारेवरून समजतें.

नोवोव्रेम्या नांवाच्या रशियन पत्राचे कर्ते ह्मणतात कीं इंग्लंड जर युरोपांतील खटपटींत मन घालून रशियाच्या विरुद्ध न जाण्याची खात्री करील तर रशिया हिंदुस्थानास धक्का लावणार नाहीं असें इंग्लंडास आश्वासन देईल.

गुप्तधर्म—मि. लाबुचरी या प्रसिद्ध गृहस्थाकडे दरवर्षीं कांहीं "सिक्स पेन्स" नाणें मुकाट्यानें कोणी गृहस्थ पाठवितो. तें नाणें लंडन शहरांतील गरीब लोकांच्या मुलांस वाटण्याकरितां पाठवितो. यंदा त्याणीं दोन हजार सिक्स पेन्स त्या रीतीनें वाटण्याकरितां मि. लाबुचरी यांनाकडे पाठविले आहेत. तो पाठविणारा कोण आहे व कोठें असतो हें कांहीं कळत नाहीं.

जर्मनी देशांत एक भविष्य लोकांमध्ये पसरले आहे व तें पुष्कळ लोक खरें मानितात. जर्मनी एका तरुन राज्याधिकाऱ्याच्या कारकीर्दींत मोठी लढाई होऊन यश मिळून अत्यंत महत्वास चढेल. त्या अधिकाऱ्याचा एक हात लुळा असेल व त्यास चार मुलगे असतील. व तो वृद्ध राज्याधिकाऱ्याच्या मागून राज्याधिकारी होईल. ही लक्षणें बऱ्याच अंशी प्रिन्स विलियमशी जुळतात असें ह्मणतात. परंतु त्याच्या पाठीमागें जर्मनी अगदी रसातळास जाईल असेंही या भाकितांत सांगितलें आहे. सु०

निर्दयता:—काकेशसच्या गव्हर्नरानें असा जाहिरनामा लाविला आहे कीं, टिफ्लिस येथून सर्व येहुदी लोकांस हाकून दिलें जाईल. सांप्रत या गांवीं ६००० यहुदी लोक आहेत या लोकांनीं या विचाऱ्यांचा काय विलक्षण छळ मांडिला आहे! आही आणखी असें ऐकितों कीं काकेशस प्रदेशांतील एकंदर यहुदी लोकांवर ही अगदीं राक्षसी कृती होय यांत बिलकुल संशय नाहीं. दि०

गाई बैल परमुलखांत जाऊं लागले--युरोपस्थ सैन्याची भरती आमच्या देशांत अधिक झाल्यापासून गोंवधाची संख्या अधिक वाढली! हल्लीं प्रतिवर्षीं सरासरी एक लक्ष गाईचा वध होत असतो. पुनः गाई व बैल परमुलखीं पाठविण्याची सुरवात झाली. आतां तरी दूध, तुप, लोणी व मिठाई खाणारांनीं व शेतकी करणारांनीं जागृत व्हावें.

मुसलमान लोकांचा अनिवारपणा व त्याचें फळ—सोलापुर येथें हिंदू जातीचे स्त्रीचें प्रेत स्मशानांत होत असताच प्रेताबरोबर आलेले लोक परत गेले असतां दोघां मुसलमानांनीं जादु टोण्याचे साधन साधण्याकरितां त्या प्रेतास स्पर्श केला असें प्रेताचे आप्तादिकांस कळतांच त्यांनीं त्यांना पकडून त्याजवर खटला केला. तेव्हां तेथील माजिस्ट्रेट साहेबानीं या प्रत्येकास १५ दिवसांची कैदेची शिक्षा दिली.

राष्ट्रीयसभेचे दिवस ता० २७, २८,२९, ३० व ३१ दिसेंबर नेमिलेले आहेत.

सहा महिन्यांचे वयापेक्षां जास्त वयाचें कुत्रे बाळगणारे मालकांस एक रुपया कर देऊन लायसन्स घेतलें पाहिजे. कोणी बिगर लायसेन्साचांचून कुत्रें बाळगील त्यांचा नाश केला जाईल, याप्रमाणें कमेटींत ठरून नोटिसा जागोजाग डकविण्यांत आल्या आहेत. यांत आणखी कांहीं नियम आहेत ते खुलासेवार नोटिसांत लिहुन प्रसिद्ध केले आहेत.

गुजराथ प्रांतांतील सायाण गांवाजवळील काव्या मांबीं आर्यसमाजाच्या उद्योगानें गोरक्षणीय सभा स्थापन झाली आहे तींत मुसलमान लोकांची संख्या बरीच आहे. फारच आनंदाची गोष्ट!

आफ्रिकेंतील हपसी सरकार व इटाली सरकार ह्यांची लढाई होण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

मद्रास येथें राष्ट्रीय सभेचें काम फार उत्साहानें ऐक्यानें व प्रेमानें झालें. शाबास आमच्या लोकांची.

रशियानें आपली फौज आस्त्रियाच्या पूर्व सीमेवर एकत्र केल्यामुळें आस्त्रिया, जर्मनी व इटाली ह्या तिन्ही राष्टांत बरीच चळवळ सुरू होऊन ह्यांचीही आंतून लष्करससंबंध तयारी चालली आहे.

मंडाले व कलकत्ता यांच्या दरम्यान थोड्याच दिवसांत तारायंत्र सुरू होणार आहे. ते० मि०

लढाईची चिन्हें:—युरोपांत जिकडे तिकडे मोठी गडबड उडून गेली आहे. या सर्व गडबडीचा सूत्रधार किंवा चालक रशिया आहे. गेल्या मंगळवारच्या पत्रांत ज्या कित्येक तारा प्रसिद्ध झाल्या आहेत त्यावरून लढाई लवकरच सुरू होणार असें दिसतें.

युरोपांतील राजकीय स्थिति.

लंडन शहरांतून जर्मन वकिलांचें परत जाणें लंडन ता. २५ डिसेंबर.

लार्ड सालिसबरी मुद्दाम लंडन शहरांत आले असून त्यांची व जर्मन वकिलांची गाठ होऊन वकील लागलीच जर्मनींत परत गेला.

युरोपांतील राजकीय स्थिति भयंकर असून गडबडीची आहे आणि घोटाळा होण्यासारख्या गप्पा बाहेर पडत आहे.

पोलंड शहरांत रशियाच्या लष्कराची हालचाल.

पोलंड शहराजवळ जो रशियन लष्कराची हालचाल सुरू आहे त्याचें कारण काय हें रशियानें व्हियान्न येथें असलेल्या रशियन वकिलास, रशियाच्या दरबारीं असलेल्या आस्त्रियाच्या वकिलांस अथवा जर्मन वकिलास अजून खात्रीनें सांगितलें नाहीं.

रोमानिया शहरांत लढाइची तयारी.

बुचारेस्ट २८ डिसेंबर.

लढाईस लागणाऱ्या रायफल बंदुका वगैरे विकत घेण्याकरतां आणि किल्यांची तटबंदी व डागडुगी करण्याकरतां रोमनियाच्या चेंबर आफ डेप्युटीनें १ कोट ६० फ्रांक्स खर्च करण्याची मंजुरी दिली.

रशिया आणि इंग्लंड.

सेंटपिटर्सबर्ग ता. २५ डिसेंबर.

रशियाचें ज्या गोष्टींत हित आहे त्या गोष्टींत हात न घालण्याचें इंग्रजांना कबूल केल्यास हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या राज्यास हात न लावण्याचें रशिया कबूल करील असें एक वजनदार पत्रकर्ता ह्मणतो.

जर्मनी आणि रशिया.

बर्लिन, ता. २६ डिसेंबर.

जर्मनीचा प्रधान प्रिन्स बिसमार्क याणें सेंट पिटर्सबर्ग येथें रशियास मन मिळविण्यासारखा निरोप रशियाच्या दरबारांत असलेल्या जर्मन वकिलाच्या मार्फत पाठविला आहे.

बडोद्याचे गायकवाड महाराज अमेरिकेस जाणार आहेत. आणि यांच्या बरोबर असलेले अनुचारी परत हिंदुस्थानांत येणार अशी बडोद्यास गप्प उठली आहे.

साताऱ्यास लवकरच एक तोफखाना ठेवण्यांत येणार असून तो किल्यावर ठेवण्यांत येईल अशी एक गप्प उठली आहे.

ब्रह्मदेशांत युरोपीयन लोकांस मजूर मिळविण्याची मोठी पंचाईत पडली आहे ह्मणून ते लोक हिंदुस्थानांतून चाकर घेऊन जाणार आहेत. हिंदुस्थानांत इंग्रजी राज्य झालें असून त्यामुळें चाकरीस महत्व आलें आहे. परंतु हें मूलतत्व ब्रह्मदेशांत अजून लोकांस समजूं लागलें नाहीं.

☞ हें पत्र अकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साहामाही " ३ " ८
साल अखेर " ७ " १८१८
किरकोळ अंकास ८४

नोटिशी बद्दल.
१० ओळीचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरे खेपेस .....

Per annum in advance 5 Postages 1
Per annum in arrears 7 " 1R. 8
Six monthly ..... 3 " 8
Single copy 4

वऱ्हाडसमाचार.

Advertisements.
Below 10 lines.
Per line over 10...
Repetition per line

THE BERAR SAMACHAR.

VLO. XXII AKOLAMONDAY 16 JANUARY 1888. NO3

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख १६ माहे जानेवारी सन १८८८ इ० अंक ३

SUCCESS! SUCCESS!! SUCCESS!!!

Competition Challenged! Competition Challenged!!

"Comparison alone is the true test of quality."

A boon to the suffering humanity.

THE ELECTRO GALVANIC RINGS& LOCKETS.

Approved and Recommended by the Modern.

Improved Science of the Day.
TEST, COMPARE AND THEN BUY.
TESTIMONIALS TOO NUMEROUS TO MENTION.

Since the last 12 years we have been manufacturing the Electro Galvanic Rings, and Lockets &c. We can boldly and emphatically assert that our manufactory has already earned a World-wide reputation for genuine production of accomplished workmanship and finest cut. It is needless to mention that the power of electricity has been unanimously pronounced as the most infallible remedial agent in curing the most obstinate and protracted maladies which the human flesh is heir to. It is used next to skin. It acts as a safe guard against the attack of cholera and all sorts of epidemics when used on a healthy and robust constitution. Where doctors and all the existing healing arts have failed to effect any remedy-our Electro-Galvanic Rings-have been found to effect a miraculous cure. In chronic and painful cases given up by doctors as hopeless it has acted as a charm.

It is a pity that some unlettered folks have been deluding the public with heir unusual grandiloquent and trumpeting advertisements by styling them selves as sole manufacturers of Electric Rings &c. whereas they are selling brass stuff in disguise of electricity. We have the assistance and co-operation of some practical scientific men introduced this Electric Galvanic Rings on the recognised basis of modern Science. We can boldly challenge all the existing vendors or manufacturers of the supposed Electro Galvanic Rings and Lockets&c. To prove our assertion and to experiment the igenuineness of the existance of electricity in our production, we request ardently every buyer to place the ring on the tongue, when an immediate and unspeakable sensation would be created-should it prove otherwise, we would refund the value. It serves both the purpose of medicine and ornament as medicine it cures all diseases and prolongs the life, as ornament it enhances the affected beauty and adds lustre to the frame. Considering combination of all advantages, we wish no human life should be without it.

Honesty is our Policy- Benevolence is our aims- Dissemminaton of scientific truth is our ends.

Silver Ring Rs.3. Silver Locket Rs.5
Gold Ring Rs 18. Gold Locket Rs. 20.

N. B. Beware of worthless. imitation. Seeing our large and increasing sale In the market and mofasil some wicked people have been surreptitiously imitating our articles.

24, Mirzapur Street, Calcutta.

K. C. Dass, & Co.
Watch-Makers, Jewellers and Order Suppliers,

पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस:—

वि. वि. आपण आपल्या येत्या अंकीं खालील चार ओळीस जागा द्याल अशी आशा धरून हें पत्र आपणाकडे पाठवितों.

आपल्या "वऱ्हाड वक्तृत्व सभेच्या" १५ व्या समारंभाची सांद्यंत हकीकत कळलीच असेल. परंतु प्रमोदसिंधूच्या पहिल्या अंकांतील आमचे मित्र रे. रे. ह्यांनीं आपल्या पत्रांत कित्येक महत्वाच्या गोष्टींचा फराळ करून सर्व अपयशाचें खापर विद्यार्थ्यांच्या डोक्यावर फोडून आपल्या पत्राची समाप्ती केली. आतां गाळलेल्या विषया संबंधानें चार शब्द लिहितो. ह्या सभेमध्यें सन्मानार्थ भाषण करण्यास कोणी उठून हास्यरसयुक्त भाषण करण्यास आरंभ केला नाहीं तर ते शेवटास जात नाहीं असें मी आज दोन तीन वर्षे पाहत आहें. त्यांत यंदा रा. रा. रामभाऊ पन्हाळकर यांहीं. "विमा" या विषयावर भाषण करण्यास आरंभ केला नाहीं तोंच कित्येक विद्वान साडेतीन शहाणे गृहस्थांनीं (खरोखर व साड तीन होते) पैसे खर्चून मिळविलेल्या खुर्च्या सोडून लहान व अज्ञान मुलांत घुसून टाळ्या वाजवीत व त्यांसही अनुसरण्यास लावीत. विद्यार्थी मंडळीनें गवगवा केल्यावरून त्यांहीं बाहेरून तट्टे वाजविण्यास सुरवात केली व रा. रा. पन्हाळकर यांस उतरण्यास भाग पाडिलें. हर हर! अशा खुर्चीवरील विद्वान मंडळीस हें शोभतें काय? व आपण करूनसवरून निघ्या या "हायस्कूलच्या विद्यार्थ्यांवर विनाकारण दोषारोप देणें त्यांना योग्य दिसले काय? व साळसूदपणानें मास्तरांजवळ जाऊन तुमचे विद्यार्थ्यांवर वजन नाहीं असें ह्मणणें त्यांना शोभलें काय? आतां आमच्या मित्रांनीं आपल्या पत्रांत लिहिलें आहे कीं "विषय बरा नव्हता ह्मणा अथवा त्यांचें भाषण बरें ह्मणा ते लोक समुदायास रुचलें नाहीं" हें ह्मणणें किती वायफळ आहे हें ज्यांनीं रा. रा. रामभाऊ यांचें भाषण ऐकिलें असेल त्यांस सांगणें नकोच व विषय किती महत्वाचा होता हें अध्यक्षांच्या भाषणावरून कळलेंच असेल. दुसरे दिवशीं विद्यार्थी मंडळीनीं बंद केलेलें भाषण पुनः कांहीं वेळ व्हावें अशी सभेच्या व्यवस्थापक मंडळीस व अध्यक्ष साहेबास विनंती केली परंतु व्यवस्थापक मंडळीच्याच आग्रहामुळें त्याकडे लक्ष दिलें नाहीं. जर त्यांनीं दहा पांच मिनिटें भाषण करण्यास परवानगी दिली असती तर काय झालें असतें? पण नाहीं; ज्या विद्वान मंडळीचे तीन चार तास हो नाहींच्या गोंधळांत गेले त्यांनीं जर दहा पाच मिनीटें देऊन भाषण ऐकिलें असतें तर तितका उशीर झाला असतां काय? किंवा कोणी त्यांना नांवें ठेविलीं असती काय? खरोखरच नाहीं; किती दुःखाची गोष्ट; कीं अशा विद्वान मंडळींना येवढ्या मोठ्या महत्वाच्या विषयाचा गोडी कितपत आहे हें उघडच दिसून येतें. बरे आतां, पुढें अशा कोणत्याही प्रसंगीं निचाऱ्या हायस्कूलच्या विद्यार्थी मंडळीवर दोषारोप देऊन मोकळे होऊं नये अशी विनंती करून पत्रकर्ते राव विस्तर फार झाल्या कारणानें आपली रजा घेतों. कळावें. हीं विनंती.

आपला
एक रे. रे. यांचा भाऊ जे. जे.

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस:—

वि. वि. माझा धंदा भ्रमण करण्याचा असल्यामुळें भ्रमण करीत करीत मी ह्या आकोले स्टेशनवर रात्रीचे गाडीनें उतरला. त्या दिवशीं पर्जन्यकाळ नसतां थंडीचे दिवसांत थोडा थोडा पाऊस पडत होता. स्टेशनाबाहेर आल्या नंतर एका खोडमोडींत बसून माझे नेहमीचे उतरण्याचे स्थान जे राजेश्वराचे देवालय तेथें मला घेऊन चल असें मी त्या खोडमोडी वाल्यास सांगितलें. रस्त्यानें चालतो तेव्हां मला दूर अंतरावर कांहीं काजवेच टांगून ठेवल्या सारखा भास झाला परंतु जवळ आल्या नंतर माझा संशय दूर झाला. एडिटरराव ते काजवे नसून दिवे उर्फ कंदील होते व ते कमेटीचे खर्चानें लावलेले आहेत असे त्या खोडमोडीवाल्यानें सांगितलें. ह्या प्रमाणें माझे उतरण्याचे ठिकाण आलें आतां गाडींतून उतरून आपण आपलें गाठोडें घेऊन देवालयांत जा असें सांगून तो खोडमोडीवाला चालता झाला. खोडमोडीवाला म्हणण्याचे कारण इतकेंच कीं मला जो गाडींत बसून जाण्याची खोड आहे ती ह्या अशा सुंदर गाडींत बसल्या मुळें मोडली. पायीं गेलों असतो तर बरें झालें असतें असें मग वाटूं लागलें. ज्या ठिकाणीं मी उभा होतो त्याचे जवळच पोलीस स्टेशन होते. त्याचे जवळ ही काजव्या इतकाच प्रकाश पाडणारा कंदील होता. पुढें मी एकटाच चाचपत व धडपडत देवालयाचे रस्त्यास लागलो. काळोख इतका होता कीं जसजसा मी पुढें चालतो तसें तसें माझ्या पुढें काय आहे हे ही दिसेनासें झाल्यामुळें पायऱ्या जवळच दगडाची ठेंच लागून धाडदिशी खालीं पडलो. थोडक्यानें चुकलें नाहींतर कपाळमोक्षच व्हावयाचा. मग सारी रात्र त्या कमानींत दगडावर पडून काढलो. सभेचा कंदील जर चांगला असतां तर अशी माझी स्थिती झाली नसती. दुसरे दिवशीं सायंकाळीं तेथेंच मला माझा एक जिवलग मित्र भेटला त्यानें मला आपले घरीं नेल्या नंतर मी त्या कंदिलाचे बाबतींत कांहीं हकीकत विचारूं लागलों. तेव्हां तो ह्मणाला बाबारे ह्या कमेटीच्या दिव्यांची स्थिती दिवसेंदिवस ज्यास्तच वाईट होत चालली आहे. गांवांत पेठेंत मिळून बरेच कंदील कमेटीनें लाविले आहेत परंतु पांच च्यार कंदील शिवायकरून बाकीच्यांचा उजेड नेहमीं ० असतो. हें ह्याचें ह्मणणें मला खरें न वाटल्यामुळें आह्मी दोघेंही रात्रीं कंदिलाची खरी व्यवस्था कशी आहे तो पहाण्याकरितां सर्व पेठ शहर, व कंपांडनमेंट फिरलों त्यावरून असें आढळून आलें कीं, ज्या ठिकाणीं कमेटीचे मुख्य अधिकारी किंवा कंदिलाची देखरेख करणार कमेटीचे अधिकारी राहतात त्याचे घराजवळील व एकदोन चवाऱ्यावरील कंदीलाचा मात्र उजेड बाकीच्या कंदिलाचे मानानें चांगला दिसला. एकेठिकाणी असेंही आढळून आलें कीं कंदील वाल्याचे हातून चुकून एका कंदिलाची बत्ती ज्यास्त वर चढविलेली होती त्यामुळें उजेड ही चांगला पडला होता तो त्यास सहन न होऊन त्यानें पुन्हा तेथें येऊन आमचे समक्ष तो उजेड आगदीं काजव्या प्रमाणें करून सोडला. आम्ही त्या मनुष्यास विचारता त्यानें सांगितलेंकीं मी मक्तेदाराचा मनुष्य मला सांगितल्या प्रमाणें मी करितो. ठीकच आहे. मक्तेदारानें जर उचळपट्टी करून कंदिलाची व्यवस्था सुरख ठेविली तर त्यानें जो एक रुपया एक आण्याचा मक्ता घेतला आहे त्यात त्यानें काय मिळवावें. कारण ह्याच मक्तेदारानें गत वर्षी १८५ स मक्ता घेतला होता व त्याच कामाकरितां स्वस्ताई नसतां यंदा कमेटीनें त्यास १८१ दिला आहे तर कामही त्यानें कमीकेलें पाहीजे. कांहीं ठिकाणी पाहावे तों कंदिलांत आर्धीच चिमणी. कंदिल बहुतेक सर्व मैले. ह्यावरून असें वाटतेंकी कमेटीच्या आधिकाऱ्यांचे ह्या बाबतीत दुर्लक्ष्य किंवा कंदिलाची देखरेख करणारांची मक्तेदारानें समजूत केल्यामुळें मक्तेदाराला अशी वाईट सवय लागली असावी. योग्य ठिकाणी कंदील आहेत अगर नाहींत हे पाहण्याकरितां बरेच दिवसापुर्वी एक सबकमेटी होनेमल्याचे कळले परंतु ती जागेच जागेच निद्रस्थ झाली कीं काय नकळे. असो ह्या बाबतीत जितक ल्याहावे तितके थोडेच होणार आहे. करिता कमेटीस इतकीच माझी सूचना आहे कीं हल्लीची जी १० लाईनची बत्ती आहे ती १६ निदान १४ लाईनची स्टेशन बरील दिव्या प्रमाणें करावी. व १८१ जर मक्तेदारास पुरे होतो असे वाटल्यास ह्याची देखरेख ज्यास्त चोख ठेवावी म्हणजे लोकांवर उपकार होतील. लोकांनीं ह्या बाबतींत कांहीं उचल करावी तर आपले कोणी ऐकणार नाहीं करितां चोराचे हातची कंगोटी ह्या म्हणी प्रमाणें कांहीं नाहीं त्यापेक्षा काजवा बरा असे समजून स्वस्थ बसतात. तुमच्यासारख्यानी ह्या बाबतीत कांहीं ल्याहाव तर तुम्हाला उठाठेव करण्याचा काय जरूर कारण तुचे घराजवळील कंदील जवळ कमेटीचा इन्स्पेक्टर राहात आसल्यामुळें चांगला असतो व कमेटीचे शिपाई सारीरात्र तुमचे पडवीत पाहारा करतात हा फायदा पत्र फार लांबले कदाचित् पेटी दाखवाल ह्या भितीनें पुरें करितो. कळावें लोभ असावा हिविनंती.

" नारद "

राष्ट्रीय सभेचा तिसरा समारंभ

(मागील अंकानरून पुढें चालूं.)

अनुकरण हें मानवी जातीला साहजीक आहे. नवीनगोष्ट पाहिली व ती जरा मौजेची, कीवा चटकदार वाटली कीं तीच्या बऱ्या वाईट गुणाकडे लक्ष नदेता तीचा स्वीकार करण्याकडे मनुष्याच्या मनाची प्रवृत्ति होते. प्रथमच इंग्रजी सुरूं झाली तेव्हां ही प्रवृत्ति किती प्रबल झाली होती याचा अनुभव सध्यां अव्वल इंग्रजीतील प्रथमच इंग्रजी शिकुन विद्वान झालेली जी मंडळी शीलक आहे त्यांचा आचार विचार व वर्तनक्रम यांवरून चांगला येतो. या मंडळीच्या मताप्रमाणें आपले धर्मवीधी, आपले सामाजीक आचार येथोन तेथोन चट सारे दुषित आहेत. त्यांत सुधारणा झालीच पाहिजे. हा सर्व प्रभाव अत्युत्कट अनुकरणेच्छेचा आहे. थोड्याच दिवसांपूर्वी मुंबई व पुणें येथील कांहीं प्रमुख वर्तमानपत्रकर्त्यांमध्यें सुधारक व त्यांचे प्रतिस्पर्धी यासंबंधानें मोठ वाद चालला होता. या वादाचा निकाल काय झाला हे राष्ट्रीय सभा मध्यें आल्या कारणानें अद्याप समजलें नाहीं. या वादामधील कोटी प्रति कोटी खरोखर विचार करून वाचण्या सारख्या आहेत.

कोणत्याही गोष्टींत सुधारणा करावयाची ती एकदम " घेसुरी व घाल उरी " या प्रमाणें एकदम करता कामानये. राजकीय काय व सामाजीक काय कोणतीही गोष्ट फार पुरातनकाळापासुन जर वहिवाटीत आहे तर तीचे उन्मूलन एकदम करूं म्हणाल तर कधीं व्हावयाचें नाहीं. त्याचप्रमाणें अनाद्यनंत काळा पासुन चालत आलेल्या ज्या आपल्या रीतीभाति आहेत त्या आपण एकदम विसरूं पाहूं तर तसें कधीं चालावयाचें नाहीं. धीरानें व सोईनें एखादी गोष्ट जशी लवकर सिद्धीस जाते तशी अविचारानें व घाईनें जात नाहीं. यावरून " तातस्य कूपोयम् " असें म्हणत बसावें असा माझा हेतु नाहीं. कवि कुल गुरूं कालीदास म्हणतात कीं " पुराण मित्येव न साधु सर्वम् । नचापि सर्वं नवमि त्यवद्यम् " ॥ या वाक्यावर माझा पूर्ण भरवसा आहे व प्रत्येक मनुष्यानें आपल्या वर्तन क्रमात कोणत्याही गोष्टीचा सारासार विचार पहातांना याच उक्तीवर नजर दिली पाहिजे. आपल्या लोकांत सामाजीक संबंधाच्या दुष्ट रीती अनेक आहेत खऱ्या परंतु त्यांचे नीर्दालन कोणी आज करूं म्हणाल तर समाज ऐकेल कां ? या गोष्टीला सरकारची मध्यस्ती जरी मिळविली तरी देखील ही गोष्ट शक्य होणार नाहीं मग एखादा सुधारला म्हणविणारा गबरू आपल्याच वाक्पटुत्वावर किंवा लेखन शक्तीवर ती गोष्ट शेवटास नेईल हें लांबच आहे. हें आपल्यांतच सुधारण्यासारखें जेवढें म्हणून आहे त्याविषयीं झालें. आतां परकीयांच्या अनुकरणाविषयीं पाहूं.

कोणतीही गोष्ट परकीयांपासून घेणें ती घेतांना विचार करून घेतली पाहिजे अनुकरणें हें मनुष्याचें जरी शील आहे तरी ही अनुकरणेच्छा उच्छृंखल होतां कामानये. सर्व जगजर कालमानानुसार पुढें चाललें आहे तर आपणच कां मागें रहावें इत्यादी गोष्टी खऱ्या आहेत. तरी " रुचेल ते बोलावे व पचेल तें खावे " अशी आपल्यांत एक म्हण आहे त्या प्रमाणें आपल्याला वागलें पाहिजे. इंग्रज लोक सुधारलेले आहेत; त्यांत आमकी आमकी गोष्ट सभ्यतेची मानितात म्हणून ती आपण ही स्वीकारली पाहीजे असें नाहीं. आपल्याला त्या गोष्टीचें अनुकरण करणेंच असेल तर प्रथम आपल्याला ती मानवतें कीं नाहीं याचा विचार केला पाहीजे; आपल्या कालमानाला व व योग्यतेला शोभतें कीं नाहीं हेहीं पाहिलें पाहिजे. हे विचार मनांत आणून नंतर जी काय सुधारणा करावयाची ती केली पाहीजे.

आपण प्रथमतः आपल्या लोकांत सुधारण्या जोग्या कोण कोणत्या गोष्टी आहेत हें पाहूं व नंतर त्याचा पृथक् पृथक् विचार करूं एखाद्या प्राजल मनाच्या परकीय गृहस्थाला आपली सर्व सामाजीक अवस्था दाखविली तर तो तिच्यांत बहुतकरून खालीं दिलेलीं व्यंगे दाखवील:-- (१) विवाह पद्धति; २ शिक्षण पद्धति ; ३ समाज दरिद्रता; ४ शरीर नीर्बलता; ५ भाषा संका; ६ व्यापार पराङ्मुखता; ७ जाति भेद; आणि ८ कृषिदैन्य.

(पुढें चालूं.)

वऱ्हाडसमाचार.

मित्ती माघ शुद्ध ३ शके १८०९

गतवर्ष.

गतवर्ष समाप्त होऊन आज एक पंधरवाडा झाला; परंतु कांहीं अडचणी मुळें गेल्या वर्षाकडे दृष्टी फेकण्यास आम्हास होळी पर्यंत सवड झाली नाहीं. आमचे बहुतेक बंधू सालारंभीचे आपलें हें कर्तव्य कर्म बजावून बसले आहेत. आम्ही मात्र मागें राहिलों आहों याकरितां या बद्दल आपल्या वाचकांची क्षमा मागून गतसालीं आपण काय काय केलें व काय काय पाहिजे याकडे जरा दृष्टी फेकूं.

गत सालाला आरंभ झाल्यावर लवकरच आमच्या देशांत एक महोत्सव झाला. हा उत्सव आमच्या वाचकांच्या स्मरणांतून अद्याप गेला नसेल. आपल्या परम प्रतापी भाग्य शाली महाराणी साहेबांच्या राज्यास ५० सावें वर्ष लागलें या बद्दल त्यांच्या राज्यांतील सर्व प्रजांना आपला आनंद प्रदर्शित करण्यां करितां जागोजाग उत्सव केले आमच्या हिंदुस्थानांत तर या महोत्सवाचा थाट फारच फारच अपूर्व व अवर्णनिय झाला तो इतका कीं खुद्द लंडन शहरांत ही तसा झाला नाहीं. दिवसभर काबाड कष्ट करणाऱ्या मजुरा पासून तों कोट्याधिश श्रीमंता पर्यंत सर्वांनीं या समयीं आपली राजनिष्ठा व आपले आनंदोद्गार इतक्या उत्सुकतेनें प्रदर्शित केलें कीं तशी उत्कंठा दिपवाळी खारख्या राष्ट्रीय महोत्सवाच्या प्रसंगीं देखील दिसून येत नाहीं लाखो कोट्यावधी रुपये खर्च होऊन नाच तमाशे दीपोत्साह झाले; नजर नजराणे आनंद प्रदर्शक पत्रे यांच्या रुपानें हजारों रुपये उडून गेलें; दण या सर्वांचा मोबदला प्रजेला मिळाला काय? कांहीं नाहीं. व्हाईसराय स्थानिक सरकार किंवा असेच दुसरे अधिकारी यांच्या तोंडून मिळालेली कोरडी अभिवचणें, व कांहीं निवडक गृहस्थांस मिळालेल्या फुकटच्या पदव्या, हेंच. ज्याच्या योगानें आमच्या राज्य कर्त्रीचें नांव चिरकाल अम्हांला आठवेल अशा गोष्टी म्हणण्या सारख्या मुळींच झाल्या नाहींत आम्हाला कोणत्याही प्रकारें नवीन हक्क मिळाले नाहींत किंवा आमच्या वरील करांचे व जुलमाचें ओझें तिळमात्र उतरलें नाहीं. आतां जागों जाग माहाराणी साहेबांचे ज्युबिली स्मारक म्हणून कोठें टाऊन हाल, कोठें धर्मशाळा, कोठें कांहीं, कोठें कांहीं असें झालें खरें परंतु ज्या कोट्यावधि रुपयांचा चूर उडाला त्यांची तुलना करितां या गोष्टा कांहींच नाहींत. आमच्या वऱ्हाडांत तर तें सुद्धां झालें नाहीं. आमचे सदर स्टेशन उमरावती येथें टाऊनहाल करण्याचें घाटत होतें व अद्यापही घाटतच आहे. परंतु आमच्या उमरावतीकरांच्या इतर गोष्टींप्रमाणें या गोष्टींचेंही ओम् फस् झालें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. अकोल्यास नाहीं तरी ह्मणाला पीपलस् पार्कमध्यें एक छोटीशी इमारत स्मारक ह्मणून बांधीत आहेत. पण तिचा आह्मांला किंवा गरीब गुरीब प्रजेला काय उपयोग! साहेब लोकांचेंच धन. मुंबई इलाख्यांत धंदे व कला शिक्षणाची मोठी शाळा स्थापण्याचें घाटत होतें परंतु ता गोष्टही शेवटीं फसली. सारांष ज्युबिली ज्युबिली म्हणून अबालवृद्धांना वेड लागल्यासारखें झालें होतें परंतु तिचा उपयोग आह्मां हिंदुस्थानवासी जनांना कांहीं झाला नाहीं. धन्य आमच्या होळकर, निजाम, शिंदे वगैरे एतद्देशीय राजाची कीं ज्यांनीं या महोत्सव प्रसंगीं आपल्या प्रजेला चिरकाल स्मरण रहाण्याजोग्या सुखाच्या व कल्याणाच्या गोष्टी करून दिल्या.

युरोपांतील राजप्रकरणी गोष्टींशीं आमचा निकट संबंध असल्या कारणानें तिकडे कांहीं चळवळ झाली ह्मणजे आह्माला फार धास्ती पडते. गुदस्त सालीं अशी चळवळ फारच झाली व रणकंदन माजेल अशी धास्ती पडली होती. अद्याप देखील बिगैरिया प्रकरण धुमसतच आहे. आयरीश प्रकरण तर हातघाईवर येऊन त्याचा परिणाम आज उद्यां कांहीं तरी भयंकर थरावर जाईल अशी धास्ती पडली आहे. युरोपांतील मोठालीं राष्ट्रें रशिया, फ्रांस वरकड हीं एकीकडे व जर्मनी, इटाली आणि इंग्लंड एकीकडे असें होऊन कोठें कुरूक्षेत्र होण्याचा रंग दिसत आहे. जिकडे तिकडे लढाईची तयारी होत असल्याच्या बातम्या येत आहेत. गुदस्त सालीं अशाच बातम्या येत असत परंतु सुदैवानें तसा प्रसंग आला नाहीं ही आनंदाची गोष्ट आहे. यंदा ही लढाई या खबरा प्रसिद्ध करण्याचा प्रसंग न येवो अशी परमेश्वराजवळ आमची प्रार्थना आहे.

१८८६ साल अखेर पब्लिक सर्व्हिस कमिशनची स्थापना झाली होती त्याचें काम गतसालीं खल्लास झालें. या कमिशनचा रिपोर्ट अद्याप बाहेर आला नाहीं व याचा निकाल काय होणार हेंही अद्याप समजलें नाहीं तथापि या समोर ज्या साक्षी झाल्या आहेत त्यावरून सर्व कमीशनमध्यें असलेल्या सभासदांवरून याचा निकाल लार्ड डफरीन साहेबांच्या अभिवचनास अनुसरूनच होईल अशी आशा आहे. या कमिशनमुळें साक्षी होत असतां पुस्कळ महत्वाच्या गोष्टी बाहेर आल्या आमच्या देशांतच एतद्देशीय लोकांपैकीं कुलीन, श्रीमंत अशा घरास यांतून सनदी नोकर निवडण्याची जी रीत आहे ती बहुमतानें नापसंत ठरली आहे. एतद्देशीय लोक दिवाणी प्रकरणांत न्यायाधिशाच्या मोठमोठ्या अधिकारांच्या जागा करण्यास लायक ठरले आहेत. फौजदारी खटल्यामध्यें न्यायाधिशाचें काम करण्यास आमचे लोक नालायक आहेत असा आरोप कांहीं जणांच्या तोंडून निघाला होता परंतु ती खोटा व निर्बल ठरला. आहे. बीन सनदी जागांपैकीं मोठमोठाल्या जागा सर्व युरोपियनांनीं बळकाविलेल्या आहेत व एतद्देशीयांस काम अधीक असून ते मोठमोठ्या अधीकारास लायक असून ही कमी पगारावर व कमी दर्जावर कामकरावें लागत आहे. आंग्लो इंडीयनांपैकीं कित्येकांना नेहमीं प्रमाणें या प्रसंगीं हीं आपला आपलपोटे पणा व असहिष्णुता दाखविली. परंतु त्या लोकांमध्यें ही निर्भिड व सत्यप्रि अशा गृहस्थांनीं आपली मतें योग्य रितीनें व निःपक्षपातानें कमिशन पुढें ठेविलीं या कमिशना नंतर लवकरच शिक्षण, पोष्ट हाफीस कष्टम वगैरे इतर खात्यांतील अधिकाराच्या जागांचा विचार करण्या करितां दुसरें एक उपकमिशन नेमिलें याचा ही निकाल अद्याप समजून आला नाहीं.

पुढें चालेल.

The Berar Samachar

MONDAY JANUARY 16, 1888

In the list of New Year's honours we find the names of several gentlemen, who have obtained a reward for their disinterested public services. We are extremely glad to note that Rao Bahadur Krishnaji Laxman Nulkar has been made a C. I. E. The distinction has been well deserved. It appears that his services in connection with the Public Service commission have been thus rewarded. In honouring him Government have honoured the Poona Sarvajanik Sabha of which he is the chairman. Mr. James Braithwait Peile who is now appointed a member of the Secretary of States' council and who formerly held seats on the councils of the Governor of Bombay and the Viceroy has been made a knight. The same distinction has been conferred on Mr. Edwin Arnold whose able services in the Educational Department have been recognised though very late. He recently appeared before the Public as a tourist and his admirable and literary descriptions of his travels in India will not be long forgotten. We are also glad to note that the Hyderabad noblemen, Nawab Bushirud Dowla and Khurshid Joh Bahadur have been knighted. In them His Highness the Nizam has been honoured and his muificent offer of public money has been practically appreciated. The title of Mahmahopadhyaya has been conferred as a personal distinction on Pandit Kabi Raj Shyamaldas of Meywar and Bhima charya bin Rambhat senior Shastri Elphinstone College. We are not able to find any names of Berar officers in the list. We have often complained that

Berar does not receive its share in the distinction of honours and the complaint has not been yet removed. We hope the Government of India will direct its attention to this matter.

There appears a Telegram in the Times of India of 3rd January from which some of the suggestions made by the Public Service commission could be known. There are to be 2 civil services, one Imperial and the other Provincial. The Imperial service will be on the lines of the present covenanted Civil Service and a certain selected appointments will be reserved to it. The Provincial service will include the rest of the appointments and there will be collectorships and Judgeships amongst the number. It is said that the changes are to be introduced very gradually and the vested interests of the present holders will receive due weight. It has also been proposed to raise the age limit from 19 to 22. We know that it was stated formerly that it was not the intention of the commission to recommend examinations in India. We hail with delight the proposal to increase the age limit. The powerful agitation on the subject appears at last to have evoked its fruit. We cannot say whether the proposed divisions will be an uninmixed good, nor do we understand why certain appointments are to be regarded as Imperial unless they are such as involve the preservation of British Power in India. Again we doubt whether the Telegram has been sent round as a feeler. It would be better if appointments to the Provincial service be made by examinations in India. A compromise may be effected between different by making it a condition that before nominee is appointed he will have to undergo a tour to Europe in the manner prescribed by Government.

The hon'able Mr. Nanabhai Haridas, Preisne Judge of Her Majesty's High Court, Bombay has made the following suggestion to the Bombay University which is as practical as it is forcible. We hope it will receive the consideration that it deserves:

Year after year complaints are heard from various quarters about the different examinations held by our University. Frequent and numerous failures and consequent disappointment and heart burning result. They cannot all be owing either to want of ability in the candidates to study, or in the highly renumerated Professers and Masters in our affiliated Colleges and Schools to teach the subjects prescribed by the University: nor can they be ascribed to any unwillingness on the part of the students, who are all actuated by the strongest motive to profit by the teaching of those Professors and Masters. And still less can they be attributed to any idleness or reluctance to teach on the part of these latter. It is very desirable, therefore, to ascertain the real causes of such failures, with a view to remove or at all events to diminish them if possible. With the object in view, I would propose to the Syndicate to appoint a Committee of Enquiry, to consist of Fellows, with liberty to examine the Records of the University, and to take the evidence of the University officers, and of such examiners, candidates, Professors, Masters, and others, as may choose to offer themselves, and to report the result to the Syndicate.

To

The Editor of Berar Samachar,

Sir,

As one who owes a great deal to Berar I cannot but look with feelings of joy and pride at every onward step that she is taking in the long run of the present progressive times. The progress which she has made in an incredibly short space of the last few years in matters, social, political and intellectual may well furnish a beautiful theme to the future historian. Her Sarvajanik Sabha and Municipal Institutions, her Elocution gathering and the Educational conferrence, her ssciał clubs, her horse and cattleshows, and above all the increasing interest that she is taking in commerce, journalism and education, are all signs that give promise of a bright future. They convince us that our little province is keeping pace with the spirit of the times and is by no means wanting in those energies and capabilities that have so prominently distinguished the other provinces and presidencies. Her educational Department in particular has, on account of a number of wise and useful measures it has introduced, become an object of envy to the sister presidencies that have a start of her in this matter. Although entirely under a native control it has achieved a success that would do honour to the most successful educationist in Europe, success which induced the highest authority of the province to applaud it in the most enlogistic terms last year.

Under these circumstances I need hardly describe to you, dear, Editor, how delighted I was when I heard the other day that a movement was set on foot by some of your worthy townsmen to hold an annual social gathering of the old students of the Berar High schools like the ones held at Poona and Bombay. I am extremely happy to see now that the movement is a decided success and that the first gathering will be held at Akola in February next. Well done, friends! That was just the thing we wanted. Oh! the happy thought of flocking together, after the cares and worries of the age, to do homage to our *alma mater* what a host of happy recollections rush back to our memory at the mere mention of this sacred name. No man, however circumstanced he may be, can have a "soul so dead" as not to reflect with feelings of grateful joy and pride on the prosperity of this beloved *alma mater*. What can be more gratifying than the sight of a number of gentlemen, young and old, rich and poor, all sons of the same *alma mater* (I am talking of both the institutions as one) gathered together to greet one another and to rejoice over the prosperity of their common mother who once fed them intellectually and made them what they are? What can enkindle feelings of brotherly love in our breasts, and strengthen the ties of friendships that exists between us more effectually than an occasion like this, an occasion which would bring together a number of persons of different creed and colour who once passed their time happily together eating, drinking, reading and playing perhaps under the same roof, but whom life and destiny have now severed far away from one another. What can call our minds back from the hard and stern realities of life to the happy and golden school boy days in so pleasing and agreeable a manner? Nor can our gathering be less conducive to the organization and wellfare of society. Society, it is said, is nothing but a relation of mutual services based on mutual knowledge and moved by mutual love. You cannot serve your friend unless you know well his needs, and you will not be able to know his needs unless you meet on an occasion like this. Really no occasion can be more appropriate for the old, with their experiece of the wear and tear of life, to tender their advice to the young, and for the rich to help and relieve the poor. It is a happy sign of the times, dear Editor, that our young men are now being broadly awakened to a sense of their duty. The age of blind imitation and shallow ostentation is passed. Higher education has opened before us more ways than one to make ourselves useful, to ourselves and to society. Education and organization are the only means that can save a fallen country. Educate, therefore, the lower classes and organize yourselves into bodies, no matter however small or insignificant. Remember that Gladstone' Morley and others are doing nothing but carrying out the behests of organized Irish farmers, and British labouring men. Remember also that the names which figure most prominently in European History are not those of kings and generals but of the organizations of poor and illeterate men.

Let there be a truce to all higher education if to criticize the measures of Government and battle in politics is looked upon as its only object. We have had enough of politics till now and we have gained nothing thereby. If our country has suffered, not on account of an alien government and the unfavourable laws and regulations consequent on it. It has our own exclusiveness and self-sufficiency, our own want self helps and self organisation, that have disunited us as a people and ruined us as a nation. Let us therefore be up and doing and ameleorate ourselves first. Let us educate our unfortunate brothren and teach them to help themselves. They say we have a glorious future before us. Let us realize it at once. Let us sink our petty difference of caste creed and colour and shake hands together to work earnesely for common weal. Let us preserve our nationality to the end whatever our surroundings may be and devoting ourselves, life and soul, to the service of our country, as the best way of serving ourselves, say with the poet.

Brothren let us walk together in the bands of love and peace; 'Tis in union right and joy wealth and love increase.

Jalgaon 10th January 1888. — Yours &c. One of them.

वऱ्हाड.

हवामानः — हवा थंड, आकाश स्वच्छ अकाली पावसामुळें हवेतील थंडी जास्त होऊन थोडीशी अपकारक झाली आहे.

अलिशान रेसिडेंट साहेबांची स्वारी वऱ्हाडांत चालुमहिन्यांत येणार असें म्हणतात.

येथील डे. क. आफिसचे हेडक्लार्कची जागा मि. सी. गाडफ्री यास मिळालीहोती पण, ती व्यवस्था आता रद्द होऊन येथे मि. एन्. मेर जे थोडे दिवसां पूर्वी जु. क. आफिसचे सुपरिंटेंडेंट होते ते येणार अशी बातमी आहे.

मि. सी. एच्. प्राईस ए. अ. क. हे रजेवरून गेले आठवड्यात येथे परत आले. ते येथे ट्रेझरी आफिसाचे काम पाहणार.

क्यापटन् ग्यारट यांनी मोर्शी कोर्टाचा चार्ज घेतला; मि. सफदर अली यांनी मुर्तिजापुर तहशिलीचा चार्ज घेतला; आणि र. रा. काशानाथ बाळकृष्ण जोशी तहसिलदार यांची बदली मेहकरास झाली व त्या प्रमाणें ते तिकडे गेले.

रिसोडस्थ "क्ष" व "पेमेच्छु" व "चातुक":—आपली सर्वांचीं पत्रें पावलीं. स्थल संकोचामुळें घेतां आलीं नाहींत. तथापि निराश होऊं नये.

हैदराबाद अमानी मुलखाच्या १८८६।८७ सालचा लोकल्फंड रिपोर्टाची एकप्रत आम्हाकडे आलीतिचा आम्ही आभार पूर्वक स्विकार करितो.

प्रसिद्ध विष्णुपंत छत्रे यांचें घोड्यांचें सरकस येथें येणार असें म्हणतात.

रा. रा. गंगाधर मुदलियार असिस्टंन्ट क्लार्क आफ हैदराबाद रेसिडेन्सी बझार्स कोर्ट यांस वऱ्हाडांत एक्स्ट्रा असिस्टंन्ट कमिशनर नेमले असें डेक्कन टाईम्स पत्रा वरून कळतें.

क्यापटन वारन् हेस्टिंग्ज, व डाक्तर मोरान हे अधिकारी लवकरच फर्लोवर जाणार आहेत असें कळतें.

येथील स्माल्काज कोर्टाच्या क्लार्क आफ कोर्टच्या जागीं रा० रा० दामोदर नानाजी शिंदकर यास नेमलें असें समजतें.

उमरावतीस तेथील लायब्ररीची जनरल कमेटी होऊन, रा. रा. पुरुषोत्तम नारायण भट ए. अ. क. यांस अध्यक्ष, मेसर्स वामन रावजी भोळे आनररी अ इंजिनिअर, रघुनाथ राव तळवळकर हे. मा. हायस्कूल, प्रल्हाद नारायण जोग बि. ए. एल एल, बी; व एकनाथ लक्ष्मण वकील यांस उपाध्यक्ष आणि मेसर्स गोपाळ रामचंद्र नागपूरकर व वासुदेव नारायण जोग यांस चिटणीस नेमन्यांत आलें आहे. घंटेवराजवळ लायब्ररीकरितां एक छानदार इमारत बांधण्याचें काम चालूं आहे, एकंदर सुमोर ६।७ हजार रु. खर्च येईल. येत्या "वर्षप्रतीपदे" च्या सुमुहुर्तावर तेथें लायब्ररी सुरूं करण्याचा समारंभ होणार आहे.

डा० मोन्याम येथील सि. सर्जन हे दीड वर्षाच्या फर्लोवर जाणार आहेत असें समजतें.

रा. रा. कृष्णाजी हरी येथील तहशिलदार यांस आरूच्या कायद्याप्रमाणें अधिकार मिळण्याविषयीं शिफारस झाल्याचें कळतें.

(मागाहून आलेली नोटिस.)

नोटीस.

शिवलाल झुंबरलाल मारवाडी रहाणार बन्ह तालुके चांदूर जिल्हा उमरावती यांसः-

खालीं सही करणार रामधन तुलसीराम मारवाडी यांजकडून नोटिशीनें असें कळवितों कीं, तुह्मी प्रमोदसिंधु अंक ५० तारीख २६–१२–८७ इसवीचे अंकांतून नोटीस दिली ती पावली. मी सुमोर १९ महिन्याचे सुमारास तुह्मी हिशेब करून मागितला ते वेळीं हिशेब करून दिला व मजकडे जी रकम ते वेळीं निघाली तिचा जमाखर्च भवानीराम तुलसीराम यांचें खात्यांत करून त्यावर रुजुवातीची सही तुलसीराम मारवाडी यानें करून दिली, व हिशेब चुकता केला. त्या नंतर अलीकडे १९ महिनें मी तुमच्या करितां कोर्टांत जीं कामें केलीं त्या बदलचा मुशाहिरा मजला तुमचे कडून घेणें राहिला आहे तो बुडवावा या हेतुनें तुह्मी ही मजला खोटी नोटीस दिली आहे. या नोटिशीनें असें ही पुन्हा कळविण्यांत येतें कीं, ही नोटीस पावल्या दिवसा पासून आठ दिवसाचे आंत नोटिशीचें खर्ची मुद्दां माझा सर्व मुशाहिरा देऊन टाकावा- जर मुदतींत तुह्मी मुशाहिरा देणार नाहीं तर कायद्या प्रमाणें योग्य तजवीज केली जाईल. कळावें तारीख १३ माहे जानेवारी सन १८८८ इसवी दस्तुर जयदेव गणेश देव.

(सही) रामधनी तुलशीराम मारवाडी दस्तुर खुद.

वर्तमानसार.

हिंदुस्थानांतील २६ कोट लोकांपैकीं दरसाल ६५ लक्ष लोक मरण पावतात. म्हणजे प्रत्येक महिन्यास ५,४१.६६६; प्रत्येक आठवड्यांस १;२६३८५; प्रत्येक दिवशीं १,८०,५५ व प्रत्येक तासा ७५२ व प्रत्येक मिनिटास १२ पेक्षां कांहीं जास्तअसे लोक मरण पावतात म्हणजे प्रत्येक १००० मागें दरसाल २५ मृत्यूचें प्रमाण पडतें.

त्रिचनापल्ली येथें नदीवर दरसाल ता० २८ दिसेंबर चे सुमारास मोठी जत्रा जमत असते. चालूं सालीं हजारों यात्रेकरू, दुकानदार व १०।१२ हजार जनावरें विक्रीसाठीं आलीं होतीं पण पाऊस पडून नदीस पाणी चढूं लागलें त्यामुळें एकच धांदल उडून हजारों रुपयांचा माल, तसेंच शेंकडों गुरें वगैरे वाहून गेलीं व कांहीं लोकही वाहून गेल्याची बातमी आहे.

आनंदाची गोष्ट--आमचे परम मित्र रा. वामन कृष्ण दिक्षित बोधसुधाकरकर्ते यांस 'बीव्हर' च्या सोडतीच्या तिकिटांत ५००० रुपयाचें बक्षीस मिळालें.

स्त्री विद्यार्थिणी—अमेरिकेमध्यें १८००० स्त्रिया विद्याभ्यास करीत आहेत.

सोडसहा टन हिरे-- आफ्रिकेमधील चार खाणी मिळून ४०,००,००,००० रुपये किंमतीचे साडेसहा टन हिरे आलीकडे कांहीं वर्षांत सांपडले. आरबी भाषे मधील सुरस गोष्टीमधील दर्यावर्दी सिंधबाद यांस सांपडलेले हिरे देखील असें ठनांनीं मोजण्यासारखे नसतील.

सुशिक्षित व सुविचारी मुसलमान- कलकत्याचे मुसलमानांनीं गेल्या सालीं न्याशनल कांग्रेस संबंधानें जो तिरस्कार दाखवून आपला वेडेपणा प्रगट केला होता त्याच्या उलट आणि केवळ वाखाणण्यासारखा प्रकार मद्रासच्या मुसलमानांनीं यंदा केला. या लोकांनीं सांप्रत मद्रास येथें भरणाऱ्या न्याशनल कांग्रेस संबंधानें नुसती कोरडी कळकळ दाखविली असें नाहीं. तर त्यांच्या शक्तीप्रमाणें द्रव्यद्वारा मदत केली आहे. हें त्यांचें स्तुत्य उदाहरण इतर हेकेखोर मुसलमानांनीं लक्षांत वागवून आपलें वर्तन सुधारावें यांतच त्यांचें हित आहे.

केमिस्ट्रीनको- एंट्रन्स् परीक्षे करितां रसायन शास्त्र हा एक विषय थोडासा शिकावा लागतो तो सदरी परीक्षेस नसावा असें सेनेटमध्यें ठरले असल्याविषयीं ईस्टकर्ते लिहितात.

वधूसभेट-- चीनच्या बादशाहाचा विवाह झाला. त्या प्रसंगीं बादशाहांनीं आपल्या प्रीय भार्येस पुढील प्रमाणें भेट पाठविली:— ७० सरंजामासुद्धा घोडे १००० साटिनीचे तागे, २०० सुती साड्या ५०० तोळे सोनें २५००० भार चांदी, एक सोन्याची चहादाणी, एक चांदीची चहादाणी, आणि दोन चांदीची तस्तें.

तांदुळावरील कुराण--तांदुळांच्या एका दाण्यावर कुराणाचा पहिला भाग लिहिला आहे. हा कुराण लेखांकित तांदुळ एका अरबानें एका अमेरिकन गृहस्थास त्यानें त्यास दुखण्यांतून उठविल्या वरून नजर केला होता तो त्या अमेरिकननें १८१२ मध्यें एका इंग्रजी आफिसरास नजर केला. याची सांप्रत विक्री होणार आहे.

शूर कोळीं--गेल्या आठवड्यांत माहीम तालुक्यांतील बि. बि. एन्ड सी. आय. रेलवेच्या सोफाला स्टेशना नजीक एका पटाईत वाघाची व एक शूर कोळ्याची झपाझपी झाली. हा कोळी रेलवेवर काम करीत असे. तो कामावरून घरीं परत येत असतां मध्येंच त्यास एका चौताळलेल्या पटाईत वाघानें गांठलें. वाघानें एकदम त्याच्या आगावर उड्डाण केलें. परंतु, ह्या शूर कोळ्यानें सिताफी करून हातांतील बांबूच्या काठीचा फटका त्याच्या मस्तकावर मारून त्यास चित केलें. परंतु, वाघ पुनः सावध होऊन व अधिक चाताळून त्यानें त्याच्यावर चाल करून, पुढील पंजे त्याच्या दोन्ही खांद्यावर मारले. परंतु, त्या शूर कोळ्यानें तितक्यांत त्याचे ते पंजे आपल्या हातांनीं गच दाबून तोल साधून असा हिसका दिला कीं, त्या बरोबर तो वाघ कांहीं फुटांवर जाऊन पडला व भीतिची आरोळी मारून तसाच जगलांत पळून गेला. हा शूर कोळी बराच घायाळ झाला असून दवाखान्यांत आहे. ह्याच्या जवळ शस्त्र असतें, तर ह्यानें त्या वाघास तेव्हांच ठार केलें असतें! परंतु आमच्यावर नाहीं सरकारचा भरंवसा तेव्हां, ते आमच्या लोकांस सशस्त्र कसें करील?

आनरेबल काजी शाबुदिन ह्यांनीं आपल्या जातीच्या मुसलमान लोकांत विद्यावृद्धि व्हावी ह्मणून प्रत्येक वर्षीं २४०० रुपये देण्याविषयीं सरकाराजवळ दिले आहेत.

वऱ्हाड प्रांताच्या उत्पन्नांतून गेल्या वर्षीं जी २॥ लक्ष रुपयांची शिल्लक राहिली होती ती आमच्या सरकारानें निजाम सरकारास दिली.

धुलिपसिंगानें रशियांत नानाकपंथप्रकाश सभा स्थापन केली आहे.

भोजनाच्या वेळीं मोठमोठ्या पंक्तींत वाढण्याचें काम विजेच्या योगानें चालणाऱ्या आगगाड्यांनीं करविण्याची युक्ति फ्रेंच लोकांनीं काढली आहे. शिकस्त आहे त्यांची!

बर्लिन एथें एकानें एक विजेचा दिवा तयार केला आहे त्याचा प्रकाश ५० मेणबत्त्या इतका पडत असतो, हा दिवा डोकीवर बसवून पाणबुड्यास पाण्याच्या तळीं जातां येतें, व त्यांतील प्रकाशानें त्यास तळचे पदार्थ स्वच्छ दिसतात. काय शोध हा!

ते० मि०

सरकारानें माय ळूहोऊन लष्करी खात्यांत आपले इकडील कुलीन व प्रतिष्ठत गृहस्थांच्या लेकरांस जागा देण्याचें वचन दिल्याप्रमाणें ते पुरें करण्यास तयार झालें आहे. आतां लोकांनीं किंमती मागें न घेता आजपर्यंत हिंदुस्थान देशांतील लोक मोठें घाडशी शिपाईकामांत तरबेज असा जो लौकीक झाला आहे त्याची सत्यता करून दाखविण्यास तयार व्हावें. ज्या लोकांची या खात्यांत नोकरी करण्याची इच्छा असेल त्यानीं मिलटरी सेक्रेटारी यांचे मार्फत आर्ज पाठवावा. अर्जात नाव, गांव वडिलांनीं, कुलीनपणाचा दाखला व वाड वडिलांनीं पेश वाईत अगर इंग्रजींत मर्दुमगिरीचीं कामें केलीं असतील त्याची थोडक्यांत माहिती. परीक्षा दिल्याचा दाखला मिळाला असल्यास त्याची नकल या अर्जालगत भिडवावी. मुख्य गोष्ट यांत येवढी कीं अर्जदार कोणत्याही जातीचे असले तरी चिंता नाहीं परतु ते मोठे धुरंदाज व विश्वासूक घराण्यांतील असावेत. अशा आर्जदारास रिसाल्यांत ३० रुपये दरमाहच्या जागा प्रथम अर्जदाराच्या इभ्रती प्रमाणें मिळणार. विशेष माहिती मिलटरी सेक्रेटरीकडे अर्ज केल्यास सर्व खुलासा कळणार आहे. एथेच आणखीएक गोष्ट वाचकांच्या लक्षांत घालण्या सारखी ने० ओ० मध्यें सापडली ती ही कीं, सैन्यांतील नेटिव लोकांच्या संबंधानें कानाट साहेब बरीच खटपट करीत आहेत. तरुण लोकांना जमादारी द्यावी असे यांचें ह्मणणें आहे. शिवाय त्यांनीं नेटिव लोकांच्या पोषाखांत पुष्कळच फेरबदल केलला आहे. त्यांचा पोषाख बहुतेक ब्रिटिशहापीसर सारखा असतो. नेटिव हापिसरांना या गोष्टीपासून बराच आनंद झालेला दिसतो, आणि जरी पोषाखापासून कांहीं ह्मणण्या सारखा फायदा नाहीं तरी हा बदल फारच महत्वाचा आहे. या खेरीज आणिक दुसऱ्या गोष्टी नेटिव हपीसरांस फायदेशीर अशा कर्तव्य आहेत. रिजमेंटांत नेटिव हपीसरांस कांहींच मान नसतो, पगार वाटण्याच्या कामीं सुद्धां सुभेदाराचे मुळींच अंग नसतें, या व दुसऱ्या कित्येक गोष्टीवरून असें चटकन लक्षांत येईल कीं नेटिव हपीसरांवर विश्वास नाहीं. व ह्या गोष्टीचा त्यांना ही खेद होतोच परंतु करतात काय? तथापि ही गोष्ट वाजवी नाहीं. त्याचेवर विश्वास ठेवला पाहिजे, त्यांचेवर जबाबदारीचीं कामें सोपविली पाहिजेत, त्यांस मानले पाहिजे असें मुंबई ग्याझेटचें ह्मणणें आहे व तें सत्य आहे.

मद्रास कडील लेख हिंदु पेट्रीएड पत्रकर्त्यास कळवितात कीं, सावध रहा त्रावणकोरचे हलिच्या राजावर तेथील रेसिडेंटानें लाच देऊन मन वळविण्याचा यत्न चालविल्याबद्दल तोहमत आणली आहे. या बडोदे प्रकर्णापासून बहुतेक पोलिटिकल खात्यांतील लोकांस कोणाचो हक्क काढून घेणें अगर कोणाचें हुकमतीस पाणी लावणें अथवा कोणास गादीवरून पदच्युत करून आपल्या नांवाचा झेंडा मिरवावासा वाटला कीं, तो विषप्रयोग, लाच अथवा बंड या बाबी सरकारापुढें ठेऊन हलकट खटपटीच्या नादी लागतो आणि त्यांत जातीचें महत्व सरकारांत दाखऊन गरीब संस्थानदाराचा नाश करतो. त्यांतलेंच हें कूळ बाहेर पडलें असावें, परंतु आह्मी मद्रासकडील वतमानपत्र कर्त्यांस कळवितों कीं, जलदीनें ही काय हकीकत आहे ती त्यांनीं लवकर बाहेर काढावी, नाहीं तर त्या महाराजांस विपरीत प्रसंग भोगावा लागणार आहे.

इंग्रज सरकारचे पोलिटीकल अधिकाऱ्यांचें मनांत आलें ह्मणजे ते कोणत्याही धोंड्यास शेंदूर फासून त्यांस देव बनवून सोडतात त्यांतील मासला हा पहा. गोंडल संस्थानचे अधिकारी विलायतेस जाऊन आल्याबरोबर ते शहाणें बनले, हुशार झाले. राज्य कारभारत पुरे दरदी समजून सरकारांत त्यांचा आदर होऊं लागला. हा वर्दी रिपोर्ट पोलिटिकल एजंटाकडून सरकारांत गेल्या बरोबर गोंडल संस्थानदारास फर्स्ट क्लासमध्यें घालून त्यांस ११ तोफांची सलामी देण्याचा ठराव झाला ही गोष्ट मोठी आनंदाची आहे.

बुखाऱ्यामध्यें रेलवे स्टेशन बांधण्याचा रशिया सरकारनें बेत कायम केला.

म० मि०

एका घोरपरिणामी गोष्टीची हकीकत आम्हांस कळली आहे. तिच्या सत्यतेविषयीं आमची खातरी झाली आहे. तथापि त्यांस संबंध असलेल्या इसमांची नांवें गांवें आम्ही देऊ इच्छित नाहीं. एका देशीराजांचा या गोष्टाशीं चांगलाच संबंध आहे. ती गोष्ट अशी कीं, एका स्टेशनावर एक मोठी पेटी येऊन पोंचली. तिच्यांतून अतिशय घाण येत असल्यामुळें पाठविणाराच्या माणसांनीं ती पेटी उघडली. आणि आंतपाहतात तों त्यांत आपल्या धन्याच्या तरुण पत्नीचें प्रेत! तिला फार घोर रीतीनें मारिले असावें असें उघड दिसत होते. नंतर प्रेताला मूठमाती दिली. असें समजतें कीं, तिच्या पातिव्रत्याची तिच्या नवऱ्याला शंका येऊन त्यानें हे कृत्य केलें असावें. परंतु त्यानें ज्या रीतीनें ही देहांत देहांत शिक्षा अमलांत आणिली ती रीत ऐकून आंगावर शहोर उभे राहतात. तापवून लाल केलेल्या लोखंडाच्या गोळ्यावर तिला बसाथाला सांगितले. व ती बसेना तेव्हां चाकर माणसांनीं त्या अनाथ बाईला त्यावर जोरानें बसून कांहीं वेळ तशाच तेथें धरली! तेथून तिला चांगली भाजली असें पाहून उचलली पण ती निचेष्ट जमिनावर पडली ती सावध झालीच नाहीं. असें अलाहाबाद येथील मानिंग पोस्ट नांवाचे नवीन निघूं लागलेल्या ब. पत्रावरून कळतें.

न्या० सि०

जाहिरात.

टपाल खर्च ०४ आणें

वनौषधी सार्सा प्रमाणें.

किमत एक बाटलीस १॥ रुपया

औषधी सोबत कागद व चमचा.

फक्त एकाच औषधापासून खालीं लिहिलेले सर्व प्रकारचे रोग दूर होतात, व त्या संबंधानें झालेला पत्रव्यवहार व सर्टिफिकिटें स्थळ संकोचास्तव न देतां रोगांचीं नांवें मात्र दिलीं आहेत. उपदंशजन्य गरमीचे अनेक प्रकारचे रोग, धातु, खर, स्त्रियांस धुपणी लागते ती रक्त दूषीत झाल्यापासून हाता पायांवर डाग पडणें. सर्व त्वचेचे रोग, कच्चा पारा सेवन केल्यानें सूज येणें, कळा लागणें व सर्व प्रकारचा संधी वायू, गंडमाळा, पिनस, जळवात, कडकी, अम्ल पित्त, पोटशूळ पोट फुगी, नळ वायू, मस्तक शूळ व मुखरोग, जिभेवरील चट्टे, दातांतून पू येणें, रक्त येणें व तोंडाची दुर्गंधी आदिकरून सर्व रोग वरील औषधानें बरे होतात.

☞ पत्ता—मुंबई फणसवाडींत बाळकृष्ण भिवाजी नाखवा याचे चाळींत डा धाकजी भानजी सावंत.

Dr. D. B. sawant.

30-12-1887

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साहामाही " ३ " ०८
साल अखेर ७ " १०१८
किरकोळ अंकास ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळीचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस .....

Per annum in advance 5 Postages 13 as
Per annum in arrears 7 " 1R. 8 as.
Six monthly ..... 3 " 8 as
Single copy ..... 6 as.

Advertisements.
Below 10 lines...
Per line over 10...4a
Repetition per line 3a

वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VLO. XXII AKOLAMONDAY 23 JANUARY 1888. NO4.

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख २३ माहे जानेवारी सन १८८८ इ० अंक ४.

पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

ता० १५ । १ । ८८ इ०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष वर्तमान पत्रें वाचीत असतां उमरावतीचा प्रमोदसिंधु वाचण्यांत आला. त्यांत एक ता० ६ । १ । ८८ इसवीचें पत्रांत रे रे चें पत्र छापलें आहे. ते वाचून पाहतां साश्चर्य दुःख झालें. अहो महाराज विद्येपासून मुलें बिघडत नाहींत उलटी चांगली होतात असें नुकतेच कान्फरन्सच्या वेळीं वाद होऊन ठरविण्यांत आलें होतें- त्यावेळीं कारण असें झालें होतें कीं मिस्तर चिकाटे यांणीं शाळेंतील निती शिक्षण या विषयावर निबंध वाचला होता, त्यांत विद्येपासून कांहीं मुलें बिघडतात असें कोठें लिहिण्यांत आलें होतें त्याजवर सर्वांनीं हक्क करून विद्येपासून निती वाढते वगैरे प्रतिपादन केलें व तो मुद्दा खोडून काढिला. त्या गोष्टीस फार दिवस झाले नाहींत तोंच उमरावतीच्या बोरडिंगांतलि मुलांनीं गेल्या वक्तृत्व सभेच्यावेळीं नीती शिक्षणाची बाहार करून सोडली व जगा पुढें आणल्या आपल्या विद्वान गुरुच्या व आजपर्यंत नावाजलेल्या उमरावती हायस्कुलच्या अब्रूची अशी व्यवस्था करून दाखवावी ना !!! एकूण गुरूची विद्या गुरूना फळास अशा प्रकारे यावीना !! त्या पत्रांत रे रे ह्मण तो सालमजकुरची सभा कशीतरी शेवटांस गेली! ज्या सभेंत मिस्तर तळवळकर अध्यक्ष त्या सभेची अशी दशा व्हावी ना ! वऱ्हाड शाळाखात्यांत मिस्तर तळवळकरासारखा म्यानेजर नाहीं अशी बहुतांची समजूत आहे. तें तसें आहे.असें म्हणण्यास हरकत नाहीं. असें असतां मुलांपुढें व तीं मुलें त्यांनींच शिकविलेलीं अगर निदान त्यांच्या विद्यालयांतील त्यांनीं आपल्या वरीष्ट गुरुंची सर्व सभाजनापुढें, हरएक प्रकारें उपदेश केला तरी ही मानहानी करावी ही केवढी अचंब्याची गोष्ट आहे! ज्या सभेमध्यें आजपर्यंत कधींही अशा प्रकारची घाणेरडी गोष्ट होऊन सभा कशी तरी शेवटास न्यावी लागली अशी ही नांवानी कोणीही ऐकिली नव्हती ती सभेच्या हितचिंतकास एकुन घेण्याची पाळी आली व ती मुलांच्या अशाप्रकारच्या करण्यानें. एकूण मुलांनी तुम्ही आपल्याच नावाची नाहींतर आपल्या वडीलांच्या नांवाची हीं दवंडी सर्व जगभर पिटविली ! सभेची अखेरच्या दिवशींच पहाण्याची सर्व मौज असते. प्रथमतः जीं भाषणें होतात तीं जाहिरातींत दिल्या प्रमाणें पाठ करून आलेल्या विषयावर असतात. त्यांत फारशी सभाधीटपणा शिवाय दुसरी कांहीं मौज नसते. सर्व मौज काय तो अखेर जेव्हां मोठमोठ्या लोकांचीं सन्मानार्थ भाषणें सुरू होतात त्यावेळीं असते. त्या अमोलीक लाभासाठी फार लांब लांबचे लोक येतात. त्या अमोलीक लाभास त्यांनीं या सालीं अशा प्रकारें मुकावेना ! व सरते शेवटीं अध्यक्षांचें उमेदवारांच्या भाषण संबंधीं गुण दोष आविष्करण करून श्रोतेजनांस मोठें लाभ व वक्त्यांना आपले गुण दोष समजल्यावर पुढील वर्षीं शुद्ध रीतीनें तयारी करण्यास अधिक हुरूप यावयाचा त्याचा त्यांत तोटा असें अनेक प्रकारें नुकसान व्हावेना । जेव्हां मुलांनी एकोपा केल्याचें दृष्टीस चिन्हें पडूं लागलीं तेव्हां. एकदम त्यांना तेथून काढून देऊन समारंभ तडीस न्यावयाची शक्ती प्रमुखसभा जनांमध्यें नव्हती काय? अहो. इंग्रेज लोक हाका मारतात कीं नेटीव्ह लोकांमध्यें म्यानेजींग पॉवर्स नाहींत तेव्हां त्यांस मोठीं कामें देऊं नयेत. हें त्यांचे म्हणणें खरें करून तुम्ही दाखविणार काय ? सामोपच्यारें काम होत नाहीं व निकरावर आलेलीं मुलें ऐकत नाहींत तेव्हां त्यांस इतर उपायांनीं टवाळकी करण्यापासून बंद करितां येत नव्हतें काय? मुलांची पास ठेवाण्यासाठीं सभेचा व आपल्या मोठ्या नांवाचा बोजवर करून घ्यावासा प्रमुख मंडळीस कसें वाटलें ? कांहीं दिवसां पूर्वींचीं जर मुलें असती तर खरोखर मि० तळवळकर यांचा उपदेश ऐकून व सभेचा व मोठ मोठ्या लोकांचा मान ठेवून अशा प्रकारची वर्तणूक कधीं ही करून दाखविली नसती अशी आडदांड मुलेंही नीतीला कां जुमानतात. त्यांच्या सांठीं कोणी कांही केलें तरी तीं अखेर फिरून पडावयाचींच ? ह्या समारंभाच्या वेळीं जितकीं हायस्कुलांतील मुलें फंदामध्यें असतील व ज्यांनीं मि० तळवळकर यांनीं उपदेश केला असतांही त्यावेळीं आवेशानें ऐकिले नसेल त्यांना एकदम हायस्कूलच्या बोर्डिंगांतून व हायस्कुलांतून काढून टाकावें इतकेंच नाहीं तर अशा फंदी मुलांस कोठें नैकरीही मिळूं नये अशा विषयीं मेहरबान डायरेक्टर साहेबा कडून सरक्युलर करून कडक शिक्षा झाल्या शिवाय अशा मुलांचे डोळे उघडणार नाहींत व गुरूची योग्यता व उपदेशांचें महत्व त्यांच्या लक्षांत येणार नाहीं. अहो पूर्वींचे लोक पहा ज्यांना विद्या म्हणून प्राप्त झाली ते किती लीन. किती आज्ञाधारक असत व हल्लींचे किती उन्मत्त आहेत आतां हें सर्वांसच लागू पडते असें नाहीं त्यांत कित्येक चांगले निपजतात पूर्वीं नीती शिक्षण म्हणून मुद्दाम शाळेंत असावें असें कोणास तरी वाटत असे काय शाळेंत जीं पुस्तकें चालतात त्यांत नीती शिक्षण प्रत्येक धड्यामध्यें आहेच नवीन कांहीं नको आहे व नवीन जितका जितका चांगलें करण्या विषयीं प्रयत्न करावा तितका तितका परिणाम वाईट असें कां व्हावें तर हल्लींचा काळ मेहेरबानी करण्याचा नव्हे तर कडक रितीनेंच चाललें पाहीजे असाच आहे. ज्या शाळेंत आज च्यार उपपद धारी आहेत. ते केवळ नीती शिक्षणाचे स्थंभ आहेत. तेथील म्यानेजमेंट किती चांगली असें असतां विद्यालया बाहेर मुलें गेलीं कीं आम्हीं कोणाचीं नव्हेत असें त्यांस वाटणें म्हणजे शीक्षणाचा प्रभाव कीतीसा त्यांच्या मनावरती ठसतो ! वाळुवर इमारत बांधावी त्या प्रमाणें आमचे सर्व शिक्षण होतचाललें आहे. याचा विचार कोणी तरी करीत आहे काय ; आआतां सदरहू प्रसंगीं जी क्रिया मुलांनी करुन दाखविली त्यांत त्यांस इतर मोठे लोक सामील नसतील असें नाहीं. तरी तेही अशा प्रकारचेच समजले पाहीजेत—जें झालें तें बरेच झाले. पुढील वर्षीं अशा प्रकारें थाट न होण्याविषयीं पुढारी मंडळी बंदोबस्त ठेविल व त्यांच्यानें न होईलतर सरकारची मदत मागून हायस्कुलच्या मुलांतून अदल दिवशी ज्याना हेडमास्तर ची सभेस जाण्याविषयीं सरटी फिकीटें असतील त्यांसच आंत येऊदेण्या विषयीं पुढारी मंडळी विचार करील. पत्र अगत्य छापावें नाहींतर द्या फेकून कचऱ्याच्या पेटींत.

आपला दुःखित
एक " क्ष "

ताजाकलम रे रे ने आपल्यां पत्रांत केलेला उपदेश किती सुंदर आहे. ह्या उपदेशावरून रे रे हा फार सभ्यगृहस्थ असून त्यांस मुलाच्या वर्तनुकी बदल फार वाईट वाटतें असें दिसतें परंतु पत्र लिहीण्या पूर्वीं त्यांनीं इतके लक्षांत आणले पाहिजे होतेंकीं ज्याहट्टी मुलांनीं मि. तळवळकर यांचा उपदेश सभाजना पुढें ही समक्ष ऐकिला नाहीं तें पत्र द्वारें केलेल्याला मानतील काय ?

मुक्काम रिसोड तारीख १३।१।८८

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांस—

साष्टांग नमस्कार वि० वि० मी फिरत फिरत रिसोड येथें आलों. हें गांव जरी तालुक्याचें नाहीं तरी बरेंच मोठें असून येथें व्यापारी लोकांची वस्ती फार आहे दोन तीन व्यापारी फार मोठे आहेत यांच्या इतके श्रीमान ह्या जिह्यांत फारच थोडे दुसरे व्यापारी असतील. गांवांत सरकारी कामगारांपैकीं चीफकॉन्स्टेबल, शाळा मास्तर, पोस्ट मास्तर, सबरजिस्टर पंचावन रुपये शेंकड्यावर नेमिलेला व डाक्टर असे आहेत. हे सर्व आपापले कामांत हुशार असून बरेच लोक प्रीय आहेत परंतु सब रजिस्टर रा. रा. गजानन पंत यांच्या विषयीं लोकांचा अभिप्राय चांगला असावासें दिसत नाहीं. कोणताही सरकारी कामदार ह्मटला तरी, मग तो लहान असो वा मोठा असो त्याच्या अंगीं सहनशीलता, क्षमा, दया वगैरे गूण असले पाहिजेत हे असले ह्मणजे अनायासें तो लोकांना प्रीय होतोच, हे गुण आमच्या रजिस्टर साहेबांच्या अंगीं नाहींत असें कोणीही ह्मणूं शकत नाहीं मग ते लोकप्रीय आहेत असें लोक ह्मणत नाहींत. यांत लोकांचीच चूक आहे. त्यांनीं एका इसमास अन्यायानें अटकेंत ठेविल्याबद्दल त्यांच्यावर कांहीं शद्बदोष आल्याचें ऐकत होतो. परंतु हें खरें असावेंसें वाटत नाहीं बरें खोटें आहे असें जरी घेऊन चाललों तरी मोठ्या मनुष्यावर नुसता शद्बदोष येणें हेंही वाईटच आहे. असो. मिस्तर गजाननपंत हे या गांवचे हुद्देदार. शिवाय या गांवचे देशपांडे तेव्हां त्यांनी सर्वांवर कृपाच ठेवावी हें भूषण आहे. ह्या गांवीं संभावित गृहस्थांमध्यें रा. रा. चिमणराव त्र्यंबक पांडे ऊर्फ आबासाहेब पांडे हे आहेत. यांची योग्यता सरकारी कामदार मंडळींतही मोठी आहे. गांवचे सर्व लोक यांचा चांगला मानमरातब ठेवितात. यांचें सर्व गांवांत मोठें वजन आहे. व हे सर्वांवर कृपा ठेवितात.

या गांवीं पूर्वीं एक इंग्रजीमराठी शाळ होती. तीमोडून आतां फक्त फर्स्टग्रेड लोअर क्लास स्कूल आहे. या शाळेवर असलेले मास्तर यांस येथें येऊन १३--१४ महिने झाले असतील परंतु इतक्या थोडक्या काळांत ते चांगले लोकप्रीय झाले आहेत. त्यांनीं शाळेवर चांगली मेहेनत केली परंतु त्यांच्या श्रमाचें साफल्य झालें नाहीं असें सालमजकूरच्या वार्षिक परीक्षेच्या निकालावरून दिसतें. हे आल्यापसून यांना येथें फार त्रास सोसावा लागला. यांच्या हातांखालील अ. मास्तरांनीं यांना इतका त्रास दिला कीं अखेरीस तें प्रकरण वरिष्टांकडे जाऊन तटखोर अ. मास्तर यांस प्रायश्चित मिळालें व तंट्याचा निकाल झाला. असा वरिष्टांनीं निकाल केला तो कित्येकांना आवडला नाहीं असें जरी झालें तरी या गांवच्या सर्व लोकांना आवडला. फ. अ. यांचे १२ चे आठ झाले. एकास दोन तीन महिने सस्पिंड केलें होतें व एकास दंड झाला या शिक्षा झाल्या त्या योग्य झाल्यामुळें पुनः असे प्रकार होणार नाहींत. ह्या शाळेंत नेहमीं बखेडा असावयाचा असे फार दिवसांपासून दृष्टीस पडत असे इंग्रजी मराठी शाळा असतां तेव्हांचे हेड मास्तर रा. रा. वामन गंगाधर भावे व गणेश गोविंद सावदेकर फ. अ. यांच्यामध्यें इतका कलह माजला कीं तेव्हांही गणेश गोविंद यांस विसांचे बारा होऊन जावें लागलें पुढें ही शाळा मराठी ३५ रुपयांची झाली त्या शाळेवर हेड मास्तर रा. रा. गंगाधर रावजी सोहनी यांची नेमणूक झाली होती त येथें दोन वर्षें होते. त्यांनीं येथें इतकी मेहेनत घेतली कीं हल्लीं जो बगीचा आहे तो त्याच्याच हातचा व त्या वेळीं शाळा इतकी सुधारली होती कीं पुनः इंग्रजी मराठी करण्याचें घाटत होतें. परंतु आह्मां रिसोडस्थ जनांच्या नशिबी इंग्रजी विद्येचा उपभोग घेण्याचे कोठें आहे! हेड मास्तर व अ० मास्तर यांच्यात तंटे लागून शाळेचा दर्जा

वाढला नाहीं. त्यांनीं येथून बदली करून वेतनावर त्यांच्या जागीं रा. रा. लक्ष्मण महादेव देशपांडे यांची नेमणूक झाली. त्यांच्या वेळींही तेंच हेड मास्तर व अ. यांच्यामध्यें झालें पुढें त्यांस येथें देवाज्ञा झाली. नंतर त्यांच्या जागीं रा. रा. केशवराव ह्मणून कोणी आले. त्यांच्या वेळींही चकमक उडाली पुढें त्यांची बदली अकोलें जिल्ह्यांत तेल्हारा येथें झाली व त्यांच्या जागीं हल्लींचे मास्तर आले. हेड मास्तर फार संभावित व गरीब धोरणी असतां यांच्याशींही कलह करण्याकरिता अ. मास्तरांनीं कंबरा बांधिल्या. व तंट्यास सुरुवात झाली. गांवांतील संभावित गृहस्थ रा. रा. आबा पांडे हे उभयपक्षांचा सलुखा करून घ्यावा व शाळा बिघडूं नये ह्मणून शाळेंत गेले असतां एका अ० मास्तरनें अरेरू ह्मटलें कीं, "गांवके कुत्ते गांवमें शेर" या किती दांडगेपणाचें उत्तर हे!! असें कोणी सहन करूं शकेल काय! यावरून तें सर्व प्रकरण वर लिहिल्याप्रमाणें मे० डायरेक्टर साहेब बहादूर न्याय व दया मूर्ति यांच्यापुढें जाऊन वर लिहिल्याप्रमाणें निकाल झाला. या निकालावरून या जिल्ह्यांतील अ. मास्तर यांस काहींएक प्रकारें धाक बसला यांत संशय नाहीं. ह्या जिल्ह्यांतील हवा कित्येक अ. मास्तरांस व हेड मास्तरांस फार मानवते व एकादा बाहेरून आला कीं त्याला ती बाधा करीत असे. ती आतां वरील प्रकरणाचा निकाल आधी औषध मिळाल्यामुळें बाधणार नाहीं असें दिसते. रा. रा. वामन बापुजी लिमये व बळवंत खंडेराव यांस शिरपुरास अशा प्रकारच्या हवेनें फार त्रास दिला होता. ते बाहेर गेल्यावर पुनः हवेनें उचल घेतली नाहीं.

आतां येथील मास्तर पेनशन घेऊन जाणार असें कित्येक बोलतात. परंतु इतक्या तारुण्यावस्थेंत त्यास सर्टिफिकिट कोण देईल तो देवो. परंतु इतक्यांत स्वस्थ घरीं बसण्याचा विचार बिचाऱ्याच्या मनांत कां आला याचें इंगित कोणी सांगेल काय! पत्रकर्तेराव पत्र विस्ताराबद्दल माफी कराल अशी आशा आहे. वाटल्यास छापावें नाहींतर या कचऱ्याटोपलीची हवा पहाण्यास पाठून.

आपला

रिसोडस्थ "स"

वऱ्हाडसमाचार.

मिती माघ शुद्ध १० शके १८०९

गतवर्ष.

मागील अंकावरून पुढें चालूं.

वर्षोवर्ष खजिन्यांत तुट येत गेल्या कारणानें सरकारी खर्चांत काटकसर करण्याकरितां काटकसरीचें एक कमिशन नेमलें गेलें त्याचेंही काम गुदस्तांच शेवटास गेलें. याचा ही रिपोर्ट अद्याप बाहेर आला नाहीं. तथापि या संबंधानें ज्या गोष्टी बाहेर आल्या आहेत त्यावरून काटकसरीची धाव म्हणजे गरिब शिपाई, कारकून, शिक्षण खात्यांतील खर्च, भत्ता यांवरच बसलेंसें दिसत आहे मोठमोठ्या युरोपियन कामगारांच्या जागांना (त्या पैकीं कित्येक तर केवळ पेनशनवर सुखाच्या व फुकट आहेत) मात्र हात लागावयाचा नाहीं. लष्करीखात्याचा फाजील व अवाढव्य खर्च तसाच राहिला.

जमाखर्च संबंधानें सरकारची दरवर्षी जास्ती जास्ती तारांबळ होत आहे. शाहाएंशी साली ५००० रुपये शिल्लक राहिली होती. सत्यायशीं साली ११००० रुपये राहील असा आजमास आहे परंतु या शिलकेंत कांहीं अर्थ नाहीं. यंदातर दोनतीन कोटी रुपये. तूट येईल असा अजमास आहे. गुदस्ता एप्रिल महिन्या पासून प्राप्तीवर कर बसला. हा कर यंदा तूट अधिक झाल्यास दुप्पट होईल अशी गप्प उठली आहे. ही गप्प खरी असेल तर नशीब हिंदुस्थानवासी जनांचें.

युरोपियन लोकांचा जुलुम, अन्याय व अनीति यांचीं उदाहरणें गुदस्तां बरींच घडून आलीं. प्रथमारंभी खंब्रायत प्रकरणांत वुड्लसन साहेबांनीं आपले नांव जगजाहिर केलें. या घाणेरड्या खटल्याची चौकशी करण्या करितां वुड्लसन साहेबांच्या जातीबंधुंचेंच एक कमिशन नेमिलें होतें व त्यांत ते गुन्हेगारही ठरले होते. परंतु स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं हा निकाल रद्द करून साहेब बहादुरांस निर्दोषी ठरविलें, या वरून साहेब लोकांच्या नीति बरोबर त्यांच्या राज्याच्या नीतिचा हा दाखला आमच्या लोकांस चांगला पाहण्यास मिळाला. या खटल्यांत लार्डस साहेबांनीं केवळ अन्याय केला हे कोणी ही नाकबूल करणार नाहीं. दुसरें घाणेरडें प्रकरण रास मार्गनचें मद्रासेस वर्ष सरतां सरतां झालें. या प्रकरणांत ही नायिका मार्गन बाई आपल्याशी केलेला व्यभिचार कबूल करीत असतांही गुन्हेगार रास साहेब निर्दोषी म्हणून सुटले! मिस्ससाहेबांचा उधळेपणा व कर्जबाजारीपणा जग जाहीर होऊन त्यांना त्याचें प्रायश्चित भोगावें लागलें; आसामप्रांतांत गोऱ्या बागवानांनीं जनाव बिगाऱ्यावर कहर करून दिला व कित्येकांचें प्राणही घेतले परंतु ते शेवटीं निर्दोषीच; रंगपुरचा हरणाचा खटला झाला. मध्य हिंदुस्थानांतील एतद्देशीय संस्थानिकांच्या दरबारांत इंग्रज सरकार तर्फेनें असलेले वकील सरलिपेल ग्रीफिन यांनीं भोपाळ संस्थानांत केलेला जुलुम बाहेर येऊन त्यांची सर्वोत्कृष्ट कारस्थानें अमृत बाजार पत्रिकेनें प्रकट केलीं.

आमच्या एतद्देशीय राजांना **गतवर्ष** चांगलें गेलें नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं अगदीं आरंभींचे शिंदे सरकारच्या खजिन्यांतून ३॥ कोटी रुपये उसनवार म्हणून सरकारी खजिन्यांत गेले. त्यावर ज्युबिली प्रसंगीं होळकर सरकारचा इंग्लंडांत अपमान झाला; निजाम सरकार व त्याचे दिवाण सालरजंग यांच्यांत वाकडे येऊन सालरजंग यांना स्वदेश त्याग करणें भाग पडलें. हे गृहस्थ तरूण असतांही यांच्यांत आपल्या वडिलांप्रमाणें पाणी आहे असें इंग्लंडांत असतां त्यांनीं नाइंटीन्थ सेंच्युरीमध्यें जो एक निबंध लिहिला होता त्यावरून अनुभवास आले आहे. त्यावर निजाम सरकारची ६० रुपयांची देणगी झाली व तिच्याच्यामागून कपूरथळासारख्या संस्थानांतूनही दुसऱ्या देणग्या इंग्रज सरकारास मिळाल्या. तथापि होळकर सरकारास रघुनाथरावांसारखे दिवाण मिळाल्या कारणानें व शिंदे सरकारच्या राज्यांत मुंबईंकडील विद्वान् मंडळीमोठमोठ्या अधिकारावर गेल्या कारणानें या दोन्ही राजांचें बरेंच हित होणार आहे. गायकवाड सरकार तर आपल्या राणी साहेबांसह युरोपांत प्रवास करीत आहेत कित्येक संस्थानिकांना ज्युबिली प्रसंगीं के. शी. एस. आय. सारख्या पदव्या मिळाल्या व सांगली वगैरे कित्येक संस्थानिकांस त्यांच्या राज्याचें पूर्ण हक्क मिळालें ही एक आनंदाची गोष्ट आहे.

The Berar Samachar

MONDAY JANUARY 23, 1888

MORAL EDUCATION.

An important communication of the Government of India on the subject of moral training and school discipline has been published. It appears that the communication owes its origin to a letter from the Secretary of state, to the Government of India, which is annexed to the communication. The subject of a moral text book was agitated in the time of Lord Ripon: the current of public opinions was against the publications of an authoritative text book. Lord Ripon's Government thought the same and the Secretary of state concurred with Lord Ripon. An opinion was however expressed that "it may possibly be that here after some book in the nature of a text book of moral rules may be written of such merit as to render its use desirable." The present Secretary of state has made this hint the text of his letter to the Government of India; and Lord Dufferin has used it for a text of an exhaustive and literary sketch of views on the subject.

It may be said that with the change of government, the views on the subject of a moral text book have been visibly changed and though Government of India do not call upon the Local Government to publish an authoritative text book, yet they desire that an indirect attempt should be made by publishing a standard book on the subject, by introducing religious education after school hours in government schools and by inviting aided schools openly to recognise moral instruction. The views expressed by the Indian Goaernment on the subject of school discipline and aiming at the attainment of mannerly and revrential conduct on the part of pupils deserve careful consideration. We wish Government of India had stated more positively the distinction that exhists between the moral standard in practise in England and the determination from it observable in Indian schools. We are personally convinced that a change for the worse is noticable in the conduct of the rising generation; the past habits of reverence, regard, and submission have given place to false independent and contempt of the past. The Government of India fully recognise the evi in the following paragraph.

"In conclusion, I am to commend the whole subject to early and carefu attention, for the importance of the considerations, thus brought to notice cannot be exaggerated. The true interests of education are bound up with the solution of the problems now touched upon. It is sometimes observed by the opponents of our educational system that the want of reverence and the insubordination which is sometimes imputed to Indian students is merely part of a wider measurement over which it would be vain to attempt to exercise any control; and that while Western civilization is sapping the house work of Indian society, it is un equal to laying the foundation stone of reconstruction. A general statement of this character cannot be accepted as any argament against the adoption of measures to remedy an acknowledged evil. The magnitude of the change in native society may well have been exaggerated. But even if it be allowed that change is taking place to the fullest extent supposed, the old order must be replaced by a new one; and there is hope that the new may be better than the old. Let it be granted that European intellectual training has cut loose the rising generation from many of the moral and social bonds of their fore fathers; other forms of restraint must sooner or later take place. Western education, of presevered it must in time bring with it western principles of discipline and selfcontrol. The intellectual part of the process has made good progress; it remains to introduce the moral element which forms the most prominent factor of the European theory of education. The reforms of system indicated in the fore going paragraphs have this object in view although they may not be all that is required. They seek to fill the vacuum which a purely intellectual training has created, and to mitigate the ents of a one sided development" we sincerely hope that results preshaowed in the foregoing paragraph are soon accomplished although we do not agree with some of the views contained in Government of India's letter, the communication has a great literary value and it is the duty of the Education al Department of the graduates of Indian Universities to appreciate and utilise the principles contained in it.

A correspondent in the Times of India who is evidently a European complains of the University systems. He says "according to our present system a Brahmin with a good memory (and we know alas, how many of them are so gifted) might get through a University examination, who is almost innocent of English, and would find it difficult to produce a correct note." Since books are appointed for study he is of opinion that a fool with a memory gains pointed over a wise man with a real talent, if the examiner is not intimately acquainted with the text. He thinks that the object of the University should be to educate and not to cram. His estimate of an educated man is very valuable. The man who has had his grains saturated with Bacon and Johnson, with Locke and Mill, goes straight way into the world and forgets all he has learnt— nor has been strengthened in any real way for the life before him. The mind should show as an effect of previous work a general liberality of tasteo, a comprehensiveness of views and notions. Feeding on the greatest and best thoughts of the past and the present should have raised a man's character, improved his mind. His own thoughts should glow through less muddy channels. He should in fact be able to think for himself. The means he suggests is to read the text first without the help of a commentary and understand its style, its characters its ethics its metaphysies and its plot&c. and then to go into the commentoreis and compare your views with the views of abler men. He proposes that some prominence should be given to original faculty in University examinations. We think that the views this correspondent

has expressed are well worthy of consideration. It is admitted that cramingi plays a great part in University examnations and the object should always be to develop the powers of thinking and not merely to load the memory But we think the Professors after suggesting certain reforms to the University should reform their system of teaching and show by their example the beauty of real education to the candidates. The ways in which text books are at present thought demand improvement and every student has generally some commentary or other in his library which teaches him nearly the same thing that the Professors teach in the class. We hope the letter above referred to attract the attention that it deserves.

We are amused to read the views o Sir Lepel Griffin in a speech he delivered at Gwaliar. We had thought that a cultured Englishman like Sir Lepel, would avoid the subject of race antagonism but we are sorry to find him pointing out the weak points of the Bengali race and exherting the Marathas to perpetuate this system of caste The result of such exhertations is to impress upon the minds of Marathas opinions which would lead them to look with disfavour upon their Bengali brothren. His advice to the Marathas on the point of education is valuable. But the picture of the Bengalis he has drawn does not do credit to his political reputation. His reference to the National Congress is also to be pitied. If he found nothing in that body which he could admire he should have kept silence, but it is certainly discreditable to have described the Congress in the terms used by Sir Lepel. It was his duty as filling up an important position in administration to have showed to the Marathas paths which would help the Nationality of India. Many poltical thinkers feel convinced that unless India is formed into a nation, its political position would remain very low. We think that all our readers, whether Englishmen or natives would be much struck with the remarks of Sir Lepel; and the natives will regard the politisan with feelings of grave suspicion. We would tell the Marathas that they should not accept the opinion and the advice of Sir Lepel, unless they find that the same is the view entertained by men, who are entitled by learning and authority to make a statement on the subject. We give here an extract from the speech of Sir Lepel for the information of our readers:

"One of the reasons for which I urge you, Marathas, to utilize the educational advantages which we offer you, is that you may take your rightful intellectual place in India and keep the Bengalis who are now everywhere very active, in their proper place. You are their superiors in ability, in strength, and in courage. They are only your superiors in noise and volublity. If they should be your leaders, it would be an army of lions commanded by grasshoppers. If you look at the history of the world, you will find that strong nations like the English, Marathas, Rajpoots, and Sikhs, were never ruled by weak and unwarlike races like the Bengalis. Courage is the quality which governs the world, and the bravest people are everywhere and justly triumphant. Do not then allow the Bengalis to deceive you with their talk about national congress and representative institutions. Be content with your own Maratta nationality, and believe me that representative institutions are as much suited to India as they are to the moon. India is composed of many different nations, with very little in common, and it is as foolish to hope to unite them, as to join in one nation Russians, Frenchmen, and English men, who are more closely connected by civilization and descent than the various people of India. The so called National Congress is a sham, and the delegates are only appointed by themselves and their friends. Hindoos of position and authority will not join it; and the only Mahomedans who attend are a few obscure and notority-seeking persons. How do you believe that any thing national can come out of a meeting where the chief promoters have lost their own nationality and have adopted the dress and food and ways of foreigners. My advice to you, Marattas, is to distrust natives of India who have given up their caste and their national dress.

Cherish and observe your ancient and noble religion. Cherish and observe strictly your rules of caste, which missionaries and philanthropists tell you is a bad thing but which is, in reality, the mortar which holds together the building of Indian society. If you take it away, nothing will be left but ruins. There are many bad and inconvenient things in caste, but its advantages are greater than its evils. We cannot have perfection; and if we destroyed everything that was not perfect, we should have to get rid of all our friends, and possibly make away with ourselves.'

वऱ्हाड.

हवामानः— हवा येथें आकाश स्वच्छ.

मि. सी. एच्. प्राईस ए. अ. क. यांनीं येथील ट्रेझरी आफिसरच्या कामाचा चार्ज घेतला. मि. आर्देसर ए. अ. क. हे मि. सी. ए. डब्ल्यु. डेव्हिस अ.क. यांचे तालुक आफिसरचे फर्स्टक्लास माजिस्त्रिटचे काम पाहूं लागले. मि. डेव्हिस साहेब खामगांवास क्यापटन मॉरिस रजेवर जाणार त्यांच्या जागीं जाणार.

मि. कार्डरी साहेब रेसिडेंट हे चार महिन्याच्या रजेवर जाणार असें म्हणतात.

मि. सी. गाडफ्री यांनीं येथें येऊन गेलें आठवड्यांत हेड क्लार्कचे जागेचा चार्ज घेतला.

रा. रा. आयोध्या प्रसाद ए. अ. क. क. व मि. मीर हशमत अली अब्बाची हे लवकरच रजेवर जाणार अहेत अशी बातमी आहे

गव्हरनर जनरल इनू कौन्सिल यांनीं सन १८८७ चा बॉंबे आक्ट ३ (बॉंबे बाइलर इन्स्पेक्शन आक्ट) हैदराबाद आमानी मुलखाला लागू केला.

मि० दस्तुर एदलजी बेमनजी अ० क० यांची उमरावतीहून मॉरिस बदली झाली.

मि० कृष्णाजी हरी तहसिलदार अकोला यांस अपकारी कायद्यांतील कलम ३ प्रमाणें चौकशी करण्याचे अधिकार मिळाले.

मि० आर आवर्ड स्पेशल अ० क० आकोलें यांस क्रि० प्रो० कलम ११०, १३३, ११६, २६० व ५२४ प्रमाणें अधिकार देण्यांत आले.

मि० वामन गणेश त० बाळापूर यांस सेकंड क्लास माजिस्त्रिटचे अधिकार मिळालें.

रेसिडेंट वऱ्हाड आफिसांतील क्लार्क मि० विश्वनाथम् मुदलियार यांस वऱ्हाडांत पांचवर्ग ए० अ० कें० चे जागीं अक्टिंग नेमिलें.

रा०रा० रामचंद्र नारायण देशपांडे यांनीं एवतमाळास जाऊन मि. महमद इस्मायल यांनीं आकोल्यास येऊन क्लो० आ० कोर्टाचें कामाचा चार्ज घेतला.

रा० रा० बाळकृष्ण काशीनाथ तहशिलदार यांनीं मेहकरास जाऊन आपलें कामाचा चार्ज घेतला. तेथील आफिसिएटिंग तहशिलदार रा. रा. गोविंद गंगाधर हे मंगरूळ येथें तहशिलदारींच जागेवर जातील असें म्हणतात.

म्याट्रीक्युलेशनच्या परीक्षेंत पसार झालेल्या विद्यार्थ्यांपैकीं उमरावती हायस्कूलचा विद्यार्थी मारा केशव दामले यांस ६० रु० चें सिल्वर प्रईज मिळालें.

रा०रा० रंगनाथ मुधोळकर बी. ए. एल्. एल्. बी. यांची प्रकृती फार बिघडली होती म्हणून हवा पाउटण्या करितां ते मुंबईस गेले होते ते परत आले. हल्लीं त्यांची प्रकृति चांगली आहे हें कळविण्यास आह्मास फार संतोष वाटतो.

चिंतामण मोरेश्वर आपटे तहशिलदार मंगरूळ यांना मंरूळची हवा मानत नाहीं म्हणून दुसरे तालुक्यांत बदली करण्याविषयीं त्यांनीं अर्ज केला होता. पण तो नामंजूर झाला म्हणून त्यांनीं आपल्या इन्स्पेक्टर आफ रजिस्ट्रेशनचे जाग्यावर परत जाण्यास परवानगी मागितली व त्या प्रमाणें त्यांना ती मिळाली असें ही म्हणतात.

मागाहून आलेली नोटीस.

रा. रा. रामराव पुरुषोत्तम देशपांडे आकोलें यांस.

खालीं सही करणार पांजकडूनः—

नोटीस देण्यांत येत आहे कीं, सन १२९७ फसली सालचा रुसूमाचा पैसा तुम्ही तालुके आकोलें कचेरींतून तारीख १९—१—८८ इसवी रोजीं घेतल्यावर दुसरेंच दिवशीं शेट गंगाधरजी साहू यांचे दुकानावर आम्ही सर्वत्र एकत्र असून खर्चाचे तक रारीची रकम फिर्यादीचा निकाल होई पर्यंत अमानत तुमचे जवळ ठेऊन बाकी हिश्याचा पैसा पावला अशा मजकुरच्या पावत्या घेऊन ज्याचा विभाग त्यास द्यावा फिर्यादीचा निकाल झाल्या प्रमाणें उभयतांनी वर्तावें असें आम्ही ह्मटलें असतां उदईक उत्तर देईन म्हणून बोलले. त्या प्रमाणें आज जबाबाची वाट पाहिली; तुह्मी कांहीं जबाब दिला नाहीं. यावरून ह्या नोटीशीनें तुह्मास असे कळवितों कीं, सदरहू लिहिल्या प्रमाणें पावत्या घेऊन ज्याचा पैसा त्यास द्यावा तसें तुह्मी ८ आठ दिवसांत न केल्यास रीती प्रमाणें तजवीज करून खर्च व व्याज सुद्धां पैसा भरून घेतला जाईल. कळावें ता. २१—१—८८ इसवी.

(सह्या.)

१ खंडेराव माधव देशपांडे प्रगणें आकोलें दस्तुर खुद.

१ नारायण अमृत देशपांडे प्रगणें आकोलें दस्तुर खुद.

१ निळकंठराव नैकृष्ण देशपांडे प्रगणें आकोलें दस्तुर खुद.

१ कृष्ण नैकृष्ण देशपांडे प्रगणें आकोलें दस्तुर खुद.

मागाहून आलेली नोटीस.

रा. रा. चंद्रभान वल्द सुर्यभान देशमुख रहाणार हैसपूर तालुके व जिल्हे आकोलें यांसः—

नोटीस देणार रायभान वल्द रोडबा देशमुख रहाणार माझोड तालुके व जिल्हे आकोलें यांजकडूनः—

असें कळवितों कीं, तुह्मी माझे सम्मती वांचून तारीख २५ माहे जुलई सन १८८४ इ० रोजीं रा० रा० पांडुरंग गोविंद वकील यांस ३००० तीन हजार रुपयांस १४ शेतें गहाण दिलीं- परंतु तीन वर्ष झालें आपण वेगळे राहिले त्या वेळेस कबूल केलें होतें कीं, सदरील चौदा शेतांमधून तुझे हिश्याचें निम्मे सात शेतें व माझोड येथील गढी देईन. ते आज तारखे पर्यंत दिले नाहींत. व सदरहू शेतें व दोन गांवच्या गढ्या वडिलोपार्जित एकत्र असून तुह्मास गहाण ठेवण्यास कायद्यानें अधिकार नाहीं. सदरहू शेतांपैकीं सात शेताचे सन १८८४ ते ८७ अखेरचें पिकाबद्दल दरसाल रुपये २०० दोनशें प्रमाणें व सात शेतें नोटीस पावल्या बरोबर पांडुरंग गोविंद वकील याजपासून सोडून माझोड व हैसपूर येथील सातही शेताचें खातें येत्या एप्रिल महिन्यांत लावून द्यावी. न दिल्यास रीती प्रमाणें काम चालवून अखेर निकाल होईपर्यंत जे नुकसान व जो खर्च होईल ते भरून घतले जाईल. कळावें ता० २१—१—८७ इ०

(सही.)

१ रायभान वल्द रोडबा देशमुख रहाणार माझोड निशानी खुद हातची केली असे.

मागाहून आलेली नोटीस.

रा. रा. पांडुरंग गोविंद वकील राहणार आकोलें यांस नोटीस देणार रायभान वल्द रोडबा देशमुख राहणार माझोड तालुके व जिल्हे अकोलें असें कळवितों कीं अपण तारीख २९ माहे जुलई सन १८८४ इसवी रोजीं चंद्रभान वल्द सूर्यभान देशमुख राहाणार हैसपूर यांजपासून तीन हजार रुपयांत चौदा शेतें गहाण घेतलीं. त्यांत माझें हिशाचीं सात शेतें मजला न कळतां माझे संमतीवाचून त्यानें आपणांस गहाण दिलीं. परंतु सदर्हु शेतें वडिलोपार्जित एकत्र असून माझे हिशाचे निम्मे शेतें गहाण घेण्यास आपणांस कायद्यानें अधिकार नाहीं. यास्तव ही नोटीस पावल्याबरोबर सन १८८४ ते ८७ अखेरचे पिकाबद्दल दरसाल रुपये २०० दोनशें प्रमाणें व माझोड व हैसपूर येथील सातशें तें परत आमचे ताब्यांत गहाणाचें हक्क व ताबासोडून द्यावीत. न दिल्यास तुमचें गहाणखत व शेताचा ताबा या नोटीशीनें रद्द केला असें समजावें. कळावें तारीख २१ माहे जानेवारी सन १८८८ इसवी.

(सही)

रायभान वल्द रोडबा देशमुख रहाणार माझोड

दस्तूर खुद.

वर्तमानसार.

अमृतसर येथील देवालयांत बाबासाहेब सिंग यांची एक तसबीर गुरु नानक यांच्या शेजारी ठेवल्यामुळें तेथील लोकांत बरीच चळवळ सुरु आहे असें सिविल आणि मिलिटरी गॅझेट कर्त्याचें म्हणणें आहे.

यूरोपांतील तंट्यांत इंग्लंड जर कोणास सामील नहोईल तर रशिया हिंदुस्थानास धक्का लावणार नाहीं असें मास्कोग्याझेटचेंच म्हणणें आहे.

अंग्लो अमेरिकन फिशरिज कमिशनच्या कामास पुनः सुरवात झाली.

सर आलफ्रेड लायल, माजी वायव्य प्रांताचे लेफटनेंट गव्हरनर, यांस इंडिया कौन्सिलचे सभासद नेमिलें.

एका गृहस्थानें असा हिशेब काढला आहे कीं जगांत दररोज सुमारें ७० लक्ष बाटल्या तयार होतात.

इंग्लंड व फ्रान्स यांमध्यें अतिशय धुकें पसरल्यामुळें व्यापारास बरीच अडचण होऊं लागली आहे

नेपाळचे रेसिडेंट मि. गर्डलस्टन हे त्या संस्थानांतील अव्यवस्थेच्या संबंधानें सल्ला विचारण्याकरितां व्हैसराय साहेबांकडे गेले आहेत असें समजतें.

नबाब हसन उल्मुल्क खानीखनान बहादूर यांस निझामसाहेबांच्या कौन्सिलचे सभासद नेमिलें.

लेफ. गव्हरनरास भेटण्याकरितां म्हैसूरचे महाराज ता. २१ रोजीं लाहोरास जाणार आहेत.

रशियाच्या पश्चिमसरहद्दीवर रशियानें आपल्या फौजेच्या आणखी दोन तुकड्या पाठविल्या आहेत.

आमच्या इकडे ज्युबिलिच्यावेळीं असले कांहीं प्रकार करण्यांत आले का? देणग्या सुकाळाच्या देण्यांत आल्या. सुकाळाच्या देणग्या आणि वर लिहिल्याप्रमाणें प्रजेस दिलेल्या सवलती यांत जितकें अंतर आहे तितकेंच स्वराज्य आणि परराज्य यांत आहे.

जर्मनी आणि स्वित्सरलंड या दोन देशांत प्रतिवर्षीं २० लक्ष डोळ्यांस लावण्याच्या आरश्या तयार करण्यांत येतात.

फ्रान्सांत ५,०००००० एकर जमिनीत द्राक्षे लावण्यांत येतात.

मेरीडियन मिसपासून १५ मैलांवर एक लिंबाच्या रसाचा झरा लागला आहे! पृथ्वीच्या पोटांत काय काय असेल याचा नेम नाहीं.

१४००,०००,००० रुपयांची दारू दर वर्षास युनायटेडस्टेट मध्यें लोक पिकतात.

दोन चाकाची गाडी पायानें हलवून जशी रस्त्यावर चालते तशी पाण्यांत चालण्याची एकानें युक्ती काढली आहे.

सिंधपिशिनरेलवे लनकरच तयार करण्यांत येईल असें ह्मणतात.

ठा० अ०

पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकुर पत्र कर्त्याच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

मुकाम वाशिम ता. ९।१।८८ इ०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

साष्टांग नमस्कार विनंति विशेष. मेहेरबान कमिशनर साहेब बहादुर मुलुक अमानी हैद्राबाद यांची स्वारी येथें तारीख ७।१।८८ इ० रोजीं आली. ता० ९।१।८१ इ० रोजीं गांव पहाण्या करितां येथें येणार असें मला कळल्यावरून मी मोजनें इ० म० शालेजवळचे चिंचेचे झाडाखालीं जाऊन उभा राहिलों. इतक्यांत आठ वाजण्याचे सुमारास मे० डे० कमि० सा० यांच्या कचेरीकडून गांवांत येण्या करितां नवीन बांधलेल्या सडकेनें एक हत्ती दृष्टीस पडला. जसा तो जवळ येत गेला तसा त्याच्या बरोबर जिल्हाधीपती समेत प्रांताधीपतीची स्वारी आहे व इतर ही कांहीं लोक आहेत असें दिसलें. हत्ती पाहिल्या बरोबर मला वाटलें कीं तो राजधानींतील हत्ती प्रमाणें भूषीत केला असेल परंतु तसा कांहींच प्रकार दिसला नाहीं. साधीच त्याच्यावर एक गादी कसलेला होता. अहो पत्रकर्ते महाराज ह्या महतामहत जनावराची राजधानीमध्यें किती व्यवस्था असते. त्याजवर किती छांदार अलंकार असतात. किती सुंदर अंबारी असते किती उंची उंची कपडे असतात! एकूण सर्वांस नशीब म्हणून आहेना! पूर्वीं राजानें हत्तीच्या योगानें जय मिळविले आतां हत्ती लांकडें ओढण्याच्या कामीं लावितात याजवरून नशीब व काळहा अस्थित्वास आलेल्या वस्तूच्या मागें लागला आहेच. पुढें, स्वारी हलके हलके शाळे जवळ आली तेव्हां शाळेंतून कोणी गृहस्थ बाहेर येऊन दोघांही बड्या साहेबांस सलाम केला— हे हेडमास्तर असावें असें मी अनुमान केलें. त्यांचें भाषण झालें तें मला चांगलेंसें समजलें नाहीं कारण आमचे इंग्रजी ज्ञान पडेल विलायते पर्यंत. पुढें कांहीं वेळ पर्यंत तेथें भाषण झाल्यावर कांहीं मुलें बाहेर नेऊन तेथें एक पत्रा घालून छपर केलेलें आहे त्यांत बसविलीं. नंतर साहेब बहादुरांच्या स्वाऱ्या पुढें हिंदुस्थानी शाळेकडे गेल्या हिंदुस्थानी शाळा नवीन बांधलेली फार सुबक आहे ती पाहून साहेब बहादूर खूष झाल्याचें कळतें. एकूण साहेब बहादुरांचें विद्येच्या कामीं फार लक्ष्य आहे हें आंह्मा या प्रांतस्थ लोकांचें सुदैवच समजलें पाहिजे. पुढें गांव पहात पहात साडेनऊ वाजण्याचे सुमारास आपले तंबूस गेली. गांवची सफाई रस्त्यांची व्यवस्था पाहून साहेब बहादूर फार खूष झाल्याचें दिसलें. ता. १०।१।८८ साहेब बहादूर यांच्या स्वाऱ्या मंगरूळपिराकडे गेल्या तीकडून वणी जिल्ह्यांत जाणार आहेत. जिल्हा वणी हत्तीची स्वारीही त्यांच्याबरोबर आहे.

मे. डे. एज्युकेशन इन्स्पेक्टर साहेब यांची स्वारी पुसद तालुक्यांकडे फिरावयास गेली. पाऊस आतां बंद झाला. गव्हांस चांगला असें लोक बोलतात. परंतु इतरपिकांची कांहीं नासाडी होईल असें अनुमान आहे.

येथील डे. क्लार्कची जागा मिस्तर गोविंद गंगाधर दामले गेल्यावर बऱ्याच दिवस रिकामीं होती. मध्यें कोणी शाळखात्यांतील गृहस्थ तो मिळण्याविषयीं खटपट करीत होते परंतु बिचाऱ्याचें नशीब कांहीं चाललें नाहीं. मध्यें त्या जागेवर बुलढाणा जिल्ह्यांतून रा. रा. बाळाजी रामकृष्ण देशपांडे देऊळघाटकर यांस नेमिलें होतें हे गृहस्थ हुशार होते. परंतु त्यांस आपल्या जागेवर परत जावें लागले. अजून त्या जागेवर कोणी पक्का आला नाहीं असें ह्मणतात सध्या कोणी बदली आहेत. असा बोलवा आहे. हक्काप्रमाणें बढती मिळाल्यानें सरकारच्या इमानी नोकरांस काम करण्यास उत्तेजन येतें काय? पत्र विस्ताराची माफी असावी हें विनंती.

आपला प्रेमेच्छु

"क्ष"

मूर्तिजापूर ता० १२।१।८८

हवामान— गेल्या पांच सहा दिवसांपासून आकाश निरभ्र असून सकाळीं व सायंकाळीं थंडी चांगली पडते. गांवांत रोगराई ह्मणण्या सारखी नाहीं.

वियोग—आमचे येथील लोकप्रीय तहशिलदार रा. रा. बाळकृष्ण काशिनाथ यांची बदली मेहेकरास झाल्यामुळें ते ता० १० मिनहूस आपले नवीन जागीं रुजू होण्याकरितां रवाना झाले. ह्या गृहस्थांचा वियोग येथील तालुक्यांतील मंडळीस फारच दुःसह वाटत आहे. यांस येथें येऊन सरासरी एक वर्षे झालें इतक्या काळांत त्यांनीं आपलें काम कर्तबगारीनें बजावून वरिष्ठांची मर्जी संपादन करून लोकप्रेमही अलौकिक रीतीचे संपादन केले.

यांची आरंभापासून आतांपर्यंत जी उन्नति होत आली ती खरोखर यांचे आंगीं असलेल्या सद्गुणाचेंच फळ होय.

अशा गृहस्थांचा सहवास आह्मांस फार वळ पचला नाहीं हें आमचें दुर्दैवच समजावें. आतां परमेश्वराजवळ इतकीच प्रार्थना आहे कीं त्यांचे जागीं आलेले पूर्वींचे गृहस्थ त्यांचा विसर लवकर पाडोत.

अपघात—ता० ११ मिनहूरोंजी गांवांतील सडकेवर कांहीं मुलें खेळत असतां रस्त्यानें एक गाडी जात होती. तिचे बैल एकदम बेफाम होऊन गाडीचें चाक सडकेच्या पुलावर गेलें, व जोरानें खालीं आपटलें इतक्यांत खेळत असलेल्या मुलांपैकीं एक बुरडाचा सरासरी ६ वर्षांच्या वयाचा मुलगा दुर्दैवानें त्याखालीं सांपडून त्याचें डोकें चाकानें चूर झालें व थोड्याच मिनिटांनी मुलगा गतप्राण झाला! किती भयंकर प्रसंग हा!! गाडीवान् जातीचा परदेशी होता. त्यानें मुलांनीं एकीकडे व्हावें ह्मणून पुष्कळ खटपट केली परंतु त्याची भाषा मुलांस न समजल्यामुळें निष्फळ झालें. बैल आटोपून धरण्याचें कामांतही त्यानें पुष्कळ पराकाष्ठा केली असे ऐकतों परंतु कशाचाच उपयोग न होतां मुलाची प्राण हानी झाली.

जाहिरात.

टपाल खर्च ०४ आणें

वनौषधी सार्सा प्रमाणें.

किमत एक बाटलीस १॥ रुपया

औषधी सोबत कागद व चमचा.

फक्त एकाच औषधापासून खालीं लिहिलेले सर्व प्रकारचे रोग दूर होतात, व त्या संबंधानें झालेला पत्रव्यवहार व सर्टिफिकिटें स्थळ संकोचास्तव न देतां रोगांचीं नांवें मात्र दिलीं आहेत. उपदंशजन्य गरमीचे अनेक प्रकारचे रोग, धातू, खर, स्त्रियांस धुपणी लागते ती रक्त दूषीत झाल्यापासून हाता पायांवर डाग पडणें, सर्व त्वचेचे रोग, कच्चा पारा सेवन केल्यानें सूज येणें, कळा लागणें व सर्व प्रकारचा संधी वायू, गंडमाळा, पिनस, जळवात, कडकी, अम्ल पित्त, पोटशूळ पोट फुगी, नळ वायू, मस्तक शूळ व मुखरोग, जिभेवरील चट्टे, दातांतून पू येणें, रक्त येणें व तोंडाची दुर्गंधी आदिकरून सर्व रोग वरील औषधानें बरे होतात.

☞ पत्ता—मुंबई फणसवाडींत बाळकृष्ण भिवाजी नाखवा याचे बाळींत डा. धाकजी भानजी सांवत.

Dr. D. B. sawant.

30-12-1887

SUCCESS! SUCCESS!! SUCCESS!!!

Competition Challenged! Competition Challenged!!

"Comparison alone is the true test of quality."

A boon to the suffering humanity.

THE ELECTRO GALVANIC RINGS & LOCKETS.

Approved and Recommended by the Modern.

Improved Science of the Day.

TEST, COMPARE AND THEN BUY.

TESTIMONIALS TOO NUMEROUS TO MENTION.

Since the last 12 years we have been manufacturing the Electro Galvanic Rings, and Lockets &c. We can boldly and emphatically assert that our manufactory has already earned a World-wide reputation for genuine production of accomplished workmanship and finest cut. It is needless to mention that the power of electricity has been unanimously pronounced as the most infallible remedial agent in curing the most obstinate and protracted maladies which the human flesh is heir to. It is used next to skin. It acts as a safe guard against the attack of cholera and all sorts of epidemics when used on a healthy and robust constitution. Where doctors and all the existing healing arts have failed to effect any remedy-our Electro-Galvanic Rings-have been found to effect a miraculous cure. In chronic and painful cases given up by doctors as hopeless it has acted as a charm.

It is a pity that some unlettered folks have been deluding the public with their unusual grandiloquent and trumpeting advertisements by styling them selves as sole manufacturers of Electric Rings &c. whereas they are selling brass stuff in disguise of electricity. We have the assistance and co-operation of some practical scientific men introduced this Electric Galvanic Rings on the recognised basis of modern Science. We can boldly challenge all the existing vendors or manufacturers of the supposed Electro Galvanic Rings and Lockets&c. To prove our assertion and to experiment the igenuineness of the existance of electricity in our production, we request ardently every buyer to place the ring on the tongue, when an immediate and unspeakable sensation would be created-should it prove otherwise, we would refund the value. It serves both the purpose of medicine and ornament as medicine it cures all diseases and prolongs the life, as ornament it enhances the affected beauty and adds lustre to the frame. Considering combination of all advantages, we wish no human life should be without it.

Honesty is our Policy- Benevolence is our aims- Dissemminaton of scientific truth is our ends.

Silver Ring Rs.3. Silver Locket Rs.2

Gold Ring Rs.18. Gold Locket Rs. 20.

N. B. Beware of worthless imitation. Seeing our large and increasing sale in the market and mofasil some wicked people have been surreptitiously imitating our articles.

24, Mirzapur Street, Calcutta. | K. C. Dass. & Co. Watch-Makers, Jewellers and Order Suppliers,

☞ हें पत्र आकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साहामाही ॥ ३ ॥ ०८
साल अखेर ७ ॥ १०१८
किरकोळ अंकास ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळीच आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस .....

Per annum in advance 5 Postages 13 a
Per annum in arrears 7 „ 1R. 8 a
Six monthly ..... 3 „ 8 a
Single copy ..... 4 as

Advertisements.
Below 10 lines.
Per line over 10...4
Repetition per line 3a

वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL. XXII AKOLAMONDAY 30 JANUARY 1888. NO5

वर्ष २२ अकोला सोमवार तारीख ३० माहे जानेवारी सन १८८८ इ० अंक ५

जाहिरात.

टपाल खर्च ०४ आणें

वनौषधी सार्सा प्रमाणें.

किंमत एक बाटलीस १॥ रुपया

औषधी सोबत कागद व चमचा.

फक्त एकाच औषधापासून खालीं लिहिलेले सर्व प्रकारचे रोग दूर होतात, व त्या संबंधानें झालेला पत्रव्यवहार व सर्टिफिकिटें स्थल संकोचास्तव न देतां रोगांचीं नांवें मात्र दिलीं आहेत. उपदंशजन्य गरमीचे अनेक प्रकारचे रोग, धातू, खर, स्त्रियांस धुपणी लागते ती रक्त दूषीत झाल्यापासून हाता पायांवर डाग पडणें, सर्व त्वचेचे रोग, कच्चा पारा सेवन केल्यानें सूज येणें, कळा लागणें व सर्व प्रकारचा संधी वायू, गंडमाळा, पिनस, जळवात, कडकी, अम्ल पित्त, पोटशूळ पोट फुगी, नळ वायू, मस्तक शूळ व मुखरोग, जिभेवरील चट्टे, दातांतून पू येणें, रक्त येणें व तोंडाची दुर्गंधी आदिकरून सर्व रोग वरील औषधानें बरे होतात.

☞ पत्ता—मुंबई फणसवाडींत बाळकृष्ण भिवाजी नाखवा याचे चाळींत
डा. धाकजी भानजी सावंत.
Dr. D. B. sawant.
30-12-1867

जाहीरात

सर्व लोकांस कळविण्यां येतें कीं. गणेश लक्ष्मण वांगे यांजला देवकरण गिरधारीलाल दुकान पिंपळगांव काळे तालुके जळगांव ह्या दुकानचें "कुलमुकत्यारपत्र" होतें तें आम्ही दोन महिन्यापासून रद्द केलें आहे. ह्या जकरितां सदर दुकानचें नांवानें मशारनिल्हे वांगे यांनी जो घेवदेव इ. ह्या मुदतींत केलीअसेल तो अम्हास लागूं नाहीं असें अम्हीं समजतों व ह्या पुढें सर्वांस ह्या जाहिरातीचे द्वारें कळवितों कीं मशारनिल्हे वांगे ह्यांशीं आमचे दुकानचे संबंधानें घेवदेव किंवा करार करूं नयेत. केल्यास ते अम्हांस मान्य नाहींत. कळावें तारीख २३--१--८८

(सही.)

देवकरण गिरधारी लाल साहू
दस्तुर खुद्द.

पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकुर पत्र कर्त्याच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस. साष्टांग नमस्कार विनंती विशेष. बरेच दिवसापूर्वी तुमची भेट जाहली होती. पुन्हा देशाचे हीत करणारे मंडळीस जागें करावें करीतां खाली लिहिलेल्या च्यार ओळी येत्या अंकीं छापाव्यात अशी इच्छा आहे.

थोडे दिवसां पूर्वी अकोलें येथें श्री गणेश मंदिरांत एक बरीच मोठी सभा भरून त्यांत ४० वर्षांचे वरील मनुष्यांचे व ८ वर्षांचे आंत कन्येचें लग्न होऊं नये असा ठराव पुष्कळ सुधारक मंडळीचे समतीनें पसार होऊन त्याच्या जागोजागा शाखा स्थापन व्हाव्यात वगैरे बद्दल बरीच खटपट चालली होती, अशी बातमी व त्या संबंधाचे लेख मी आपले बाल्य अवस्थेंत असलेलें बंधु शुद्धवऱ्हाडी प[illegible]त वाचले व त्यावरून अकोल्यांतील शिकलेली (सुधारणा करणारी) मंडळी यांत पुढारी असावी अशी माझी कल्पना आहे.

रा. रा. गणेश अनंत वैद्य डायरेक्टर साहेबाचे हेडक्लार्क याच्या पत्नी थोडे दिवसां पूर्वी वारल्या बद्दलचा मजकूर प्रसिद्ध जाहला त्याबद्दल मजलाही बरेच वाईट वाटलें अस्तु झालेगोष्टीस इलाजनाहीं असें म्हणून सृष्टीक्रमा प्रमाणें स्वस्थ बसणें भाग आहे.

ह्याचे वय मी डायरेक्टरी काढून पाहिली त्यावरून ४२ वर्षांचे आहे. वरील ठराव करीताना हे गृहस्थ सही देण्यास होते किंवा नाहीं हे खात्रीनें ठाउक नाहीं. परंतु असावेत अशी कल्पना आहे परंतु ते कांहीं असो. त्या ठरावास अनुसरून त्यांतील पुढारी मंडळींनीं ही वेळ दवडूं नये अशी माझी सविनय त्यांना प्रार्थना आहे सदर गृहस्थ पुनर्विवाह स्वतःचा खास करण्याचें उद्योगांत आहेत हें मजला त्याचे वडील बंधु भुसावलेस भेटले त्यांनीं सांगितलें व ते त्याच उद्योगास मी जातों असें ह्मणाले.

जर गणपतराव रावसाहेबासारख्या शिकलेल्या विचारी व धूर्त अशा शहाण्या मनुष्यांचे मन वळवून हें कार्य आमचे पुढारी मंडळीचें हातून जाहलें नाहीं, किंवा सदर्हु राव साहेबांनीं जर ह्या मंडळीचें ऐकिलें नाहीं तर शिकलेले लोकांवर इतर मंडळीनें भरवसा ठेवावा कसा लोका सांगे ब्रह्मज्ञान आपण + + ह्या महासाधूच्या वचनाप्रमाणे कृती खरोखर अज्ञानी लोकांचे दृष्टीस पडेल- बरें गणपत रावजींनीं ऐकणें किंवा न ऐकणें ही गोष्ट स्वतंत्र ठेऊं. परंतु पुढारी मंडळी आपले वरचा खटपट करून आरोप तरी दूर करण्यास रावसाहेबाचे मनाविरुद्ध गोष्ट होते करितां भिडभाडीनें मागें न पहातां उद्योग कसा तडीस जाईल व त्याचे मन कसें वळेल ह्याचा विचार करून त्याना उपदेश करण्यास मागे सरु नये अशी त्यानाच सविनय प्रार्थना करतों. ह्यापत्रानें दोन्ही कामें व्हावीत लोभ करावा हे विनंती.

पुरुषानी ही गोष्ट लक्षांत ठेवावी बायकानी आपल्यास फसविलें तर अपण तिजला नाही तर तीचे बदल्यांत त्याचे जाती पैकीं एकादीला फसऊं नये. रा. रा. वैद्य याना जरूर असेल तर समवयस्क पाहून एकट्यांना पुनर्विवाह न करता दोघाचा तो होईल असें करावें, हे विनंती.

आपला "क्ष"

वऱ्हाडसमाचार.

मित्ती माघ वद्य २ शके १८०९

गतवर्ष.

(मागील अंकावरून पुढें चालूं.)

गुदस्ता सामाजिक गोष्टींमध्यें बरीच चळवळ झाली. ही सर्व चळवळ उपस्थित होण्यास कारण रुकमाबाई होय. या बाईनें कांहीं दिवसपर्यंत सर्व हिंदुस्थान तर काय परंतु इंग्लंड, अमेरिका या दूरच्या प्रदेशांत ही चळवळ करून दिली होती. तिचे पक्षीय व त्यांचें प्रतिपक्षी यांचा बराच झगडाझाला. जिकडे तिकडे समाज सुधारणा; वैवाहिक हक्क विवाहकाल हेच विषय गाजूं लागले. ही गडबड इतक्या शिखरास जाऊन पोंहचली कीं, शेवटीं हिंदुस्थान सरकारलाही त्यांत हात घालणें भाग पडले. हिंदुस्थानसरकारनें या संबंधानें एक सरक्युलर काढून त्याच्या द्वारें लोक इलाख्याच्या व प्रत्येक प्रांताच्या स्थानिक सरकारास त्या त्या ठिकाणाच्या विद्वान् विचारी व प्रसिद्ध गृहस्थांची या विषया वरील मतें लिहून पाठविण्याचा हुकूम केला या हुकुमाप्रमायें आमच्या वऱ्हाडांतून ही सार्वजनिक सभा व इतर थोर गृहस्थ यांचीं मतें गेलीं आहेत. अद्याप त्यांचा निकाल काय झाला हें समजलें नाहीं.

फार दिवसापासून चिंबत पडलेल्या आफगाण बाउंडरी कमिशनचा निकाल गेल्या सालांत झाला. हा निकाल आमच्या सरकारास पुष्कळ अंशीं हितावह आहे ही एक आनदांची गोष्टच आहे. पंजाबचे दुलीपसिंग इकडे येत असतां त्यांस पकडून पुनः परत नेल्या कारणानें त्यांचें मोंथे फिरून त्यांनीं इंग्रजसरकारचा आश्रय सोडून दिला. सध्यां ते राशियांत जाऊन तेथून भलत्यासलत्य गोष्टी करीत आहेत. आफगाणीस्थानच्या अमिरा विरुद्ध गिलझाई लोकांनीं बंड केलें होतें त्या वेळी आमच्या सरकारची पाचावर धारण बसली होती परंतु तें बंड मोडून लवकरच तिकडे शांतता झाली. आयुबखान इराणांत कैदेंत होता तो पळून गेला व लवकरच पुनः इंग्रज सरकारच्या स्वाधीन झाला.

वैद्य हकीम व डाक्टर यांच्या संबंधानें कायदा करण्याची गडबड कांहीं महिन्यापूर्वी मुंबईस झाली. परंतु डा. भालचंद्रासारख्या विद्वान् डाक्टरानीं अशा कायद्याचा मूर्खपणा दाखवून दिल्यावरून त्या संबंधानें अधीक चळवळ कोठें ऐकण्यांत आली नाहीं.

गेल्या मे महिन्यांत बंगालच्या उपसागरांत मोठें भयंकर तुफान होऊन सेंटलोंस नांवाची आगबोट बुडाली. या आगबोटींत जगोन्नाथपुरीस जाणारे हजारों यात्रेकरी बुडून मेले. त्याप्रमाणेंच विलायतेकडून येणारी टास्मानिया, मराठा वगैरे जहाजें बुडून त्यांबरोबर शेकडों प्राणांचा नाश झाला.

मृत्यूची धाड आमच्या देशांत दरवर्षी प्रमाणें गत वर्षी ही पडली. डा. आनंदीबाई जोशी, कै. बळवंतराव गडबोले यांच्या सारखी देशहिताकरीतां परद्विपास जाऊन परिश्रम करून आलेली रत्नें अकांली नाहींशी झाली. त्याप्रमाणेंच मैलव्हीलसाहेब, मेजर येव्हान्स बेल, बळवंतराव शास्त्री, कृष्णशास्त्री भाटवडे कर, कृष्ण शास्त्री गडबोले, बाळमंगेशवाळे वगैरे प्रसिद्ध व देश हितेच्छु गृहस्थ कालमुखी पडले.

आमच्या वऱ्हाडांतही ध्यानांत ठेवण्यासारख्या बऱ्याच गोष्टी झाल्या. सार्वजनिक सभेची स्थापना होऊन तिला गतसालीं बरीच योग्यता आली व तिचें कामही नियमानें सुरू झालें. उमरावतीच्या कांहीं विद्वान् होत करू मंडळीनें तेथें प्रावृड् व्याख्यान मालिकेची स्थापना केली व कांहीं गृहस्थांचीं व्याख्यानेंही झालीं.

डेप्युटी कमिशनरांस आजपर्यंत [illegible] व फौजदारी या दोहीं कामाकडे लक्ष [illegible] शिवाय जिल्ह्यांतील इतर कामेंही [illegible] गत असत त्यामुळें दिवाणी कामा[illegible] रकत होत असे व पक्षकारांस फ[illegible] त असें ही अडचण दुर करण्[illegible] शियल असीस्टंटच्या २ जागा नवीन करून त्यांकडे तें काम सोपवून दिलें. व्हेटिनिररी (पशुवैद्यक) खात्याची स्थापना होऊन प्रांतांतील गुरा ढोरांच्या रोगा संबंधानें चौकशी करण्याकरितां एका डाकतराची नेमणूक झाली. याच डाक्टराच्या परिश्रमानें यंदा व वऱ्हाडांतील सर्व गुरांचे व घोड्यांचें अकोल्यास प्रदर्शन झालें.

या प्रमाणें गत वर्षांत सुखदुःखाच्या अनेक गोष्टी घडून आल्या. आमच्या लोकांवर म्हणण्यासारखा चांगला परिणाम कांहीं झाला नाहीं. देशांत विद्वान लोकांची संख्या दरवर्षाप्रमाणें युनोव्हरसीट्यांतून गुदस्तां ही बाहेर आली.

आमच्या सामाजिक व राजकीय अवस्थेंत विशेष फरक कांहीं झाला नाहीं. वर्षभर मनाला वाईट वाटण्याजोग्या ज्या गोष्टी होतात त्यांचा विसर पडण्या करितां अगदीं वर्षाच्या शेवटीं आमची राष्ट्रीय सभा भरत असतें- त्या सभेंत ज्या ज्या गोष्टी घडून येतात त्याच्या योगानें आह्मांला वाईट दिवस आलें असतां ही आमचें समाधान होतें व कधीं तरी आमचा उर्जित काळ येईल अ-

शी उमेद येते. यंदा राष्ट्रीय सभेत ज्या ज्या गोष्टी झाल्या आहेत त्यांच्या योगाने पुढील सालाबद्दल आह्माला पुष्कळ आशा उत्पन्न झाल्या आहेत त्या सर्व पूर्ण होऊन सुरू वर्ष आह्माला, आमच्या आश्रय दात्यांना व आमच्या सरकारला सुखप्रद होवो अशी परमेश्वराची प्रार्थना करून आह्मी हा लेख संपवितो.

शाळांतील नीति शिक्षण.

वरील विषया संबंधानें हिंदुस्थान सरकारचा एक खलिता नुकताच बाहेर पडला आहे. या खलित्यांत हिंदुस्थान सरकारनें शाळांतून नीतिशिक्षणाचा प्रसार करणें इष्ट आहे व ते कोणत्या रीतीनें करावें इत्यादि संबंधानें कांहीं सूचना स्थानिक सरकारास केल्या आहेत. या पैकीं कांहीं सूचना मोठ्या महत्वाच्या व विचार करण्या जोग्या आहेत. वास्तविक पहातां सामाजिक गोष्टीमध्यें ज्या प्रमाणें कायदा किंवा नियम चालून दिले असता चालावयाचें नाहीं त्या प्रमाणेंच या विषया संबंधानेंहि हिंदुस्थान सरकारनें कांहीं नियम चालून दिले असता चालावयाचे नाहीं. लार्ड रिपन व्हाईसराय असतां हा प्रश्न निघाला होता तो स्टेट सेक्रेटरी पर्यंत ही गेला होता परंतु लोकमत विरुद्ध पडल्या मुळें दोघांही लार्ड साहेबांनीं तो तसाच तहकूब ठेविला. आतां आमचे सांप्रतचे व्हाईसराय लार्ड डफरिन यांनीं तो हातीं घेतला आहे तेव्हां त्या वरून सर्व साधारण नियम जरी बांधिले जाणार नाहींत तथापि निरनिराळ्या स्थानिक सरकारचें लक्ष्य या विषयाकडे जाऊन कांहीं झालें तर होईल.

[illegible] विषय अगदीं योग्य वेळीं पुढें आला आहे [illegible]णण्यास हरकत नाहीं, आमच्या लोकांना [illegible]ाची अवश्यकता नाहीं असें को[illegible]णतां येणार नाहीं. हें शिक्षण आम्[illegible]र पाहिजे आहे कारण तें नसल्या कार[illegible] आमचें फार नुकसान होत आहे. आमच्या [illegible]दयाळू, इंग्रज सरकारच्या कृपेनें मानसिक शिक्षण आम्हांस बरेंच मिळूं लागलें आहे परंतु नीतिशिक्षणाचा अभाव आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्लंडांत युरोपांतील इतर देशांत धर्म शिक्षण व नीतिशिक्षण हा एक शिक्षण क्रमांतील आवश्यक विषय धरला जातो आमच्या देशाला तो गोष्ट लागू पडावयाची नाहीं. नीतिशिक्षणाचा धर्म शिक्षणाशीं फार निकट संबंध आहे व आमच्या देशांत शेंकडों धर्मांचीं व शेंकडों पंथांचीं मुळें असल्या कारणोंनत्या सर्वांना त्यांच्या त्यांच्या पंथा प्रमाणें निरनिराळे शिक्षण देणें फारकठीण पडणार आहे किंवा अशक्यच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं शिवाय नीति म्हणजे आमकी एक ठराव वस्तु नाहीं. प्रत्येक जातीच्या व धर्मांच्या लोकांत तिची निरनिराळी प्रमाणें आहेत. हिंदुलोकांत जी गोष्ट फार अनीतीची आहे तीच मुसलमान लोकांत नीतिची होणार आहे. या प्रमाणें नीति विषयक गोष्टींमध्यें परस्पर मतभेद असल्या कारणानें बिलाशतेप्रमाणें सर्वांना एकच नीतिमार्ग घालून देतां येत नाहीं. असें जरी आहे तथापि मनुष्यमात्राचे मनोधर्म सारखेच असल्या कारणानें इतर गोष्टींत जसें सहाय्य असतें तसें नीतिविषयक गोष्टींतही सहाय्य आहे. उदाहरण लबाड बोलणें, चोरी करणें, परस्त्रीयाभिलाष करणें, देव, गुरू व वडील यांना पूज्य मानून योग्य मान देणें इत्यादि गोष्टींत धर्म संबंधानें कितीही मतभेद असला तरी सर्व संबंधाच्या लोकांना सारख्याच ग्राह्य होणार आहेत. तेव्हां या गोष्टी मुलांच्या मनावर लहानपणापासून ठसवून देणें म्हणजेच त्यांना नीतिशिक्षण देण्याप्रमाणें आहे. व आम्हाला नीति शिक्षण द्यावें असें जर आमच्या सरकारच्या मनांत असलें तर तें याच प्रकारचें दिलें पाहिजे. मानसिक शिक्षणाच्या योगानें आमच्या लोकांच्या मनाचा व बुद्धीचा दिवसें दिवस विकाश होत चालला आहे तथापि पद्धतवार नितिशिक्षण न मिळाल्या मुळें अनितीचा प्रसार अधिक अधीक होत चालला आहे. इंग्रजींत पोप नामक कवीनें म्हटलें आहे कीं "थोडीशी विद्या घोकें कारक आहे. हिचें प्राशन करणें असेल तर खूप पिऊन जा नाहींतर तिला स्पर्शही करूंनका." म्हणजे विद्या ही मद्या प्रमाणें आहे मद्य थोडें च प्राशन केलें तर तें आंगावर येऊन त्यांच्या निशेंत मनुष्य भलभलत्या चेष्टा करितो परंतु तेंच खूप घेतलें कीं बेशुद्ध होऊन निःश्रेष्ट पडतो. त्याच प्रमाणें विद्येचें आहे. थोडी विद्या संपादन केली ह्मणजे मनुष्याला मी काय मिळविलें व काय नाहीं असा गर्व होतो व त्याच्या भरांत तो हवितशी बडबड करितो परंतु विद्या पूर्ण झाली म्हणजे त्याला सत्यासत्य विचार कळून येऊन विद्येचें खरें भूषण जो विनय तो त्याचे आंगीं येतो. आमच्या लोकांना थोडें बहूत इंग्रजी शिक्षण मिळाल्या बरोबर ते आपल्या तेवढ्या तुटपुंजीच्या ज्ञानावर गर्विष्ट होतात व त्यांना आह्मी व्यास झालों कीं शंकराचार्य झालों असें वाटूं लागतें. हा मद एकदां आंगावर आला ह्मणजे म ग काय. अनुकरणेरपण अगोदरच मनुष्याला सहाजिक; त्यांत इंग्रज वगैरे पाश्चिमात्य लोकांचा बाहेरून चकपक दिसणाऱ्या रीतीभाती डामडौल यांची त्याला भूल पडते. मग, आमचें जुनें तें सर्व वाईट; आमचे प्राचीन शास्त्रकर्ते डॅम्ड इंडियट्स; त्यांचे सर्व मान्य ग्रंथ रबीश; आमचा सनातन वैदिक धर्म हेथन आणि हिथ्यूजन; आमच्या रितीभाती ऑल फूली आणि डोजनरेट. असें उद्गार त्यांच्या मनांत येउं लागतात. वडील मातोश्री जुन्या चालिची तेव्हां त्यांना दररोज हजारों शिव्या बसूं लागतात खुद्द वडिलांची ही अवस्था मग "बापास बाप न म्हण ऐशास काय होय आजोबा"! सारे देव, धर्म, गुरू, वडील, किंवा विद्वान् यांना जो मान द्यावयाचा त्याची कल्पना हो त्यांच्या मनांत येत नाहीं. सुधारणेच्या अतिप्रखर तेजानें डोळे दिपून जाऊन आपण कोण काय करितो इ० गोष्टी त्यांना मुळींच समजत नाहींत. या प्रमाणें आपल्या लोकांची सांप्रत अवस्था झाली आहे. हिंदुस्थान सरकारनें आपल्या खलित्यांत वर लिहिलेल्या गोष्टीला बरेंच महत्व दिलें आहे व तें योग्य आहे आमच्यांत खरी सुधारणा म्हटली म्हणजे आमच्या लोकां पैकीं जे आपल्याला सुधारक म्हणवून घेत आहेत त्यांच्यांतच झाली पाहिजे.

(पुढें चालू.)

The Berar Samachar

MONDAY JANUARY 30, 1888

OUR JUDICIAL SYSTEM.

The Berar papers have so often tried to show the defects in the administion of justice in Berar that any fresh ventilation of them in the Local news papers seems without adequate justification. The papers have undoubtedly discussed the subject many times and have pitched their voice against the system as high as they could: but it has been as a cry in the wilderness. The Government have been coolly pocketing the Court-fees, wholly ignoring the public opinion on the subject as represented by the papers. It has been repeatedly pointed out that the income from the Judicial stamps has been in excess of the expenditure necessary to meet the charges incurred on account of local Courts of Justice, that there has always been a wide margin for further expenditure with a view to provide speedier and cheaper justice to the thousands that are now denied it. But all this to no purpose. Years have rolled on and the defects have not yet been remedied.

Now who is at fault for the existence of the evils. The Resident suggested a Judicial scheme for Berar, which Dame Rumour says, has been knocked on the head. In provincial matters like these, the knowledge of Local Governments entitles their opinion to great weight; and it is wonderful if the scheme has really been disapproved by the Secretary of State for India. The British Government in India has come to be liked throughout the land, by one of its prominent features—the principle of equal justice to rich and poor alike. The provincial papers have done their duty by the people in representing the matter to Government; the Local Government has been at some pains to mature a scheme and send it on to the Government of India. The Government of India was not quite satisfied with the increase in expenditure suggested by the Local Government, in the shape of a Local High Court; and probably the Government of India made some unfavourable remarks on the scheme of the Local Government, when it was sent on to the Secretary of State. This explains, perhaps, the disapproval of the scheme by the State Secretary.

Our Local Association the Berar Sarvajanik Sabha has thoughtfully prepared and sent up a scheme to the Resident. From the last report of the Sarvajanik Sabha it appears that the scheme was not sent on to the Government of India. This was not as it should have been. The opinion of the Sabha ought to carry great weight, especially in this matter, as many distinguished members of our Bar are members on the Sabha's Roll. The Government of India, has not had, probably the advantage of seeing the scheme suggested by the Sabha. We have therefore to suggest to the Sabha a proposal that they should take some steps to bring their scheme to the notice of the Government of India.

The Sabha is no doubt earnestly desirous of securing a good Judicial administration for the province; but it must see that some practical step need be taken to represent their suggested scheme to the Government of India. We would propose that the Sabha should depute two of its able members to represent the soundness of their scheme to Calcutta. We propose this as the most efficacious remedy to secure the Sabha's object. In such matter correspondence is a tardy cumbrous procedure; the Foreign office has ample work lying always on its hands and the best way to attract its attention and impress it with the utility of the scheme, is to send deputies who could personally explain the matter to the Secretary of the Foreign office.

The one main objection of the Government of India is its fear of increased expenditure on account of the Local High Court to be established under the scheme. In British India, financial considerations might, ostensibly at least, be brought as a bar to certain suggested improvements; but here in Berar, no such considerations can have any application. The revenues of Berar have ever since British rule been on the increase; and the only vigilance that has to be exercised by the British Government in the discharge of their trust, is that H. H. the Nizam's money is not spent in vain. Now, the Government of India cannot venture to maintain that the non-existence of a Local High Court in Berar is no evil and that money wanted to establish one would be as good as spent *in vain*. The balance to be yearly credited to Nizam's Government is the one left after the necessary expenditure for carrying on the Government of the province in a way worthy of the humane British rule. And undoubtedly a Local High Court is such a very great necessity that even the Nixam's Government would be only too glad to meet it.

The Sabha knows already the importance of the subject. It shall have accomplished a great deal if it did seriously represent the case to and get some redress from the Government of India. It shall have justified its existence in the eyes of the provincial public. We hope the Sabha takes up the matter in all seriousness, and do some thing substantial in the matter.

There was a conferrence of the Liberal Unionist party on the 8th of December last. The two important speeches delivered on the occasion were those of Lords Derby and Hartington. The object of the Conferrence was to preserve, strengthen and maintain the existence of the party. Lord Derby referred to one or two questions with regard to which there was a possibility of misunderstanding. He thought that it would be hard to raise any large sum on Irish security and to make the state sole landlord here garded as a most dangerous experiment Lord Hartington received a number of addresses from Liberal Unionist clubs. In reply he said that he thought the addresses erred on the side of too generous an appreciation of his services. He regarded that the doctrine of Home Rule was an interpolation in the programme of the liberal party and that the profession of such a doctrine was not an idea of liberal principles. He thought that the doctrine was inconsistent with liberal policy. He referred to the suggestion that was put forward by the separatists. It was that the Government should be turned out upon a question apart from the Irish question. He did not consider any reconciliation possible as long as there was a difference of opinion on the Irish question. The

basis of the alliance with the conservative party should remain true to the principles with regard to the Legislative union with Irland and should so far as possible undertake to press froward those moderate reforms of which they admit the necessity and which the whole liberal party consider to be of urgent necessity. Refering to the Fair trade movement Lord Hartington admitted that "this was a danger to which they could not shut their eyes. But he did not see that it had received any support or countenance from recognised leaders of the Conservative party. No doubt as long as the depression of trade continued they would hear this cry, but under any circumstances he did not think it possible to speak in too strong terms in deprecating the adoption of such a policy. He did not put the policies of Fair Trade and Home Rule on an equal footing because, even if Parliament were so foolish as to adopt a retrograde measure of Fair Trade it would be possible for a succeeding Parliament to retrace the step without great disaster. But if a measure of Home Rule were sanctioned by Parliament, a Parliament in Dublin could not be withdrawn without extreme dislocation and bitterness. He admitted the possibility of a majority being returned in favour of such a retrograde commercial policy as would constitute a danger so great as to threaten the strength and unity of the Unionist party. He hoped the leaders of the Conservative party would weigh the issues well before taking a step the responsibility for whose consequences would rest on them, and not on the Unionist party which now formally warned them. The noble Lord then, amid loud cheers, declared that till the proposal of an Irish Parliament was absolutely abandoned, the Liberal Unionists would remain a separate organisation, for they would not allow the Liberal party to be identified with anarchy."

The account of this conferrence explains what steps the leaders of a party have to take to understand each other. Complicated questions often arise which require skill and prudence in their solution. We cannot suppose that the Conservative and the Unionist party can work together for a long time except perhaps on the question of Home Rule. Lord Hartington declares the Unionists are helping the Conservative party as allies. A question of much complication has been brought to the point by the movement about Fair trade and if the Conservative party was to take it up in earnest the Unionist party would be seperated earlier than it would other wise be Lord Hartington says that the question has not yet been discussed by the leaders and he has given out a wording to them in proper time. The springing up of this question has given occasion for restatement of the principles under which the Unionist Liberals have consented to work together with the Conservatives and when matters have to be stated clearly much light is thrown upon the relations that exist and a forecast of the consequences is also obtained in case an attempt is made to break up the union. We think that Liberal Unionists have acted wisely in warning the Conservatives in time; but we cannot refrain from stating that the alliance between the 2 parties appeared to be so inconsistent and unnatural that it cannot last for a long time.

Dr. Kirtikar has written a letter to the Times of India in reference to the Review of "aryan on the subject of Social Reforms "I would not blame the orthodex Hindoo." He says "for not accepting the enlightened opinion that there is no harm in a husband and a wife driving together in an open carriage, for he is acting according to his lights, however much I wish he thought otherwise. But I blame the man of advanced views, if he advnces not n deed but in word only "Dr. Kirtikar has met with many educated men, who if they are really earnest about social reform would make the attempt of introducing their wishes into society. "But adds Dr. Kirtikar" that includes a good deal more than a mere drive to Maalbar Point. It involves the education of the wife at home which very few educated sryans practically impart, or even attempt, so as to render the lady a fit member of enlightened society. The Doctor suggests that women may be educated at the shexendra girls school in Bombay if the Poona Female High School is not libed. He thinks that the European Doctor and Missionary have done much to advance social reform. The writer concludes as follows. The Social Reform question has gained one point. Those who formerly advocated political reform first have given in and I now maintain what I have always maintained,

'Begin at home! the rest will follow of itself."

We are really much obliged to Dr. Kirtikar for coming before the public, whenever he thinks he ought to express his opinion upon social questions and his criticism is generally well worthy of consideration we freely amit that he is one of those who have become how to think dpon a subject and to ozpress openly what he thinko at the present day if there were educaied men who could have spared time to think upon a question and to express their views we may venture to say the question social Reform would have made a practical advance by this day. But as a rule only the news papers and a few leading natives raise agitation. The others either follow or look idly on. There is not as much earnestness and enthusiasm as we can consider necessary; otherwise a special newspaper devoted exclusively to social matters would have sprung into existence by this time, We wish the example of Dr. Kirtikar is followed by others who have received education enough to make them think

---

"Berar High school old pupil's Social gathering" is the name of a new association founded at Akola under the auspices of some of the old and distinguished students of our Berar High Schools. We hail this new institution with unfeigned delight and wish it every success. The gathering is of course formed after the fashion of the Elphinstone and Deccan College gatherings and like them is to be held once every year; None but the old students of Berar High Schools are to be admitted as members, who are to be divided into three classes. The first class is to include those members who would pay an annual subscription of Rs. 5. The second class subscription is 1. But this distinction of classes is, we hope, merely nominal as every member is allowed to any subscription he likes, according to his means. The 1st gathering is to be held at Akola on 20th Proximo. Social meetings, speeches, dinner parties be are in the programme which may include many other useful things in the subsequent years as the means of the association would permit. We again wish our friends every success and hope that they will not allow themselves to be lead away by zeal or enthusiasm to commit these errors that are so often committed by their brethren of the other presidencies. They should first aim at self ametioration and then think of the social and political questions of the day. Rashness and indiscretion in the above matters have been the death of many a similar association and our friends will not, we hope, be both to take a lesson from it.

CORRESPONDENCE.

Ellichpur, Berars.
23rd January 1888.

To,
The Editor "Berar Samachar"
Sir,

please publish the following lines in a corner of your valuable journal. *Weather*-We had much cold two days ago; but the sky has today become cloudy and threatens an untimely rainfall. Hooping. cough is greatly prevalent.

Col. Mackknzie, the Deputy Commr. Ellichpur, has gone on towards Chikuldaside: he is expected today here to preside at the Abkari sales.

Company's shop--It is more than a year since this shop was started at Paratwada by the energetic efforts of Rawsaheb Bhole of Amraoti and the educated community of Paratwada. The qeueral meeting of the shareholders of the shop was held on 11th December 1887 under the presidency of Mr. Keshavraw Jaykrishna. Mr. Ganesh Nagesh Vakil secretary read the annual report of the shop, which was well drawn up and contained detailed account from the commencement of the shop to the end of the last Devali Holidays. The devidend declared at the meeting was 12-6-0 percent for the last year, The shop is no doubt in a good state and the Secretary and the managing Committee must be thanked for its good management.

Jubilee Memorial. It is nearly a year since the Jubilee Holidays were celebrated with great *eclat*. About Rs. 2000 were collected to perform the Jubilee celebrations, out of which Rs. 700 were spent on the day in honour of the Empress of India. The balance Rs. 1300 has bee reserved by the Jubilee Committee that was formed here on the occasion, for the purpose of erecting a Saroi as a momorial in honour of the Jubilee day. But we regret to observe that the Committee has done nothing in the matter of *Sarai* up to the present time. We hope our popular Deputy Commissioner will kindly take the matter in his hand and lay the foundation-stone of the *Sarai* to be built on a suitable and convenient site at Paratwada.

The prospectuses regarding the establishment of a new "Association called "the Berar High school student's association" are being distributed in the town. The idea is certainly a good one and we hope a good success to the new Samaja.

Yours truly
"X"

पोंच.

विद्यार्थी:— आपला निबंध फार उशिरां आला. पुढील अंकीं त्यास स्थळ मिळेल.

वऱ्हाड.

हवामान— थंडी जास्त आहे- रोगराई म्हणण्या सारखी नाहीं.

मे. कर्नल ग्रांट साहेब अबकारी लिलावा करितां येथें आले आहेत. एक दोन दिवसांत पुन्हा बाहेर फिरावयास जातील.

मे. कार्डरी साहेब, रेसिडेंट, यांचा वऱ्हाडांत येण्याचा विचार रहित झाला असें समजतें.

मे० कार्डरी साहेब हे येत्या मार्च महिन्यांत रजेवर जाणार तेव्हां त्यांचे जागीं सर आलिव्हर सेंट जान बडोद्याचे रेसिडेंट हे काम पाहण्यास येणार असें म्हणतात.

रा. रा. माधवराव बळवंत खामगांवचे नायब तहसिलदार हे एक वर्षाच्या फर्लोवर जाणार असें समजतें.

मि. पी. थोरीस यांची येथील डे. क. आफिसचे डे० क्लार्कचे जागीं कायमची नेमणूक व्हावी म्हणून शिफारस झाल्याचे कळते. हे लोअर स्टांडर्ड परीक्षा पर्ण पसार झाले आहेत, तेव्हां यांची नेमणूक होणें योग्यच आहे.

मि. बिश्वनाथ मुदलीयार नवीन नेमले ले ए० अ० क० यांची रजा संपत आल्यावरून ते लवकरच सिकंदराबादहून वऱ्हाडांत येण्यास निघतील.

मि. ए. डब्ल्यु. एस्. मरे. ए० अ० क० वर्ग ३. यांस रेसिडेंट साहेबांचे एकस्ट्रा असिस्टंट नेमल्यावरून ता. १ जुलई १८८७ पासून रा. रा. देवराव जैयकृष्ण ए. अ. क. वर्ग ४ यांस तिसरे वर्गाचे ए. अ. क. व मि. सी. एच्. प्राईस, ५ व्या वर्गाचे ए. अ. क. यांस ४ थ्या वर्गाचे ए. अ. क. नेमले.

आकोलें बाजार भाव.

हुंडी मुंबईची दर्शनी			९९।।।–
" १५ दिवस मुदतीची			९९।।–
सुवर्ण.....२३		रुपें	१०९।=
आळशी खंडीस ८२		उडीद	६२।।
गहूं.....काटे ६१।		बनसी	६७।।
जवारी नवी.... ५२।।		चणे....	६२।।
रुई	६८–७१	कापूस	४९....५०

सर्की ७ मीठ ४।। तूप ७।। व तेल १८–

सध्याचे भाव:—

जवारी	वसंत	४७
गहूं	बशाख शुद्ध	१९०=

वर्तमानसार.

निजामाचे चीफ जस्टिस फत्तेनवाजजंग हे ६ महिन्याची रजा घेऊन युरोपांत प्रवास करण्याकरितां जाणार आहेत. याच्या बरोबर दुसरे कोणी जज्ज मौलवी अकबर अली हेही जाणार आहेत असें ह्मणतात. संपत्तीकडे संपत्ति जाते अशी जी आपल्यांत ह्मण आहे ती यावरून खरी आहे असें यावरून होतें.

सांवतवाडी येथें दोन बायकांचे वितुष्ट होतें म्हणून एकमेकीचा सूड उगविण्याकरितां त्यांनीं ऐकमेकाच्या २ मुलांचा खून केला, व ह्या भयंकर कृत्याची चौकशी पोलीसा मार्फत चालली आहे असें समजतें.

किडपुर येथील गोर्दीत १०,००० मनुष्यें काम करीत आहेत. काम झपाट्यानें चाललें आहे.

आपला झनाना (बायका माणसें वगैरे) औरंगाबादेस नेण्याकरितां निजामाचे मामा प्रधान सर सारलजंग यास हैद्राबाद येथें ६ दिवस राहाण्याची परवानगी मिळाली.

रणवीरसिंग हिंदुस्थानांत परत आले आणि ते आपल्या मित्रमंडळांत स्वस्थ बसणार. हे कोठें रहाणार हें अजून पकें समजत नाहीं.

येत्या पावसाळ्यांत आपल्या कुटुंबासह रशियाचा झार काकेसस प्रांतांत येणार आहेत.

रशियाच्या धमक्या—टर्की आणि रशिया यांच्यांत जी मागें लढाई झाली या लढाईबद्दल झालेला ७५ लक्ष रुपयांचा खर्च टर्कीनें न दिला तर रशियामायनर प्रांतांत जीं कित्येक टर्कीचीं ठिकाणें आहेत तीं रशिया घेईल.

इंग्लंडची स्थिति—युरोपांत लढाई सुरू झाली असतां युरोपांतील बड्या राष्ट्रास इंग्लंड कितपत मदत करील असा प्रश्न लार्ड सालिसबरी यांस केला असतां लार्ड सालिसबरी ह्मणाले कीं इतर राजांशीं इंग्लंडनें जे तह केले आहेत त्या तहाप्रमाणें इंग्लंड वागेल आणि पूर्वेकडे हल्लींची जी स्थिति आहे ती बिघडूं न देण्याबद्दल पुष्कळ प्रयत्न करील. युरोपांतील राष्ट्राच्या झालेल्या तहाशिवाय एकादी गोष्ट करण्यास पार्लमेंटशिवाय आह्मांसारख्या राज्यकारस्थानी पुरुषास अधिकार नाहीं. भूमध्य समुद्रांतील लष्करी समतोलपणा आणि इंग्लंड—युरोपांत शांतता राहील आणि टर्कीच्या हितासाठीं भूमध्य समुद्रांतील लष्करी समतोलपणा कधींही बिघडूं देणार नाहीं असें लंडन शहरांत असणारा टर्कीचा वकील रुस्तुमपाशा यास लार्ड सालिसबरी यांनीं सांगितलें.

जर्मनीचें महत्वाचें ह्मणणें—रशियानें आस्त्रिया हंगारी याच्याशी लढाई सुरू केल्यास जर्मनी आस्त्रिया हंगारीस लष्करी मदत करील असें कान्स्टांटिनोपल येथें असणाऱ्या जर्मनीच्या वकिलानें बोलून दाखविलें.

रोमनियांत लढाईची तयारी-दरसालच्या खर्चापेक्षां यंदा ६ कोटी फ्रंक्स लढाईचीं हत्यारें वगैरे घेण्यासाठीं यंदा त्या सरकारानें जास्त रकम खर्ची घातली आहे. या सालीं दर वर्षापेक्षां फौजेंत जास्त लोक ठेवण्यांत येतील.

स्वसंरक्षणार्थ बलगेरियाची तयारी—बलगेरियाची सरहद्द रक्षण करण्याकरितां लढाई संबंधीं प्रधानानें मागितलेले २ कोटी १० लक्ष फ्रांक्स आपली गुप्त रितीनें बैठक करून बलगेरियाच्या सोब्रानजीनें देण्याचें कबूल केलें या सोब्रानजीच्या मेंबर लोकांस प्रिन्स फर्डिनंड यानें एक मेजवानी दिली त्यावेळीं तो ह्मणाला कीं, हल्ली प्राप्त झालेल्या कर्जाच्या प्रत्यर्थ बलगेरियास बरेच बळी द्यावे लागतील. यावर एम् स्ट्रा बोलाफ नांवाचा एक गृहस्थ ह्मणाला कीं, लोक आपल्या स्वतंत्रतेसाठीं आणि त्यांनीं निवडलेल्या राजासाठीं हवे तितके बळी देण्यास कबूल आहेत आमच्या राजानें आह्मास बोलवावें आणि आह्मी त्यांस उत्तम रीतीनें मदत करूं. बलगेरियन प्रकरणाबद्दल रशियाचें ह्मणणें टर्कीच्या पुढें नेऊन देण्यांत आलें होतें परंतु टर्कीच्या मंडळांत त्याचा अजून विचार झाला नव्हता. एकंदर सर्व मोठमोठाल्या राजांचें जें मत ठरेल तेंच टर्की देणार आहे असें म्हणतात.

रशियाची फौज—अर्खेंजल, पत्रेसिव्हाडस्क, उफा, ओरनबर्ग आणि आस्त्राखान येथें जो रशियाची फौज आहे ती वाढविण्याबद्दल रशियाच्या झाराचा हुकम सुटला आहे ओडिसा येथें लष्करी तयारी मोठ्या जारीनें सुरू आहे. काकेसस प्रांतांत ५८ हजार रशियन फौजेचा लवकरच तळ येऊन पडेल. बलगेरियाच्या राज्यावरून प्रिन्सफर्डिनंड यास जरी हाकून लावलें तरी रशिया संतुष्ट होणार नाहीं. असें रशियन पत्रें म्हणत आहेत पूर्वी जसा बलगेरियावर रशियाचाच अंमल असे तसा त्यास भिळेपर्यंत रशिया कधींही खुश व्हावयाचा नाहीं. युरोपांत लढाई सुरू झाली असतां फ्रेंचांनीं व रशियानें संगन मतानें काय काय केलें पाहिजे हें ठरविण्याकरितां रशियाकडून एक वकील फ्रांसाकडे पाठविण्यांत आला. रशियाच्या सरहद्दीवर असलेली ३६ हजार फौज लवकरच शेंकडा ६० या प्रमाणानें वाढविण्यांत येणार आहे. रशियाचे कमीसरियट खातें चांगल्या रीतीनें अन्न सामुग्री करीत आहे. गेल्या वर्षापेक्षां तिप्पट गहूं यंदा कमिसरियेट खात्यानें खरेदी केला आहे.

टर्कीची तयारी—बलगेरियाचा राजा प्रिन्स फर्डिनंड आणि त्याची आई हे फिलिपापोलीस येथें जाणार आहेत. असें टर्कीस कळल्यावरून तो फार नाखूष झाला. आहे आणि तो तिकडे कां जात आहे याचा शोध करण्याकरितां टर्कीनें बलगेरिया येथील आपल्या वकिलास कळविलें आहे. टर्कीनें ग्रसिशीं ऐक्यभाव संपादन करावा असें टर्कीतील पुष्कळ राज्यकारस्थानी लोकांचें मत आहे. टर्कीतील सर्व गव्हरनरास फौजेंत जास्त भरणा करण्याचे हुकूम सुटले असून तो सर्व भरणा कान्स्टांटिनोपल येथें पाठविण्याचेंही हुकूम सुटले आहेत. सरकारी दारूगोळा वगैरे तयार करण्याच्या कारखान्यांतून लढाईचीं शस्त्रें वगैरे तयार करण्याचें काम फार जारीनें सुरू झालें आहे.

यावरून युरोपांत लढाईची तयारी मोठ्या जारीनें चालू आहे असें होतें वरील माहितींत बलगेरियन प्रकरणाबद्दल जी माहिती दिली. आहे. त्यावरून लढाई झाल्यावांचून बलगेरियन प्रकरण शांत होईल असें वाटत नाहीं. युरोपांत अव्यवस्था उत्पन्न व्हावी असें मनांत आणून प्रथम रशियन प्रकरण रूषीश ह युरोपास दिला आणि हा रशियाचा शहा रशियाच्या मनांतील हेतूस बराच उपयोगी पडेल असें दिसतें.

औरंगाबाद येथील हवा निजामचे माजी प्रधान सर सालरजंग यांस मानवली असें हैद्राबाद येथील लोक म्हणतात.

निजामाच्या दरबारांत एक इराणचा वकील येणार आहे अशी जी बातमी मागें प्रसिद्ध झाली होती ती खोटी आहे. मुंबईस एक इराणचा वकील आहे. तोच वकील हैद्राबादचेही काम पाहूं शकेल असें निजाम सरकारचें म्हणणें आहे.

इजिप्तमध्यें दंगाकरणाऱ्या बंडखोरांत एक प्रकारचा आजार शिरला आहे.

अलीकडे वायव्य प्रांतातील रेलवेवर फार चोऱ्या होऊ लागल्या आहेत.

भरतपूरच्या महाराजांनीं व्हाईसराय साहेबास ९ लाख रुपयाची देणगी दिली असें ह्मणतात.

ग्वाल्हेरच्या हद्दीतील कित्येक दरोडेखोरांनीं झांशीजवळ इंग्रजीहद्दींत दरोडा घालून ४ इसमास ठार मारलें व ६ बायकांस व एका पोरास जखमी केलें.

रशियांतील युनिव्हरसिटी बंद झाल्यामुळें येथील मुलें स्वीत्सरलंड येथें शिकण्यास जात आहेत असें ह्मणतात.

फ्रान्सरशिया व इंग्लंड यांची एकी व्हावी अशा बद्दल प्रसिद्ध वकील एम. फ्लरेन्स हा प्रयत्न करीत आहे पण तो सिद्धिस जाईल असें वाटत नाहीं, सिद्धीस जावा कसा?

आयूबखान गेल्याच्या मागच्या बुधवारीं टेहरान येथें जाण्याकरितां मेशेद येथून निघणार होते.

महाराज धुलिपसिंग मास्को येथेंच पैशाच्या अतिशय संकटांत अद्याप आहेत आशी वदंता आहे.

पूर्वबंगाल्यांतील फरादीपूर जिल्हा नेटिव अधिकाऱ्याच्या हातीं आहे. तेथील कलेक्टर जज्ज हे नेटिवसिविल सर्वंट आहेत असें समजतें.

लार्ड डफरिन कांहीं दिवसांनीं सहकुटुंब काश्मीरास जाणार आहेत असें म्हणतात.

अबिसिनियाचे राजे किंगजान इटलीवर हल्ला करण्याच्या संबंधानें आपल्या मांडलिकराजांचा विचार घेत आहेत.

रशियाच्या झारसाहेबांच्या मनांतून मध्य एशियांतील प्रदेश पाहण्याकरितां यावयाचे आहे असें म्हणतात.

दूरदूरच्या देशांतून अमेरिकेंत लोक फार जाऊं लागले म्हणून बाहेरील लोकांवर कर बसविण्याचा विचार त्यांचा चालला आहे असें समजतें.

अमुर्डेरियावरील रशियाचा नवा पूल तयार होऊन त्याच्या वरून पहिली आगगाडी गेल्याचे समजतें.

गालिशिअन सरहद्दीवर रशिअन लोकांची फौज जमत आहे.

बडोद्याच्या गाइकवाड सरकारची स्वारी सुमारें आठ दिवस बडोद्यास राहून नंतर उटकामंड येथें जाणार असें समजतें.

बागुर व स्वातगी प्रांतावर काबुलचे अमीर हल्ला करणार असें ह्मणतात. मु० प०

विद्याखात्यांतील व्यवस्थेचें आणि शिक्षणाचें संबंधानें इंडिया सरकारानें केलेला उनउन्हीत ठराव इंग्रजी प्रत्याहिक पत्रांत आतांच आमच्या पाहण्यांत आला परंतु हा ठराव बराच लांब लचक असल्या मुळें आमच्यानें तो या अकांत घेववला नाहीं, तरी त्यांतील मतलब आह्मी आज येथें वाचकां करितां दाखल करितों.

नामदार गव्हरनर जनरल साहेब ह्मणतात कीं पुढें लिहिल्या प्रमाणें शाळेंतील शिक्षण पद्धती आणि टापटीप असावी.

मा तर आणि शिक्षक तयार करण्या करितां ट्रेनिंग कालेजें सर्वत्र स्थापावीत, आणि कालेजांत शिकून सरटिफिकीट मिळविल्या वांचून कोणाला ही मास्तर किंवा शिक्षक नेमूनये.

२ मुलांच्या एकंदर वागवर्तणुकीवर ही मास्तरांची करडी नजर असावी.

मुलांनीं कसें बोलावें, कसें बसावें वगैरे बद्दल नियम बांधून त्या नियमावरहुकूम त्यांनीं वागावें.

मुलांच्या वागवर्तणुकी बद्दलचें एक रजिस्टर ठेवावें.

खासगी पैशानें असो, अगर सरकारच्या साह्यानें असो मुलांच्या जेवणा खाणाची सोय जेथल्या तेथें होईल तितकी करावी.

मुलांच्या बऱ्या वाईट चालीबद्दल शिक्षकाना जबाबदार ठरण्याचे नवे नियम ठरवावत.

मुलांची वयाची यत्ता ठरवून त्या यत्ते बाहेर असतील त्या मुलाना शाळेंतून काढून द्यावें.

या नियमावरून पाहतां मुलांच्या वर्तणुकीवर सरकारानें मोठा कटाक्ष धरला आहे असें होतें! भा० वृ

SUCCESS! SUCCESS!! SUCCESS!!!

Competition Challenged! Competition Challenged!!

"Comparison alone is the true test of quality."

A boon to the suffering humanity.

THE ELECTRO GALVANIC RINGS & LOCKETS.

Approved and Recommended by the Modern.

Improved Science of the Day.

TEST, COMPARE AND THEN BUY.

TESTIMONIALS TOO NUMEROUS TO MENTION.

Since the last 12 years we have been manufacturing the Electro Galvanic Rings, and Lockets &c. We can boldly and emphatically assert that our manufactory has already earned a World-wide reputation for genuine production of accomplished workmanship and finest cut. It is needless to mention that the power of electricity has been unanimously pronounced as the most infallible remedial agent in curing the most obstinate and protracted maladies which the human flesh is heir to. It is used next to skin. It acts as a safe guard against the attack of cholera and all sorts of epidemics when used on a healthy and robust constitution. Where doctors and all the existing healing arts have failed to effect any remedy-our Electro-Galvanic Rings-have been found to effect a miraculous cure. In chronic and painful cases given up by doctors as hopeless it has acted as a charm.

It is a pity that some unlettered folks have been deluding the public with their unusual grandiloquent and trumpeting advertisements by styling themselves as sole manufacturers of Electric Rings &c. whereas they are selling brass stuff in disguise of electricity. We have the assistance and co-operation of some practical scientific men introduced this Electric Galvanic Rings on the recognised basis of modern Science. We can boldly challenge all the existing vendors or manufacturers of the supposed Electro Galvanic Rings and Lockets&c. To prove our assertion and to experiment the genuineness of the existance of electricity in our production, we request ardently every buyer to place the ring on the tongue, when an immediate and unspeakable sensation would be created-should it prove otherwise, we would refund the value. It serves both the purpose of medicine and ornament as medicine it cures all diseases and prolongs the life, as ornament it enhances the affected beauty and adds lustre to the frame. Considering combination of all advantages, we wish no human life should be without it.

Honesty is our Policy- Benevolence is our aims- Dissemminaton of scientific truth is our ends.

Silver Ring Rs.3. Silver Locket Rs.2
Gold Ring Rs.18. Gold Locket Rs. 20.

N. B. Beware of worthless imitation. Seeing our large and increasing sale in the market and mofasil some wicked people have been surreptitiously imitating our articles.

24, Mirzapur Street, Calcutta. } K. C. Dass. & Co. Watch-Makers, Jewellers and Order Suppliers,

☞ हें पत्र अकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचें "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.